म. ग्रं. मं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं.

म. ग्रं.
विषय
बा. नं.

REFBK-0006316

इ. नं. ८८९२

# गनिमी सैनिक ते आम्हीच !

इतिहास ९२२

(सोविएट रशियांतील गनिमी सैनिकांच्या कामगिरीचा वृत्तांत)

लंडन येथील सोविएट वकिलातीतर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचा अनुवाद

६३९६

लोक–प्रकाशन

४.

REFBK-0006316

ऑगस्ट १९४२ ] [ किंमत ८ आणे.

हें पुस्तक श्री. आर. आर. बखले यांनीं 'मुंबई वैभव प्रेस', सँढर्स्ट रोड, मुंबई नं. ४, येथें छापलें व शराफ अतहरअली यांनीं 'लोक-प्रकाशन' संस्थेकरितां 'न्यू एज प्रिंटींग प्रेस, १९० बी. खेतवाडी मेन रोड, मुंबई नं. ४', येथें कंपोज करून प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना

गरिला [ गनीमी सैनिक ] म्हणजे कोण ? डिक्शनरींत ' गरिला ' शब्दाचा पुढीलप्रमाणें अर्थ आढळतो.:—" अनियमित लढाईंत भाग घेणारा इसम; सर्वसाधारणपणें लहान लहान, स्वतंत्र गट करून अनियमित लढाई चालविणारे लोक." स्पॅनिश भाषेंतील ' ग्वेरा ' या शब्दापासून ' गरीला ' शब्द बनला. ' ग्वेरा ' म्हणजे युद्ध. स्पेनला पूर्णपणें जिंकण्याची नेपोलिअनची मनीषा हाणून पाडण्याचें कार्य मुख्यत: अशा गरिला तुकड्यांनींच केलें. आणि, १८१२ सालीं नेपोलिअननें रशियावर चढाई केली तेव्हां त्याला ' सळो कीं पळो ' करून सोडलें तें रशियांतील गरिलांनीच.

रशियांत गरिला धर्तीच्या लढवय्यांना सर्वसाधारणत: ' पार्टिझान ' म्हणतात. १९१७ च्या क्रांतीपाठोपाठ रशियांत जें स्वकीय युद्ध जुंपलें त्या युद्धाच्या काळांत हे ' पार्टिझान ' लढाऊ गट जन्मास आले. त्यांचा विकास झाला तो या युद्धाच्या ओघांतच; आणि त्यांची खास अशी परंपरा निर्माण झाली ती देखील युद्धक्रमांतूनच. जुन्या जमान्याची विषमता फिरून कायम करूं पहाणारे लोक आणि जनतेच्या सोविएट सरकारला पाठिंबा देणारे लोक यांमध्यें, म्हणजेच काळा बावटा व लाल बावटा यामध्यें, जीवन–मरणाचा घनघोर लढा चालू असतां, हजारो बायकापुरुष या ' पार्टिझान ' तुकड्यांत सामील झाले. या स्त्री–पुरुषांत शेतकऱ्यांचाच भरणा अधिक होता.

या जनता–दळांतून धैर्यवान आणि कुशल असे पुढारी निर्माण झाले. शापाएव्ह काय अगर शकोर्स काय, हे असेच लढाऊ कर्तबगारीनें पुढें आलेले नेते होत. त्यांच्या पराक्रमांचे पोवाडे आज रशियांतील वैभवशाली लोक–वाङ्मयांत चिरायु झाले आहेत. यूक्रेनच्या विस्तीर्ण मैदानांत, द्नीपर नदीच्या दलदलीच्या टापूंत, डोन नदीच्या आसमंतांतील कोसॅक भूमीवर आणि सायबेरियाच्या उजाड ' स्टेप ' पठारावर, असे चहूंकडे आमचे ' पार्टिझान ' अहोरात्र लढले. त्यावेळच्या बाल्यावस्थेतील लाल पलटणीला, सोविएट सरकारच्या शत्रूंशीं लढण्याच्या कामीं हात देण्याखातर त्यांनी आपलें रक्त सांडलें.

या इतिहासाला नुकतींच कोठें वीसएक वर्षें पुरीं होत आहेत. शापाएव्ह व इतर ' पार्टिझान ' पुढाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून लढलेले त्यावेळचे हजारों लोक आजतागायत सोविएट युनियनमध्यें जिवंत आहेत. या लोकांना त्यावेळच्या गरिला परंपरेची आठवण आहे; चढाईखोरांचा समाचार कसा घ्यावयाचा हें या लोकांच्या चांगलेंच ध्यानांत आहे.

जून १९४१ मध्यें झालेल्या जर्मन चढाईच्या अगदीं सुरवातीच्या दिवसापासुन, जेथें

म्हणून शत्रूनें डोकें वर काढलें, तेथें तेथें गरिलांचे गट उभारण्यांत आले. "शत्रूच्या पिछाडीवर शत्रूला असह्य अशी परिस्थिति पैदा करा!" हा इषारा जुलै ३ रोजी स्टालिननें दिल्यानंतर तर ही गरिला मोहीम वणव्यासारखी फैलावली.

फिरून एकवार सर्वत्र वाकबगार पुढारी निर्माण झाले. अक्षरशः, हजारो गनिमी तुकड्या उभारल्या गेल्या. पुरुष, स्त्रिया, किंबहुना लहान मुलें देखील या तुकड्यांत लढत आहेत—आपलें शौर्य आणि आपलें सारें नैसर्गिक चातुर्य खर्चीं घालून, नात्सींच्या यंत्री तांडवरथावर तुटून पडत आहेत. या गरिला लढवय्यांची जर्मन सैनिकांना अहोरात्र दहशत वाटते! "त्या साळसूद दिसणाऱ्या झुडपामागें मशीनगन तर नसेल ना?" अगर "त्या साध्यासुध्या शेतकरी मुलीच्या टोपलींत कुलपी गोळे तर नसतील ना?" अशा शंकांनीं ते बेजार होतात!

सोविएट गरिलांच्या डावपेचांबद्दल व मोहिमांबद्दलच या पुस्तकांत अधिक माहिती आहे. परंतु गिळंकृत युरोपच्या इतर देशांत गरिला तुकड्यांनीं आज चालविलेल्या पराक्रमी लढ्याचीही थोडी माहिती दिली आहे. उत्तरेस फिनलंडपासून, साऱ्या मध्य यूरोपांतून ते थेट दक्षिणेस ग्रीसपर्यंत, जर्मन व इटालियन पिछाडीस आज गरिला तुकड्या आग पेरीत आहेत. या आगीचा विस्तार दिवसानुदिवस अधिकाअधिक भयानक होत चालला आहे. ही गरिला मोहीम म्हणजे नव्या मनूच्या जनतावादी पलटणीची मूहूर्तमेढच होय. एक दिवस असा उगवेल कीं जेव्हां ही वाढती जनतेची पलटण दोस्त राष्ट्रांच्या मुख्य सैन्यांशीं दुवा जोडणार, व यूरोपच्या पाठीवरून फॅसिझमचे निर्मूलन करणार, यांत बिलकुल संदेह नाहीं.

—०—०—

# भाग पहिला

—oXo—

## १

## गनीमी तुकडी कशी पैदा होते ?

ग्रं. क्र. ६३९८

एखाद्या सोविएट जिल्ह्यावर नात्सी सैन्याची चढाई येत आहे असें कळतांच तात्काळ तीन गोष्टी घडून येतात. सामाईक शेताच्या टापूवर हल्ला होणार असेल तर त्या टापूची सारी जनता, चढाईखोरांना या ना त्या रीतीनें उपयोगी पडेल असा सर्व माल गोळा करते. धान्य, तेल, यंत्रें, अन्न–असा सारा माल झपाझप लॉऱ्यांत अगर खटार गाड्यांत भरण्यांत येतो. या गाड्या एकतर पिछाडीला रवाना केल्या जातात, अगर लगतच्या टापूंतील लाल–दलाच्या हवाली करण्यांत येतात. अनेक लोक खेडीं सोडून या मालाच्या गाड्यांसह पिछाडीला जातात.

नंतर, गुरेढोरे, कोंबड्या वगैरेंना जंगलांत हाकून नेण्यांत येतें, व तेथें सुरक्षितपणें लपविण्यांत येते. यानंतर, अनेकवेळां शेतकरी आपल्याच घरांदारांना आग लावतात; " दग्ध–भूमीचे " धोरण हृदयभेदी कठोरतेनें अमलांत आणतात व मग स्वत: जंगलाचा आसरा घेतात. कधीकधीं गावांतील कांहीं लोक गनीमी तुकड्यांना हात देण्याच्या इराद्यानें मुद्दाम गावांतच राहतात. या मागें राहणाऱ्या लोकांची भूमिका भयंकर धोक्याची असते; कारण लूटमार, छळ आणि बलात्कार करणाऱ्या नात्सी चढाईखोरांच्या तावडींत हे लोक सापडतात.

दरम्यान, कित्येक पुरुष व स्त्रिया नात्सी सैन्यापासून छपून राहतात व गनीमी तुकडी उभारण्याच्या कामाला लागतात. पोलेस्या नांवाच्या विभागांत गनीमी तुकडीची उभारणी कशी झाली हे येथील गनीमी कमांडरनें खालील शब्दांत सांगितलें आहे:—

" आमच्या जिल्ह्यांत नात्सी सैन्य घुसलें तेव्हां आमच्या अनेक लोकांनीं जंगलांचा रस्ता सुधारला. जे जिल्ह्यांतील प्रमुख गांवांत राहिले त्यांनीं गनीमी तुकड्यांशीं, तसाच आजूबाजूच्या खेड्यांतील जनतेशीही संबंध जोडला. लवकरच आम्हाला शेकडो सामाईक शेतकरी येऊन मिळाले; त्यांनीं जिवांत जीव असेतों नात्सींशी लढण्याच्या शपथा घेतल्या.

" जर्मन हरामखोरांनीं लूटमार, खून, जाळपोळ वगैरे अत्याचार आरंभिले. यामुळें आमच्या जनतेच्या अंत:करणांत नात्सींबद्दल अधिकच द्वेष खवळला. अगदीं अक्षरश:, थोड्याच दिवसांत आम्हाला जंगलांत येऊन मिळणाऱ्या लोकांची संख्या इतकी वाढली कीं आम्ही एका गनीमी पलटणी ऐवजी दोन पलटणी उभारल्या. जंगलें आणि दलदलीमुळें आमचा शत्रूपासून बचाव झाला. "

लेनीनग्राड विभागांतील दुसऱ्या एका गनीमी कमांडरनें आपल्या डायरींत खालील नोंद केली आहे:—

" आज जर्मन लोकांनीं आमच्या जिल्ह्याचें मुख्य गांव हस्तगत केलें. आमचीं घरें, आमचा क्लब, आणि आमचें इस्पितळ, या साऱ्या इमारती आगीच्या वणव्यांत जळतांना पाहून अंत:करणाचें पाणी झालें.... मध्यरात्रीं आमच्या गनीमी तुकडीची सभा होणार !"

द्नीपर नदीच्या डाव्या काठावरील एका खेड्याची गोष्ट; हें खेडें अद्याप लाल पलटणीच्याच ताब्यांत होतें. एक दिवस, पाठीवर लष्करी पिशव्या आणि खांद्यावर जुन्या बंदुका, अशा थाटांत तीन नवशिके सामाईक-शेतकरी या खेड्यांत येऊन दाखल झाले. पूर्व आघाडी वरील टी. लिलिन नांवाच्या एका खास बातमीदारानें या त्रिकुटाची खालीलप्रमाणें हकिगत दिली आहे:—

" ते तिघे गावांतील सोविएट कचेरींत घुसले; आणि अगदी हलक्या आवाजांत त्यांनीं अध्यक्षाला विचारलें—'आम्हाला रिझिकोव्हची गांठ घ्यावयाची आहे; तो कोठें भेटेल ?'

" रिझिकोव्ह कोण हें अध्यक्षाला पुरेपूर ठाऊक होतें. तरीपण त्यानें सावधगिरीने विचारलें—'कोणचा रिझिकोव्ह ?'

" ते सामाईक शेतकरी थक्कच झाले !—'कोणचा रिझिकोव्ह म्हणून काय विचारतां ? ! रिझिकोव्ह तुम्हाला ठाऊक नाहीं ? तो एक जुना गनीमी-योद्धा आहे. तो येथेंच आसपासच्या दलदलींत कोठेतरी असला पाहिजे. आम्ही गनीमी तुकडींत सामील होण्याचें ठरविलें आहे; म्हणून त्याची गांठ घ्यायला मागतों आहोंत.'

" ही ऑगष्ट १९४१ ची गोष्ट. त्यासुमारास नात्सी लोक द्नीपर नदीच्या उजव्या तीरावर दाखल झाले होते. नात्सींनी व्यापलेल्या भिन्न खेड्यांतून निसटलेले शेकडो लोक त्यावेळीं फेडोर रिझिकोव्हच्या ताब्यांतील गनीमी-तुकडीशीं संबंध जोडण्यासाठीं झटत होते.

" ही गनीमी-तुकडी खरोखरच अस्तित्वांत आहे कीं नाहीं याचादेखील कोणाला नक्की पत्ता नव्हता. तरीपण प्रत्येकजण त्या तुकडीचा माग काढण्यांत गुंतला होता; इतकेंच नव्हे तर रिझिकोव्हची गनीमी तुकडी कोठेतरी असलीच पाहिजे अशी प्रत्येकाची हमखास खात्री होती. रिझिकोव्ह हा १९१९ पासूनचा खंदा बोल्शेव्हिक. संकट समयीं म्हाताऱ्या सामाईक शेतकऱ्यांना आठवण व्हायची ती अचूकपणें रिझिकोव्हचीच. रिझिकोव्ह फिरून गनीमी लढ्याचा झेंडा उभारणार याची त्यांना बालंबाल खात्री होती—त्यांची ही खात्री खरी होती."

## गनीमी योध्यांचे पुढारी कोण असतात ?

बहुधां या योध्यांचे पुढारीपण स्थानिक बोल्शेव्हिक पार्टी कमिटीच्या सेक्रेटरीकडे, शेतकी कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांकडे, सामाईक शेताच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांकडे अगर सभासदाकडे, यांत्रिक नांगर (ट्रॅक्टर) पुरविण्याऱ्या ठाण्याच्या मॅनेजरकडे, अगर कधीं एखाद्या शेतकी तंत्रज्ञाकडे, येतें.

शांततेच्या काळांत जबाबदारीच्या जागांवर लोकमतानें निवडून आलेले हेच लोक असतात; कारण त्यांनीं आपल्या शौर्याचा, सामर्थ्याचा, तसाच चिकाटीचा, जनतेला पुरावा दिलेला असतो.

ज्या जनतेनें त्यांना निवडलेलें असतें त्या जनतेची त्यांच्यावर अढळ श्रद्धा असते. संकटकाळींही जनता स्वाभाविकपणें त्यांचीच कास धरते.

पण प्रसंगीं, अगदीं मामुली कामगार-शेतकऱ्यांतूनही पुढारी निर्माण झाल्याचीं अनेक उदाहरणें घडलीं आहेत. शांततेच्या काळांत हे लोक अगदीं मागें मागें राहून काम करीत असत; पण संकटकाळ गुदरतांच त्यांनीं अकस्मात पुढारी बनण्याची नवीन लायकी दाखविली.

## अनुयायी दळें

गनीमी तुकड्यांच्या अनुयायी दलांत सोविएट जिण्याच्या सर्व क्षेत्रांतील लोकांचा भरणा होतो. बहुसंख्या सामाईक शेतकऱ्यांची असते हें खरें; पण त्यांच्याबरोबर सुतार, लोहार, फिटर वगैरे कारागीर पेशाचे लोकही असतात. स्थानिक उद्योगधंद्यांतील कामगारही सामील होतात. तसेंच कारखान्यांचें डायरेक्टर व मॅनेजर, शाळामास्तर, घोड्यांची निपज करणारे लोक, असे हरपेशाचे लोक या दळांत भाग घेतात. रिझिकोव्हच्या गनीमी तुकडींतील कांहीं लोकांना लिलिन भेटला होता. त्यांच्याबद्दल लिहितांना तो म्हणतो:—

"गनीमी गट आपल्या मोहिमेवर जाण्याच्या तयारींत होता; तेव्हां त्यांच्यापैकी कांहीं गनीमी योध्द्यांशीं माझा परिचय झाला. ते कोण आहेत ? लगतच्या एका बिअर गाळण्याच्या कारखान्यांतील एक कारकून; एक काळ्या केसाचा ट्रॅक्टर ड्रायव्हर; एका सामाईक शेताचा अध्यक्ष; एक मेक्यानिक; एक शेतकी तंत्रज्ञ. पूर्वी हिशोब ठेवण्याचें काम करणारी एक तरुण मुलगी आतां नर्स बनली आहे. द्नीपर नदीच्या डाव्या तीरावरील एका खेड्यांतील डॉक्टरचा मदतनीस-त्यानें आतां दलदलीच्या टापूतील गनीमी योध्द्यांसाठीं एक सुंदर औषधोपचाराचा तळ संघटित केला आहे.

"ही सारी यूक्रेनियन जनतेची लेकरेंच होत; आपल्या सामाईक जमीनजुमल्यावर चढाई करणाऱ्या नात्सीं दरोडेखोरावर सूड उगविण्यासाठीं ही जनता एकदिलानें सज्ज झाली आहे. इव्हान क्रापिव्हेटसचेंच उदाहरण घ्या. इव्हान युद्ध भडकण्यापूर्वी एक मामुली कंपाउंडर होता. पण आज गनीमी गटाबरोबर दलदलीच्या टापूत दाखल होतांच त्यानें दल-दलीचेंच जणू घर बनवून टाकलें आहे; जणुकांहीं तो एखाद्या रोजच्या सरावाच्या जागींच काम करीत आहे !—त्यानें पूर्वी कित्येक वर्षे या दलदलीच्या टापूंत घालविली आहेत."

यूक्रेनच्या दुसऱ्या एका भागांतील गोष्ट; 'पोलिरोडेल' नांवाच्या एका सामाईक शेता-वरील क्लबाच्या मॅनेजरकडे, गनीमी तुकडीत सामील होण्यास उत्सुक अशा कितीतरी शेतक-ऱ्यांचे अर्ज येऊन दाखल झाले. अर्थातच एक तुकडी उभारण्याचें ठरलें. प्रथम अर्ज करणारांच्या लष्करी अनुभवाची व नेहमीच्या पेशांची टाचण करण्यांत आली; व मग ९४ व्हॉलंटिअर्सची एक तुकडी उभारण्यांत आली. या तुकडींत सर्वांत कुशल असेच उमेदवार घेण्यांत आले.

दरएक इसमाला जबाबदारीचें काम देण्यांत आलें. सोविएट-फिनिश युद्धांत शौर्याबद्दल पदक मिळविणाऱ्या एका गोदी-कामगाराकडे टेहळणी करणाऱ्या गटाचे नेतृत्व देण्यांत आलें. यूक्रेनमधील एका आरोग्यालयांत असिस्टंट डॉक्टरचें काम करणारा एक उमेदवार होता. जखमी भाईच्या तैनातीचें ठाणें त्याच्या हवाली करण्यांत आलें. लष्करी अनुभव असलेल्या एका सामाईक शेतकऱ्याला तुकडीचा पुढारी निवडण्यांत आले.

फिनलंडच्या सरहद्दीनजीक सोविएट-कारेलियाचा प्रदेश आहे. तेथील गनीमी तुकडीचा

पुढारी म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून एक उतार वयाचा लाकूड–तोडया आहे ! त्यानें आपल्या आयुष्यांत अनेक लढ्यांचे पाणी चाखलें आहे. तेवीस वर्षापूर्वी, फिनलंडच्या सफेत–रामोशांशीं लढणाऱ्या एका बर्फ–सरपट्या स्काउट गटाचा तो पुढारी होता. या सफेत–रामोशांनीं जनरल मॅनरहाइमच्या पुढाकाराखालीं आज जशी सोविएट यूनिअनवर चढाई केली आहे तशीच तेव्हांही केली होती.

आजच्या गनीमी चकमकींत या म्हाताऱ्या लढवय्याला त्याचा १७ वर्षांचा तरणा बांड मुलगा मदत करीत असतो. त्याच्या गनीमी तुकडीत आज आगबोट– हमाल आहेत; सामाईक शेतकरी आहेत; एक वकील आहे; तसाच एक फॅक्टरी–मॅनेजर पण आहे-रशियन लोक आहेत, फिनिश लोक आहेत, तसेच कारेलियन लोक पण आहेत.

याच कारेलियाच्या टापूंत दुसरी एक गनीमी तुकडी आहे. या तुकडीत खालील पेशाचे सामान्य स्त्रीपुरुष आहेत. कोळी, लाकूडतोडे, एक शाळामास्तरीण, धोंडफोडे कामगार, लगतच्या देहाती सोविएटचा ( पंचायतीचा ) एक अध्यक्ष, एक तंत्रज्ञ, एक खाण–कामगार, एक बँकेतला नोकर, एक मेक्यानिक, आणि एक शिंपी !

## बुद्धिजीवी कामगारांची कर्तबगारी

या गनीमी योध्यांत, साहजिकच, कामगार, शेतकरी व कारागीर या पेशांतील लोकांची बहुसंख्या असते; पण रशियांत एक गोष्ट ठळकपणें नजरेस येते; ती ही कीं, डॉक्टर, वकील, मास्तर वगैरे बुद्धिजीवी पेशांतील स्त्री–पुरुषही या गनीमी–योद्ध्यांशीं पुरेपूर एकरूप झाले आहेत. ( पेशावैशिष्ट्यावरून या लोकांना रशियांत "इन्टेलेक्च्युअल्स" म्हणजे बुद्धिजीवी

उदाहरणार्थ, यूक्रेनच्या ऊमान नांवाच्या जिल्ह्यांत 'सोविएट यूक्रेन' नांवाची एक गनीमी तुकडी आहे. या तुकडींत शहरांतून अणि खेडोपाड्यांतून आलेले कित्येक शिक्षक–पेशाचे लोक आहेत. त्याचप्रमाणें, लढाईपूर्वीच्या एका पोलिसाच्या नेतृत्वाखाली एक गनीमी गट लढत आहे; या गटांत एका इस्पितळाचा वरिष्ठ डॉक्टर काम करीत आहे. जेव्हां गनीमी–योद्धे विसाव्यासाठीं तळ देतात, तेव्हां हा डॉक्टर त्याना प्राथमिक-उपचारांचें शिक्षण होतो. ... व नीना नांवांच्या दोन मुली आहेत; त्यादेखील या गटांत नर्सेचे

... खात्याचा वाकबगार ऑफिसर आहे. त्याचे ... आजचें काम कोणतें ? साहजिकच, आपल्या गनीमी–योद्ध्यांना जंगलांतील गुप्त वाटा दाखवून देण्याचें ! या गुप्त वाटांचा नात्सी टेहळणीस्वारांना जन्मांत पत्ता लागावयाचा नाहीं.

स्त्रिया आणि मुलेंहीं अजब कामगिरी बजावितात. ही वायका-मुलें कधी प्रत्यक्ष लढाईत भाग घेतात, तर कधी गावांतच राहून गुप्तपणें गनीमी योद्ध्यांना शत्रूच्या हालचालींची बित्तं-बातमी देतात. त्यांच्या या कामगिरीबद्दलची सविस्तर माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे.

## खुद्द लाल–सैनिकांचा हात

प्रसंगीं, केव्हांना केव्हांतरी आपल्या मुख्य फौजेपासून अलग पडलेले लाल-सैनिक, नात्सी छावण्यांचा आणि दळणवळणाच्या योजनांचा चिरका उडवून देण्यासाठीं, मुद्दाम

शत्रूच्या पिछाडीवरच राहण्याचें ठरवितात. अशावेळीं हे अलग पडलेले लाल-सैनिकच गनीमी-तुकडीची मूहूर्त-मेढ रोवतात.

युद्धाच्या आरंभीच्या काळांत, याप्रमाणें अलग पडलेल्या एका लाल-सैन्याच्या गटाची एक गोष्ट आमच्या कानांवर आली ती अशी :—हा गट शत्रूच्या पिछाडीवरून आपल्या मुख्य फौजेला मिळण्यासाठीं पूर्वेकडे कूच करीत होता. त्याच सुमारास जर्मन भाषेंत लिहिलेलें एक हँडबिल त्यांच्या हातीं लागलें. हॅंडबिलांत स्टालिनचें भाषण छापलें होतें. नात्सींनी व्यापलेल्या प्रदेशांतील जनतेला स्टालिनने इषारा दिला होता: "दरएक मार्गाचा अवलंब करून नात्सींच्या पिछाडीवरही युद्ध जारी ठेवा !"

गटाच्या कमांडरनें आपल्या लोकांना स्तालिनच्या भाषणाचें रशियन भाषेंत रूपांतर करून सांगितलें; व मग तो आपल्या सोबत्यांना ह्मणाला:

"आपण फिरून आपल्या मुख्य फौजेला जाऊन मिळण्याचा नाद आतां सोडून देऊं. शत्रूच्या पिछाडीवर राहून शत्रूला 'दे माय धरणी ठाय' करून सोडा असा स्तालिनचा हुकूम हा येथें स्पष्ट आहे !"

अर्थातच हा लाल-सैनिकांचा गट त्यानंतर नात्सी पिछाडीवरच राहून गनीमी-युद्ध खेळूं लागला. त्यानें स्थानिक गनीमी-सैनिकांशीं संबंध जोडला. त्यांचा व आपला मिलाप घडवून आणला; व आपल्या सर्व लष्करी ज्ञानाची व अनुभवाची स्थानिक सैनिकांना बिदागी दिली. अशाप्रकारचीं अनेक उदाहरणें घडतात. खुद्द हजर असलेल्या लढवय्यांनीं नंतर सांगितलेल्या हकिगतींत एका लाल-सैनिकाची गोष्ट कानीं आली. जखमी झाल्यामुळें हा सैनिक आपल्या फौजेपासून अलग पडला असतां आजूबाजूच्या शेतकऱ्यांनीं त्याची ममतेनें शुश्रुषा केली व त्याला खणखणीत बरा केला. नंतर त्याच लाल सैनिकानें त्या शेतकऱ्यांना संघटित करून एक गनीमी तुकडी उभारली. *

## गनीमी सैनिकांचा शपथ विधी

बहुतेक गनीमी तुकड्यांच्या शिरस्त्यानुसार नवीन सामील होणाऱ्या रंगरूटाला प्रथम निष्ठेची शपथ घ्यावी लागते. व्हॅसिली जी० नांवाच्या एका गनीमी कमांडरनें ता० ३ सप्टेंबर रोजी आपल्या डायरींत खालील नोंद केली आहे:—

"मला आमच्या गनीमी तुकडीचें कमांडर पद देण्यांत आलें आहे. 'नात्सी दरोडखोरां-विरुद्ध चाललेल्या घनघोर लढ्यांत माझ्या प्राणांची मी कदापि पर्वा बाळगणार नाहीं' अशी मी शपथ वाहिली आहे."

अशा शपथेचें आणखी एक उदाहरण ह्मणजे ब्येलो-रशियांतील गनीमी सैनिकांच्या शपथेचें. ब्येलो-रशिया हा सोविएट यूनिअनचा जिल्हा पोलंडच्या अगदी लगत आहे. तेथील गनीमी सैनिकांची शपथ खालील प्रमाणें आहे :—

"मी—सोविएट यूनिअनचा रहिवासी आणि शूर ब्येलो-रशियन जनतेचा खराखुरा वारस—

---

* नात्सी पिछाडीवर अडकून पडलेल्या एका लाल तुकडीनें शत्रूशी दोन हात करीत करीत अखेर आपली मुख्य फौज कशी गांठली याचें ए. पोल्याकोव्हनें आपल्या डायरींत तंतोतंत वर्णन केलें आहे. "नात्सी पिछाडीवर लाल पलटण" या नांवानें ही डायरी 'सोविएट मित्रमंडळा'नें नुकतीच मराठींत प्रसिद्ध केली आहे.—अनुवादक.

आज असें वचन देतों कीं, जोंवर ब्येलो-रशियन भूमीवरील अखेरच्या फॅसिस्टाचा नायनाट झालेला नाहीं तोंवर, माझ्या हातचें शस्त्र मी खालीं ठेवणार नाहीं. मी आज असें वचन देतों कीं, माझ्या वरिष्ठ कमांडरांचे सर्व हुकूम मी एकदिलानें पाळेन; आणि सदैव कडक लष्करी शिस्तीनें वागेन.

"नात्सी दरोडेखोरांनीं आमची शहरें व खेडीं बेचिराख केलीं आहेत; आमच्या मुला-बाळांचे खून केले आहेत; आमच्या जनतेचा अतोनात छळ केला आहे; आमच्या जनतेवर अनन्वित अत्याचार केले आहेत—आमच्या जनतेची अवहेलना केली आहे. या सान्या अमानुष कृत्यांचा निर्दयपणें बदला घेण्याचें मी वचन देतों. रक्ताचा रक्तानेंच बदला घेतला जाईल; आणि खुनाचा खुनानेच जवाब दिला जाईल.

"मी आज असें वचन देतों कीं, शत्रूला नामोहरम करण्याच्या कामीं मी लाल पलटणीला प्राणांचीही पर्वा न बाळगतां हरतऱ्हेने मदत करेन. मी आज जाहीर करतों कीं, स्वतःला, माझ्या कुटुंबाला, अगर जनतेला, गुलाम म्हणून रक्तपिपासू फॅसिस्टांच्या हवाली करण्यापेक्षा शत्रूशी दोन हात करीत रणांगणांत प्राणाहुती देणे बेहेत्तर समजेन.

"यदाकदाचित् कमकुवतपणाच्या, भीरूपणाच्या अगर कपटाच्या आहारी जाऊन, माझ्या हातून या शपथेचें उलंघन झालें, आणि मी माझ्या जनतेच्या विश्वासघातास कारणीभूत झालों, तर माझ्या भाईच्या हस्ते मला देहांत शासनाची अधोगति मिळो."

## जनतेची भूमिका

सोविएट यूनिअनमधील आजचें गनीमी—योद्धे आणि वीसवर्षांपूर्वीच्या यादवी युद्धांतील गनीमी पुरस्कर्ते यांमध्ये एक ठळक फरक आहे; तो हा कीं, आज सोविएट यूनिअनमधील कोणतेंही खेडें गनीमी—योध्यांना आसरा देऊं शकतें.

वीस वर्षांपूर्वी, कायसरच्या, रशियन सफेत रामोशांच्या अगर हस्तक्षेप करणान्या, सैन्यांविरुद्ध लढत असतां, आमच्या गनीमी—योध्यांना खेडोपाड्यांतील कांहीं मोजक्या व्यक्तींवर सारी भिस्त ठेवावी लागे. त्या जमान्यांत दरएक खेड्यांत एक तरी गबर शेतमालक असावयाचा; हा शेतमालक बहुधा आपल्या खेड्यांतील सावकार पण असावयाचा. तसेंच, हा शेतमालक सामान्यतः, एकतर जर्मन चढाईखोरांचा, अगर रशियन सफेत-रामोशांचा, हस्तक असावयाचा.

हे शेतमालक आमच्या गनीमी—योध्यांचा छळ करीत व त्यांना शत्रूच्या हवाली करीत. या शेतमालकांचे मुलगे लुटारूंच्या वतीनें शासन-फौजांत सामील होत. साहजिकच, गनीमी—योध्यांना कमालीच्या सावधगिरीनें हालचाल करावी लागे.

आजचें चित्र फारच निराळें आहे. सामाईक-शेतीच्या यशामुळें गरीब आणि गबर हा शेतकऱ्यांमधील अन्याय्य भेद नष्ट झाला आहे. अर्थातच, आज, सोविएट यूनिअनमधील एकजात सारीं खेडीं राजकीय आणि नैतिक एकवाक्यतेमुळें परस्परांशी समरस झालीं आहेत. अजूनदेखील देशद्रोही इसम आढळतात; परंतु ते बोटावर मोजण्याइतके थोडे; आणि त्यांचा हां हां म्हणतां बंदोबस्त करतां येतो.

आज, गनीमी—योध्यांना आसरा आणि मदत देत नाहीं असें खेडें अपवादाला सुद्धां राहिलेलं नाहीं. कोठेंही जा, आज आमचे गनीमी योद्धे आपल्याच आवडत्या लोकांत असतात. लाल पलटणीचा जखमी सैनिक असो, गनीमी—योद्धा असो, अगर उडत्या विमानांतून हवाई—

छत्रीच्या आधारे उडी घेणारा एखादा लाल–वैमानिक असो; या सर्वांना आज कोणत्याही खेड्यांत आपणाला आसरा व साहाय्य मिळणार याची सदैव हमी वाटते.

'प्रावदा' पत्राच्या एका बातमीदाराशीं रेडियो द्वारा बोलतांना, लेनिनग्राड भागांतील एक गनीमी म्होरक्या म्हणाला:—

"आमच्या जिल्ह्याचे लोक फारच प्रेमळ आहेत. आम्हाला मदत करण्यासाठीं ते जिवाचें रान करतात. कित्येक सामाईक शेतांच्या कार्यकर्त्यांनीं आपल्या सर्व सभासदांच्या आम–सभा भरविल्या; आणि गनीमी–योध्यांना गरम कपडे पुरविण्याची हमी दिली. आमचे हे शेतकरी आमच्यासाठीं गरम कोट बनवीत आहेत: हातमोजे आणि पायमोजे विणीत आहेत; आमच्या खाण्यापिण्याची तर ते नेहमींच नियमितपणें बरदास्त राखतात !"

याप्रमाणें, आघाडी आणि पिछाडी, शत्रूनें व्यापलेला मुलुख आणि लालझेंड्याच्या ताब्यांतील मुलूख, यामध्यें, नात्सी चढाईखोरांविरुद्ध चाललेल्या सामाईक युद्धाखातर, अभेद्य एकजीवता दरवळत आहे. एका बाजूला, लाल पलटण, लाल आरमार आणि लाल हवाई आरमार, यांनीं शत्रूच्या यंत्रसमर्थ झुंडींचे हल्ले परतविण्याचें कार्य चालविलें आहे; तर दुसऱ्या बाजूला सोविएट यूनिअनचे सामान्य स्त्री-पुरुष शत्रूच्या पिछाडीवर आपल्या तऱ्हेवाईक गनीमीकाव्यांनें शत्रूला हैराण करीत आहेत.

—0—0—

# २

# त्यांचा शस्त्रें मिळविण्याचा तोडगा

खरें पाहतां, गनीमी–योद्धे सोविएट आघाडीपासून कितीतरी मैल दूर असतात; त्यांचे परस्परांपासून दूरावलेले अलग अलग गट असतात; शिवाय त्यांच्या भोंवती शत्रु-सैन्याचा गराडा पडलेला असतो. अशा स्थितींत हे गनीमी-योद्धे शस्त्रास्त्रें कोठून मिळवितात ?

हा प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो.

या प्रश्नाचें उत्तर व्होरोनोव्हच्या शब्दांतच दिलेलें बरें; व्होरोनोव्ह वीस वर्षांपूर्वीच्या यादवी युद्धांत लढलेला कॉमरेड आहे; युद्धांपूर्वी तो सामाईक–शेतांची उभारणी करणारा बोल्शेव्हिक पार्टीचा एक संघटणाकार होता. व्होरोनोव्ह लिहितो:—

"आम्ही आमची गनीमी तुकडी उभारली तेव्हां आमच्याजवळ केवळ थोडयाशा रायफली होत्या, आणि थोडेसे कुलपी गोळे होते. ही सामुग्रीदेखील, आमच्या टापूंतून जाणाऱ्या

कांहीं लाल-सैनिकांनी आम्हाला दिली होती. आमच्या तुकडीच्या बहुसंख्य भाईजवळ फक्त कुऱ्हाडीच होत्या !

"पुढें एक दिवस आमच्या स्काऊट तुकडीनें खबर आणली कीं, लगतच्या एका खेडयांत एक जर्मन मोटारवाली तुकडी येऊन तळ देईल असा अंदाज आहे. जर्मन लोक अंदाजावरहुकूम त्या खेडयांत येऊन दाखल झाले; त्यांनीं रात्र खेडयांत काढण्याचें योजलें होतें. तेथें त्यांच्या मोटारगाडयांना पेट्रोलचा पुरवठा केला जाणार होता. रात्र होतांच आह्मीं

रात्रीच्या आस-पासला मी व माझ्या एका सोबत्यानें मिळून, नात्सी रखवालदारांना ठार केलें. नंतर आमची सारीच्या सारी गनीमी झुंड दोन्ही बाजूनीं खेडयांत घुसली. आमचे लोक हां हां म्हणतां जर्मन गुंडांवर तुटून पडले. आपल्या कुऱ्हाडींचे मर्दानी वार करून त्यांनीं नात्सी टॅंकवाल्यांची आणि मोटरसायकल-स्वारांची खांडोळीं केलीं !

"जर्मन हरामखोरांची अजिबात गाळण उडाली. अवघ्या तीन टॅंकांनीं लगबगीनें आमच्यावर भडिमार सुरू केला. पण गनीमी-योध्यांनीं कुलपी गोळे झुगारून टॅंक-हल्ला थंड पाडला ! नंतर, आम्ही एक जर्मन मशीनगन काबीज केली व तिला तिच्या मालकांविरुद्धच गोळ्या ओकावयास लावल्या. चाळीस जर्मन ठार झाले. गनीमी-योध्यांनीं चेपून शस्त्रास्त्रें लुटली व रातोरात जंगलाच्या पोटांत दडी दिली."

"बहुधा, नवीनच उभारण्यांत आलेली गनीमी-तुकडी नात्सींच्या लहान लहान गटांवर हल्ला चढवून आपल्या मोहिमेची सुरवात करते. एखादी नात्सी टेहळणी-स्वारांची छोटी तुकडी, अगर लष्करी कागदपत्रांची ने-आण करणारा मोटारसायकलवाल्यांचा एखादा गट, अशीं सावजें प्रथम गाठण्यांत येतात. शत्रूनें रात्र काढण्यासाठीं एखाद्या खेडयांत तळ दिला कीं रखवालदारांची, गळे दाबून अगर अंधारांत दंडयानें टाळकीं शेकून, विल्हेवाट लावतां येते. या हिकमतीनें कांहीं रायफली, बरेचसे कुलपी गोळे, इतकेंच नव्हे तर प्रसंगीं एखादी छोटेखानी मशीनगनदेखील, अशी सामुग्री सहज पदरांत पडते."

"या प्रमाणें इतिश्री झाल्यानंतर शत्रूच्या कांहींशा मोठ्या गटांवर अचानक हल्ला चढविण्यासाठीं सोयीच्या जागीं दबा धरावयाचा. या हल्ल्यांत जय मिळाला तर गनीमी तुकडीला आणखी डझनभर रायफली, आणि कित्येक काडतुसांच्या माळा व इतर सामुग्री सहज लाभते. आणि याच राजमार्गानें गनीमी-तुकडीची उत्तरोत्तर वाढती भरभराट

— झाटोमार विभागात वावरणाऱ्या एका गनीमी तुकडीची गोष्ट; तुकडीचा कमांडर युद्धांपूर्वी एक शेतकी-पट्टु होता. या तुकडीच्या लष्करी मोहिमा मोठ्या नमुनेदार असतात. अगदी मोजक्या दिवसांत या तुकडीनें एका खेडयांत अनेक लहान लहान नात्सी गटांना कैद केलें. याप्रमाणें मिळालेल्या शस्त्रास्त्रांच्या जोरावर पुढें या तुकडीनें एका नात्सी वाहतुक-तुकडीवर हल्ला चढविला. या हल्ल्यांत ४८ नात्सी ठार झाले; शत्रूच्या २२ मोटार गाडयांचा चक्काचूर झाला; नऊ मोटरसायकली जमीनदोस्त करण्यांत आल्या; आणि चार नात्सी लष्करी अधिकाऱ्यांनी व्यापलेली एक मोटार उडवून देण्यांत आली.

या हल्ल्याच्या जोरावर गनीमी-योध्यांना ३० जर्मन रायफली, आठ ऑटोमॅटिक रायफली, दोन लहान मशीनगनी, एक सुरूंग-फेकी तोफ व आठ सुरूंग, आणि रायफल व

मशीनगनच्या काडतुसांच्या आठ हजार माळा, इतकी सामुग्री लाभली !

दुसऱ्या एका गनीमी तुकडीचा कमांडर चेर्नी नांवाचा एक सामाईक-शेतकरी आहे: या तुकडीत शेकडों लोक आहेत. त्या सर्वांजवळ ऑटोमॅटिक रायफली आणि कुलपी गोळे आहेत. या तुकडीचे तीन स्वतंत्र गट बनविण्यांत आले आहेत. या गटांजवळ मोठाल्या तोफा आहेत आणि सर्वांत मिळून तीस मशीनगनी आहेत. ही सारी युद्धसामुग्री या तुकडीनें जर्मन लुटारूंशीं दोन हात करूनच मिळविलेली आहे !

सोविएट यूनिअनमध्यें, शत्रूच्या पिछाडीवर वावरणाऱ्या बहुसंख्य गनीमी तुकड्यांजवळ आतां पुरेशी आधुनिक शस्त्रास्त्रें आहेत. सर्वांच्या जवळ मशीनगनी तर आहेतच; शिवाय आतां, मोटरसायकली, चिलखती गाड्या, किंबहुना रणगाडेही आहेत. हे रणगाडे चालविण्यांचें काम सामाईक-शेतांवरील ट्रॅक्टर-ड्रायव्हर लोक करतात. जर्मनीनें व्यापलेल्या ब्येलोरशियाच्या एका जिल्ह्यांत एक गनीमी तुकडी आहे. झाकार मॅक्झिमोविच हा या तुकडीचा कमांडर आहे. त्याच्या पुढाकाराखाली ही तुकडी एका खेड्यांत घुसली. तेथें रात्र काढण्यासाठीं नात्सींनी तळ दिला होता. आमच्या गनीमी-लढवय्यांनी खेड्यांतील एकजात सारे जर्मन सैनिक ठार केले; तसेच सारे नात्सी ऑफिसर ठार केले. दोन चिलखती गाड्या, एक 'व्हिपेट' धर्तीच्या टॅंकवर बसविलेली तोफ, एक इञ्जनावर मोटरसायकली, कित्येक मशीनगनी आणि मुबलक रायफली, अशी गनीमी योद्ध्यांना लाभली.

मुख्य आघाडीलगत असलेल्या जिल्ह्यांत गनीमी तुकड्या व खुद्द लाल पलटण यामध्यें निकट सहकार्य होऊं शकतें. यामुळें तेथील गनीमी-योध्यांना शस्त्रास्त्रें व दारूगोळा मिळविणें, तुलनात्मकदृष्ट्या सोपें पडतें, परंतु सामान्य नियम असा आहे कीं, गनीमी गटांना पूर्णपणें स्वतःच्या पायावर उभे राहण्यास उत्तेजन दिलें जातें. किंबहुना, दरएक गनीमी गटानें आपल्याला लागणारी सारी युद्ध-सामुग्री शत्रूच्या खिशाला खार लावूनच मिळविली पाहिजे असें सोविएट सरकारचें सामान्य धोरण असतें.

आमचे गनीमी-योद्धे वारंवार ह्मणतात—"आह्माला एखादी जर्मन रायफल अगर मशीनगन जवळ बाळगणेंच पत्करतें, कारण त्यांना लागणारीं काडतुसें मिळविणें फारच सोपें जातें! शत्रूवर एखादा अचानक हल्ला चढविला कीं, काडतुसेंच काडतुसें!" परंतु, अलग पडून शत्रूच्या कैचीत सापडल्यामुळें गनीमी गटांना लगतच्या लाल-सैन्याजवळून तातडीनें विमानांच्या द्वारा कुमक घ्यावी लागली अशीही उदाहरणें घडतात.

सोविएट सरकारच्या चालू लष्करी शिक्षण योजनेनुसार, १८ ते ५० या वयोमर्यादांतील एकजात सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना लष्करी शिक्षण घ्यावें लागतें. याचा अर्थ हा कीं यापुढें सोविएट यूनिअनमधील दरएक तगड्या स्त्रीला अगर पुरुषाला रायफल वापरतां येईल; मशीनगन चालवितां येईल; आणि कुलपी गोळे झुगारतां येतील.

जर्मनीच्या नात्सी गुंडांकरवीं नव्यानें व्यापल्या जाणाऱ्या कोणत्याही जिल्ह्यांत गनीमी गट उभारण्याची पूर्वतयारी, या दृष्टीनें ही योजना अमोल आहे.

त्याचप्रमाणें, युद्धाला तोंड लागण्यापूर्वींच, लक्षावधी स्त्री-पुरुष नागरिकांना सोविएट सरकारनें शस्त्रास्त्रें वापरण्याचें प्राथमिक शिक्षण दिलें होतें, हें देखील विसरतां कामा नये. युद्धापूर्वींच, सोविएट यूनिअनच्या या टोकापासून ते त्या टोकापर्यंत सर्वत्र हजारो रायफल-क्लब प्रस्थापित झालेले होते. या क्लबांतून स्त्रीपुरुष नागरिकांना निशाणबाजी शिकविली जात होती. शिवाय, असंख्य गिरण्याकारखान्यांचे आणि सामाईक-शेतांचे स्वतंत्र रायफल-गट

होते ते निराळेच. पटाइत नेमबाजीच्या वाढीखातर या रायफल-गटांमध्यें देशभर साम्यवादी चढाओढी लावल्या जात.

शस्त्रें असतील तर तीं कशीं वापरावयाचीं हे सोविएट जनतेला अवगत आहे. आमच्या गनीमी-योध्यांकरवीं जर्मनांच्या विरुद्ध वापरलीं जाणारी अर्धीअधीक हत्यारें खुद्द जर्मनांच्याच हातांतून हिसकावलेलीं असतात यांतच खरी मेख आहे!

—:०:—

# ३

# गनीमी मोहिमांचा कार्यक्रम

नेपोलिअननें एकदा असें विधान केलें होतें ह्मणतात कीं, 'लष्करी सेना कूच करते ती आपल्या पोटाच्या जोरावर'. (आणि नेपोलिअनच्या 'भव्य सैन्यानें' चिरफाळलेल्या कपड्यांत, उपाशी पोटानें, रशियांतून पीछेहाट घेतली तेव्हां त्या सैन्यावर हीच गोष्ट सिद्ध करण्याचा प्रसंग गुदरला!) नेपोलिअनचें वरील विधान जर खरें तर मग, 'अलीकडच्या यंत्री फौजा लढतात त्या पेट्रोल पुरवठ्याच्या जोरावर,' हेंही तितकेंच खरें.

अन्न, दारूगोळा आणि पेट्रोल हे आजकालच्या युद्धांतील मूलभूत घटक आहेत. या घटकांचा पुरवठा नसेल तर, माणसें काय अगर यंत्रें काय, फार दिवस टिकाव धरूं शकणार नाहींत. खुद्द सरकारी सैन्याचें मुख्य काम कोणतें असेल तर तें ह्मणजे शत्रूच्या आणि यंत्रबलाचा विध्वंस करणें हेंच होय. या गनीमी तुकड्यांचें मुख्य काम जर कोणतें असेल तर तें शत्रूची रसद तोडणें हेंच होय; रसद तोडीत असतां शत्रूच्या मनुष्यबलाची व यंत्रबलाची थोडीशी हानी करतां आली तर दुधांत साखर पडली!

ह्मणून, गनीमी धोरणांतील सर्वसाधारण कार्यक्रमाचा भर असतो तो शत्रूची रसद तोडण्यावरच. शत्रूच्या आघाडीकडे अन्न वाहणाऱ्या लॉऱ्या, पेट्रोलच्या टाक्या आणि दारू-गोळ्याच्या गाड्या रोखल्याच पाहिजेत. त्याचप्रमाणें युद्ध सामुग्रीची व इतर पुरवठ्याची कोठारें उडवून दिलींच पाहिजेत.

आज जर्मन शत्रूनें उभारलेली आघाडी एक हजाराहून अधिक मैलांची आहे. अर्थातच, आपली भिन्न पोट ठाणीं आणि मुख्य ठाणें यामध्यें दळणवळण राखण्यासाठीं शत्रूला अत्यंत वक्तशीर धर्तीची योजना अमलांत आणावी लागते. अर्थातच, शत्रूच्या राक्षसी युद्ध यंत्रांत एकसूत्रीपणा आणणाऱ्या या दळणवळणाच्या नसा कापणें, हें गनीमी-योध्यांचें दुसरें काम ठरतें.

आजकालच्या विमानांचा वेग आणि हल्ल्याचा पल्ला फारच वाढला आहे. मागच्या लढाईच्या वेळीं विमानांची मातब्बरी इतकी वाढलेली नव्हती. या विमानांच्या वाढलेल्या शक्तीमुळें, आघाडीपासून कित्येक मैल मागें असलेल्या तळावर बस्तान राखून आजची विमानें आपल्या आघाडीवरील फौजांना हातभार लावूं शकतात. शत्रूच्या पिछाडीच्याही कित्येक मैल पलीकडे असणाऱ्या या विमान-तळावर हल्ला करण्याला वैमानिक चढाई खेरीज अन्यमार्ग नसतो; हे तळ इतर शस्त्रास्त्रांच्या पल्ल्याबाहेर असतात. त्याचप्रमाणें अलीकडे नजर-भुलावणीचें शास्त्र इतकें प्रभावी झालें आहे कीं त्याच्या साह्यानें पिछाडीवरील विमान-तळ छपविणेंही सुलभ झालें आहे.

प्रत्यक्ष भडिमाराच्या टापूपासून लष्करी अम्मलदारांचे मुख्य ठाणें कांहीं अंतरावर पिछाडीला असेल तर त्याला धोका पोचूं शकत नाहीं, हा जुना सिद्धांत मागच्या लढाईत लागू करण्यांत आला होता. पण सोविएट यूनियनमध्यें हा सिद्धांत मातीमोल ठरला आहे. यूरोपांत जर्मनींनें इतर देशावर स्वाऱ्या केल्या तेव्हां त्या देशांतील जनता गांगरून गेली होती. हिटलरच्या प्रतिकार करण्याच्या बाबतीत जनता उदासीन होती. अर्थातच नात्सी दरोडेखोरांना मुख्य आघाडीच्या पाठीशी सर्वत्र सुरक्षितपणें वावरतां येई. पण रशियाची गोष्ट निराळी आहे; रशियन मुलखाच्या पावला पावलागणिक शत्रूला जबरदस्त धोका आहे; मग तो नात्सींनीं व्यापलेला मुलूख असो अगर न व्यापलेला असो.

गनीमी—योध्यांनीं नात्सी ऑफिसरांचीं पिछाडीचीं मुख्य ठाणीं उध्वस्त केलीं तर त्यांत नवल तें कोणतें ? शत्रूचीं ठाणीं उडवून देणें हें आपलें कर्तव्यच आहे असें ते मानतात. आणि कांही गनीमी-गटांनीं तर ठाणीं उडवून देण्यांतच खास वाकबगारी संपादन केली आहे.

अखेर, मानसिक कुव्वतीचा सवाल घ्या. गेल्या महा-युद्धांत आघाडीच्या मार्गावर असलेल्या सैनिकाचा प्रवास, तसेंच पाहिलें तर, सुरक्षितपणें घडत असे. आघाडीवरील खंदकांत कांही काळ गुजरल्यानंतर या सैनिकाला बहुधा आराम—विश्रांतीखातर पिछाडीवर रवाना करण्यांत येई.

पण चालू सोविएट-जर्मन युद्धामध्यें ह्या सोइस्कर शिरस्त्याचें संपूर्ण उच्चाटन झालें आहे. आज, आघाडीला जाण्यासाठीं लॉरींत बसलेल्या जर्मन पायदळ सैनिकाला एक क्षणाचाही आराम मिळणें दुरापास्त झालें आहे. "पुढच्याच वळणावर एखादी छुपी मशिनगन माझ्यावर गोळ्या ओकणार नाहीं कशावरून ?" ही अखंड धास्ती त्याच्या उरांत धडधडत राहते ! आणि विश्रांतीखातर त्याला "पिछाडीला" रवाना केलें जातें तेव्हां, "मी झोपेंत असतांनाच एखादा गनीमी-योद्धा माझी खांडोळी करणार नाहीं कशावरून ?" ही धडकी त्याच्या कवटींत थैमान घालीत राहते !

आम्हीं अनेक जर्मन कैद्यांच्या जबान्या ऐकल्या आहेत; आणि त्यांच्या अंगावर मिळालेले अनेक कागदपत्र वाचून पाहिले आहेत. या जबान्यांचें आणि कागदपत्रांचें आपण पुढें निरीक्षण करूं तेव्हां एक गोष्ट उघड होईल. ती ही की, या अखंड धास्तीमुळें जर्मन सैनिकांची रग झपाट्यानें मोडली जात आहे; आणि त्यामुळें त्यांची लढण्याची मानसिक कुव्वतहि खचत चालली आहे; त्यांचे मनःसामर्थ्य ढासळूं लागलें आहे.

गनीमी धोरणाचा सर्वसाधारण कार्यक्रम हा अशा प्रकारचा असतो. हा कार्यक्रम अमलांत आणण्यासाठीं कोणते डावपेंच खेळावे लागतात ? पुढील प्रकरणांत या गनीमी डावपेचांचें निदर्शन केलें आहे. या डावपेंचाबद्दलचें श्रेय सर्वस्वी आमच्या गनीमी-योध्यांना

दिलें पाहिजे. कारण त्यांच्याच पुढाकारचातुर्याच्या आणि योजक-बुद्धीच्या उदरांतून हे डावपेंच जन्मास आले आहेत. केव्हां काय व कसें करावयाचे हें आमच्या सोविएट मूमींत सामान्य लोकच ठरवितात.

—0—0—

# ४

# शत्रूची रसद कशी तोडावयाची ?

घोड्यांनीं ओढल्या जाणाऱ्या मालगाड्यांची एक रांगच्या रांग एका रशियन रस्त्यानें चालली होती. जर्मन सैन्याला अत्यावश्यक अशी सामुग्री या गाड्यांत भरलेली होती. गनीमी स्काउटांनीं अर्थातच या गाड्यांच्या मालिकेवर आपुलकीनें नजर ठेवली होती ! पुरे दोन दिवस त्यांची टेहळणी चालू होती. पण नात्सी पाहारेकऱ्यांना याचा मागमूसहि नव्हता. गाड्या कोणत्या मार्गानें कोणीकडे जाणार याबद्दल अंदाज बांधून गनीमी स्काउटांनीं आपल्या तुकडीला रिपोर्ट कळविला.

यानंतर गनीमी चतुराई कसाला लागली. गनीमी योध्यांनीं जंगलांतून मालगाड्यांच्या ताफ्यावर अनेकवार गोळीबार केला. नात्सी संरक्षक दलाला जंगलांत चाल करून येण्याचा मोह पडावा अशी गनीमी-योध्यांची इच्छा होती. परंतु या जाळ्यांत नात्सी फसले नाहींत.

अखेर, सोविएट विमानी हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्याच्या इराद्यानें, हा गाड्यांचा ताफा आसऱ्याखातर जंगलांत घुसला. गनीमी-योध्यांच्या दृष्टीनें पाहतां ही आयती चालून आलेली संधी होती ! त्यांनीं ताफ्याच्या पुढच्या बाजूच्या झाडांना आग लावून दिली; आणि मग पिछाडीकडून व डाव्या उजव्या बगलांवरून जोराचा मशीनगन-हल्ला सुरू केला.

जर्मन लोकांची भीतीनें पुरी गाळण उडाली. जळत्या झाडांच्या धुराचा वास लागल्यामुळें गाड्या खेचणारे घोडे पुरे बिथरून गेले; ते गाड्यांसकट मोकाट उधळले ! कित्येक नात्सी घोड्यांच्या टापाखालीं सांपडले. हां हां म्हणतां नात्सी लोकांत हाहाःकार उडाला. नात्सी सैनिकांनीं सैरावैरा पोबारा केला ! त्यांनीं ४२ लाऱ्या, रसदीनें भरलेल्या ३२ माल-गाड्या, यांत्रिक साधनसामुग्री आणि तीन रेडियो, इतका सारा माल जंगलांत सोडून दिला. पळालेल्या सैनिकांपैकी ३७ जणांना पाठलाग करून ठार करण्यांत आलें.

## पुलालगत छुपा हल्ला !

दुसरा एक साधन सामुग्रीचा जर्मन काफला एका रस्त्यानें शेजारच्या नदीवरील पुलाकडे येत आहे, अशी बातमी गनीमी तुकडीला मिळाली. गनीमी-योध्यांनीं तो पूल उडवून दिला, व मग ते पुलाच्या आसपासच्या झाडाझुडपांत दबा धरून बसले.

रात्रीच्या सुमारास तो जर्मन काफला नदीकाठीं येऊन थडकला. पुल उडवून देण्यांत आलेला पाहून जर्मन थबकले. त्यांच्या इंजिनियरांनीं तरता पूल उभारण्याची तयारी सुरु केली. याच सुमारास दबा धरून बसलेल्या गनीमी योध्यांनीं मशिनगनमारा सुरू केला. शत्रूच्या अनेक गाड्या व माणसें अशी गर्दी नदीकाठीं जमली होती. त्यामुळें गनीमी योध्यांना गोळ्या चालविण्यास ऐसपैस निशाण मिळालें होतें. दारूगोळ्यानें भरलेल्या अनेक लॉऱ्यांत भडके उठले—लॉऱ्यांची शकलें हवेंत उडालीं. या भडक्यामुळें नात्सींच्या कत्तलींत अधिकच भर पडली. सारा काफलाच्या काफला धुळीला मिळाला. मुबलक सामुग्री हस्तगत करून आमचे गनीमी-योद्धे फिरून जंगलाच्या कुशींत शिरले.

गनीमी-योध्यांच्या एका घोडेस्वार तुकडीनें अशीच आणखी एक कामगिरी पार पाडली. याही चकमकींत गनीमी-योध्यांनीं नदीवरील पूल उडवून देऊन एक रसद पुरविणारा मोटर गाड्यांचा नात्सी काफला रोखला. पुल नाहीं हें पाहून पुढच्या लॉऱ्या थांबल्या. त्याबरोबर, काफला थांबला का हें पाहण्यासाठीं मागच्या गाड्यांचे ड्रायव्हर खालीं उतरले. त्याचप्रमाणें, काफल्याबरोबरची संरक्षण तुकडीही पुलाची पाहणी करण्यासाठीं पुढें आली. याचवेळीं आमच्या गनीमी-योध्यांनीं मशीनगन-मारा सुरू केला.

नात्सी लोकांत गोंधळ माजला. त्यांच्यापैकीं कांहींजणांनीं पवित्रा घेऊन प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला; पण बहुसंख्य लोक आपल्या लॉऱ्या टाकून पळून गेले ! या पळपुट्या नात्सींचा गनीमी घोडेस्वारांनीं जारीनें पाठलाग केला. त्यानीं २४ सैनिक व एक ऑफिसर अशा पंचवीस जर्मनांना ठार केलें.

सप्टेंबर ११ ची गोष्ट; स्मोलेन्स्क भागांतील डोलिंका नांवाच्या खेड्यालगत, एका गनीमी तुकडीनें अशा एका जर्मन काफल्यावर छुपा हल्ला चढविण्याचें ठरविलें. या तुकडीचा कमांडर युद्धापूर्वी एक स्टेशनमास्तर होता.

ज्या रस्त्यानें तो काफला जाणार होता त्या रस्त्यावर गनीमी—योध्यांनीं मोठमोठ्या दगडांचे ढिगारे रचून ठेवले, व मग ते लगतच्याच झाडींत दडून बसले. काफल्याला त्या जागीं थांबणें भाग पडलें. आपापल्या लॉऱ्यांतून खालीं उतरून जर्मन लोकांनीं दगड काढावयास सुरवात केली. तात्काळ गनीमी योद्ध्यांनीं रायफलींचा व मशीनगन—फेरींचा भडिमार सुरू केला. पेट्रोलच्या टांक्या वाहणाऱ्या लॉऱ्यांनी पेट घेतला व स्फोटामुळें त्यांचा धुव्वा उडाला. याप्रमाणें १२ वाहनांचा नाश झाला व वीस नात्सी ठार झाले.

## रेल्वे कामगार व कोळी

रेल्वेंत धंदेवाईक काम करणाऱ्या आमच्या लोकांनीं दारूगोळा वाहणाऱ्या शत्रूच्या आगगाड्या उडवून देण्याच्या कामांत खास वाकबगारी संपादन केली आहे. या लोकांच्या एका गनीमी तुकडीची गोष्ट; या तुकडीचा कमांडर एक रेल्वे कामगारच आहे. शत्रूची एक गाडी एंजिनांत पाणी घेण्यासाठीं थांबलीं असतां तिच्यावर गनीमी तुकडीनें हल्ला चढविला. त्यानीं गार्डांना ठार केलें, मुबलक दारूगोळा काबीज केला, व मग गाडीला आग लावून दिली.

पण येवढें करूनही त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यानीं एंजिन अलग करून सायडिंगच्या रुळावर नेलें व तेथून तें भर वेगांत सोडून दिलें. सायडिंगवर पलीकडच्या बाजूला एक जर्मन मालगाडी उभी होती त्या मालगाडीवर ते भरधांव वेगांत सुटलेलें इंजिन जाऊन दाणकन् आदळलें ! इंजिनचा व कांहीं मालगाड्यांचा चुराडा झाला.

पाण्यावर गनीमी-मोहिमा पार पाडण्यांत खास कौशल्य संपादन केलेले गनीमी-लढवय्ये आहेत ते निराळेच. वीस वर्षांपूर्वी यादवी युद्धांत लढलेल्या एका कोळ्याच्या नेतृत्वाखालीं एक द्नीस्टर नदीकाठच्या कोळ्यांची गनीमी तुकडी आहे. या तुकडीनेंही नात्सी हरामखोरांना चांगलाच हात दाखविलेला आहे.

या तुकडीचे सारें भांडवल म्हणजे चार मोटर बोटी. या बोटींतून ते नात्सींच्या तरत्या पुलावर, नात्सींच्या वापरांतील इतर पुलांवर, आणि काठावरच्या नात्सी पाहरेकऱ्यांवर अचानक झडपा घालतात. त्यांची सारी कारवाई रात्री चालते. आवाज न व्हावा म्हणून हे लोक वल्ही अगर शिडें उपयोगांत आणतात. आणि काम होतांच, उंच बांबूच्या बेटांनीं झाकलेल्या नदीकाठच्या खबदाडींत अगर नाल्यांत दडून बसतात.

ऑगस्ट १२ ची हकिगत. द्नीस्टर नदी ओलांडण्यासाठीं नात्सींनीं चार मोठाल्या तोफा मचव्यांवर चढविल्या होत्या. त्या जागीं नदीचें पात्र खूपच रुंद होतें. नात्सी मचवे पात्राच्या मध्यावर पोंचले न पोंचले तोंच आमच्या गनीमी बोटी दडल्या जागेंतून अकस्मात बाहेर पडल्या, व त्यांनीं भर वेगांत मचव्यावर हल्ला चढविला. प्रथम मचव्यावरील जर्मनांना मशीनगनमाऱ्यानें ठार केल्यानंतर त्यानीं चारी तोफा नदीच्या तळाशी पाठविल्या ! मात्र, तोफा बुडविण्यापूर्वी त्यानीं तोफांचे गोळा भरण्याच्या बाजूचे महत्वाचे भाग काढून घेतले.

दुसऱ्या एका ठिकाणीं त्यानीं नात्सींच्या कांहीं रसद पोंचविणाऱ्या मचव्यांवर चढाई केली. मचव्यांतील संरक्षक दळाला ठार करून त्यानीं चार मालानें भरलेले मचवे पाताळांत रवाना केले. पुढें त्यांची व नात्सींची पुरेपूर तीन आठवडे खडाजंगी चालू होती. या तीन आठवड्यांत त्यानीं नात्सींचे नदी ओलंडण्याचे सात प्रयत्न हाणून पाडले. शिवाय त्यानीं ५० नात्सींना यमसदनाला पाठविले, व वीस तोफा इतर सामुग्री बुडवून टाकली !

## रशियन तंट्या भिल्ल

उकलाद्वा गांवांत गनीमी- योद्ध्यांनीं जी कामगिरी बजावली ती पाहिली कीं तंट्या भिल्लाच्या परंपरेची आठवण झाल्यावाचून राहात नाहीं. त्या गांवचा कबजा घेणाऱ्या जर्मन कमांडरनें मालमत्ता, गुरेंढोरें आणि धान्याचीं पेवें, अशी शेतकऱ्यांची सारी साधनसामुग्री जप्त केली होती. हा सारा लुटीचा माल नात्सींनीं जेव्हां रेल्वे स्टेशनावर नेला तेव्हां स्टेशनावर गनीमी योध्यांनीं हल्ला चढविला; संरक्षक दलावर कुरघोडी केली; सारा माल आपल्या कबजांत घेतला, व मग तो फिरून उकलाद्वाच्या शेतकऱ्यांना ज्याचा त्याला परत केला !

ब्येलो-रशियांतील एका गनीमी-तुकडीचा पुढारी स्तेपान पेत्रोविच यानें आपल्या मोहिमांबद्दल खालील हकिगत नमूद केली आहे:—

नात्सींचा एक मालाचा मोटर-काफला आमच्या टापूंतील एका रस्त्यानें जाणार असल्याचें कळलें. आम्ही त्या रस्त्यावर एका मोक्याच्या जागीं भला मोठा भुइ-सुरुंग लावून ठेवला. तो काफला एकदाचा तेथवर आला ! सर्वांत पुढच्या लॉरीमुळें सुरुंगाचा स्फोट झाला, लॉरी हवेंत उडाली. मागच्या लॉऱ्या चाकें वळविण्यापूर्वींच खाली पडणाऱ्या पहिल्या लॉरींवर आदळल्या ! नात्सी काफल्याचा आम्ही धुव्वा उडवून दिला.

"दुसऱ्या एका जागीं तो रस्ता जंगलांतून जातो. रस्त्याच्या पातळीपासून चार फूट उंचीवर राहील अशा बेतानें आम्ही एक बळकट तार दोन्ही बाजूच्या झाडांच्या बुंध्याना बांधली. ही छोटीशी कारवाई आम्ही रात्रीच्या पांघुरणाखालीं दडून पार पाडली होती.

"तांबडें फुटण्यापूर्वीच्या अंधुक प्रकाशांत तीन रसद पोंचविणाऱ्या जर्मन लॉऱ्या जंगलांत घुसल्या. त्या भरधांव चालल्या होत्या. भर वेगांतच पहिली लॉरी तारेवर आदळली. ड्रायव्हर आणि पाहरेकरी तात्काळ ठार झाले. मधली लॉरी पुलावर आदळून निकामी झाली. आणि अगदी मागच्या तिसऱ्या लॉरीचा दोन कुलपी गोळे झुगारून समन्वार घेण्यांत आला!"

ग्रा. क्र. ६१८६

## डुकरें आणि कोंबड्या

शत्रूच्या दळणवळणावर याप्रमाणें शेकडों हिकमतींनीं हल्ले चढविण्यांत येत आहेत. बोल्शे पोरोस्कोविची नांवाच्या खेड्याशेजारून एक रस्ता जातो. या रस्तालगतच्या एका शेतांत तेथील गनीमी-योद्धे दबा धरून बसले.

अपेक्षेप्रमाणें जर्मन मोटरसायकलवाल्यांचा एक गट रस्त्यानें आला. तो त्या शेतालगत येऊन थडकतांच आमच्या गनीमी योध्यांनीं आपल्या लपण्याच्या जागेवरूनच डुकरें आणि कोंबड्यांचें एक भलें मोठें खिल्लार रस्त्यावर सोडलें! जर्मन लोकांना बहुधा खाण्यापिण्याची टंचाई पडते. हें खिल्लार पाहून नात्सींच्या तोंडाला पाणी सुटलें. 'आकाशांतील बापानें खैर केली' असें त्यांच्या मनानें घेतलें. आपल्या सायकलीवरून उतरून त्यानीं कोंबड्या-डुकरांचा पाठलाग सुरू केला. ऐन याच मोक्यावर आमचे गनीमी योद्धे त्यांच्यावर तुटून पडले. तीस नात्सी मोटरसायकलींचा चुराडा करण्यांत आला!

दुसरा एक प्रसंग: जर्मनांचा एक मोटर-काफला आघाडीकडे चालला होता. ते उन्हाळ्याचे दिवस होते. साहजिकच काफल्याबरोबरचे नात्सी उकाड्यामुळें जेरीला आले होते. त्यांनीं आपला काफला एका सरोवराकाठीं थांबविला; काठांवर संत्री खडे केले व सरोवरांत डुंबण्यास सुरवात केली.

हें सारें छपलेल्या गनीमी-योध्यांनीं पाहिलें होतें. अकस्मात् त्यांनीं हल्ला चढविला. संत्र्यांना ठार करून त्यानीं डुंबणाऱ्या नात्सींनाही जलसमाधी दिली. नऊ मोठ्या लॉऱ्यांना आग लावून देण्यांत आली. त्यांतील उपयोगी माल अर्थातच गनीमी-लढवय्यानीं आधींच काढून घेतला होता!

आघाडीच्या एका विभागांत लाल-सैन्यानें एका जर्मन टँक-काफल्याला गराडा दिला होता. नात्सी टँक व इतर मोटर गाड्या पेट्रोलच्या अभावीं अडकून पडल्या होत्या. कांहीं वेळानें अनेक नात्सी विमानें आलीं व हवाई छत्र्यांना अडकवून त्यांनी पांच पेट्रोलचीं पिपें खालीं सोडलीं.

पण वैमानिकांनीं थोडीशी चूक केल्यामुळें तीं पेट्रोल-पिपें कांहीं अंतरावर एका जंगलाच्या मोकळ्या आवारांत जाऊन पडलीं. जर्मन लोक त्या जागीं पोंचण्यापूर्वींच गनीमी-योद्धे तेथें जाऊन थडकले. त्यांनीं ती पेट्रोल पिपें दाट जंगलांत नेऊन दडवून ठेवलीं. जर्मन काफल्याची पुरी निराशा झाली. पुढें लाल बॉबर विमानांनीं येऊन नात्सी काफल्याचा चक्काचूर करून टाकला!

## रशियन गनीमी-योध्यांचें अनुकरण

सोवियत-जर्मन युद्धाला तोंड लागल्यानंतर थोड्याच दिवसांत रशियन गनीमी-योध्यांच्या पराक्रमाची खबर साऱ्या दुनियेंत पसरली. ही खबर ऐकून नात्सींनीं व्यापलेल्या यूरोपच्या

इतर देशांतील जनतांची उदासीनता विरून गेली; या जनतांतूनही, रशियन गनीमी-योध्यांचे उदाहरण डोळ्यासमोर ठेऊन लढणारे गनीमी स्त्रीपुरुष निर्माण होऊं लागले.

पूर्व आघाडीवरील नात्सी युद्ध-यंत्रांतील सर्वांत कमजोर दुवा म्हणजे त्यांची शेकडो मैल पल्ल्याची रसद पोचविण्याची योजनाच होय. पूर्व आघाडीवर रसद पोचविणाऱ्या काफ-ल्यांना गिळंकृत यूरोपचा अर्धाअधिक मुलूख तुडवावा लागतो.

**पोलंडमध्यें** नात्सी लोक भयभीत होऊन गेले आहेत; पोलंडच्या गनीमी–योध्यांनीं त्यांना सतावून सोडले आहे. रसद पोचविणाऱ्या नात्सी आगगाड्यांना एखाद्या अद्भुत शक्तीनें शाप दिल्याप्रमाणें अपघात घडतात. नुकतीच घडलेली गोष्ट: वॉरसॉ गांवाजवळ एक नात्सी मालगाडी भरवेगांत चालली असतां एका सैन्य–वाहक गाडीवर आदळली ! २०० वर नात्सी सैनिक जखमी अगर ठार झाले; मालाची कल्पनेपाड हानी झाली; आणि कित्येक तासपर्यंत त्या लाइनवरील दळणवळण बंद ठेवावें लागलें. गेस्तापोनें ( जर्मन सी. आय. डी. ) अनेक पोलिश रेल्वे कामगारांना अटक केली.

या धरपकडीचा बदला घेण्यासाठीं पोलंडच्या रेल्वे कामगारांनीं आणखी एक गाडी पाडली ! हा " अपघात " डॅविस गांवापासून दहा मैलावर घडला. २०० जर्मन ऑफिसर व सैनिक ठार झाले. गनीमी–योध्यांनीं १८० घोडे, मुबलक दारुगोळा आणि खाण्यापिण्याच्या जिनसांचे कित्येक पेटारे काबीज केले.

**युगोस्लावियांत** तीच गत. तेथील गनीमी-योध्यांनीं मैलाचे मैल तारांचे खांब उचकटून टाकले आहेत; आणि कितीएक रेल्वे स्टेशनांतील सिग्नलींचे हात गडप केले आहेत ! कानूनिक गांवातील स्फोटक दारूच्या कारखान्याचा नात्सीनीं कबजा घेतला. त्यानंतर थोड्याच दिवसांत गनीमी–योध्यांनीं हा कारखाना सुरुंग लावून हवेंत उडवून दिला.

**नॉर्वे, रुमानिया, ग्रीस, फिनलंड** आणि **बाल्टिक देश** येथेंही, रसद पोचविणाऱ्या जर्मन काफल्यांवर हल्ला झाल्याची खबर आम्हांला मिळाली आहे. या देशांतील गनीमी–योध्यांच्या कामगिरीची सविस्तर माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे.

**एक आढावा**

सोविएट गनीमी–योध्यांच्या हल्ल्यामुळें जर्मन रसद पोचविणाऱ्या काफल्यांचें व इतर साधनसामुग्रीचें किती प्रमाणांत नुकसान होत आहे याची कल्पना खाली दिलेल्या आढाव्या-वरून होईल. ब्येलो-रशियांतील अवघ्या मिनूस्क विभागांतील मोहिमांचा हा आढावा आहे. केवळ अडीच महिन्यांच्या मुदतीत या विभागांत आमच्या गनीमी–योध्यांनीं खालील वट्ट कामगिरी बजावली:—

| | |
|---|---|
| ठार करण्यांत आलेले जर्मन ऑफिसर व सैनिक | २५०० |
| उडवून देण्यांत आलेलीं मुख्य ठाणीं | ३ |
| उडवून देण्यांत आलेले पूल | ११२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

चकाचूर:

| | |
|---|---|
| रणगाडे | ३९ |
| चिलखती गाड्या | १२ |
| विमानें | २२ |
| लॉऱ्या | ४०० |
| मोटरगाड्या | ४५ |
| मोटर सायकली | २०० |
| सायकली | ४५० |
| घोडे आणि घोडा–गाड्या | २०० |
| उडवून देण्यांत आलेलीं दारूगोळ्याचीं कोठारें | ८ |
| नष्ट करण्यांत आलेले दारूगोळ्याचे व रसद पोचविणारे मोटारींचे काफले | १५ |
| उडवून देण्यांत आलेल्या तेल–टांक्या | ७५ |
| जाळून टाकण्यांत आलेल्या, साधन सामुग्रीनें भरलेल्या वॅगनी | ४७ |

**लेनीनग्राड** विभागांतील दुसऱ्या एका गनीमी तुकडीचा अवघ्या चार दिवसांचा आढावा ( नोव्हेंबर १ ते ५ ):—

| | |
|---|---|
| पाडण्यांत आलेलीं नात्सी विमानें | ५ |
| नष्ट करण्यांत आलेले रणगाडे | ११ |
| ,, ,, चिलखतीगाड्या | ६ |
| ,, ,, पायदळ व सामुग्री वाहणाऱ्या लॉऱ्या | १६३ |
| उडवून देण्यांत आलेल्या पेट्रोल-टांक्या | १५ |
| नष्ट करण्यांत आलेल्या मोटारी | १६ |
| ,, ,, मोटर सायकली | १०० |
| ,, ,, वाहतुकीच्या लॉऱ्या | ११ |
| उडवून देण्यांत आलेली दारूगोळ्याचीं कोठारें | ३ |
| ,, पूल ( पैकीं ७ रेल्वेचे पूल ) | ४१ |
| टेलिग्राफ व टेलिफोनच्या तारा कापल्याचीं स्थळें | ५९ |
| पाडण्यांत आलेली दारूगोळा वाहणारी रेलगाडी | १ |
| ठार करण्यांत आलेले ऑफिसर | २८ |
| ,, ,, सैनिक | १६०० |

त्याच विभागांत दुसऱ्या एका गनीमी–तुकडीनें नोव्हेंबरच्या अवघ्या एक आठवड्यांत खालील सामुग्रीचा धुव्वा उडविला : २६ विमानें, ७ टॅंक, २ ‘ व्हिपेट ’धर्तीचे टॅंक; ७ पेट्रोलची कोठारें; २ चिलखती गाड्या; २९० लॉऱ्या; २८ मोटारी; ३३ मोटरसायकली; ५ रसदीची कोठारें; २ पुरवठ्याचे तळ; याशिवाय, त्यांनीं ३६ पूल उडवून दिले व १२३ जर्मन ऑफिसर आणि १५१४ सैनिक ठार केले, ते निराळेच!

——०——०——

# ५

# विमान–तळावर झडप कशी घालावयाची

" आग–बाटली " म्हणजे गनीमी-योध्यांच्या आवडीच्या हत्यारांतील एक हत्यार होय. " आग-बाटली " ही मामुली बाटल्यांसारखीच असते; फरक इतकाच कीं तींत अत्यंत स्फोटक असें एक पातळ रसायन भरलेलें असतें; कधीं कधीं पेट्रोल आणि क्रिओसोट नांवाचें एक द्रव्य यांचे मिश्रण या बाटल्यांत भरलेलें असतें. या " आग-बाटल्या " कुलपी गोळ्यांप्रमाणेंच हातानें झुगारावयाच्या असतात. टॅंक निकामी करण्याच्या कामीं या " आग-बाटल्या " अत्यंत परिणामकारक असतात. पण आमचे गनीमी–योद्धे त्यांचा जमीनीवरील विमानें जाळून टाकण्यासाठीं उपयोग करतात.

एका खेड्याशेजारीं नात्सी शत्रूनें एक विमानतळ तयार केला आहे, असें आमच्या एक गनीमी–तुकडीला समजलें. रात्र होतांच सोळा गनीमी–योद्धे तळाच्या जागीं जाऊन थडकले. त्यांनीं चारचारांचे चार गट बनवून कामें वाटून घेतलीं. कामाची वाटणी अशी:—

(१) जमीनीवरील विमानें नष्ट करणें.
(२) पेट्रोलच्या टांक्या उडवून देणें.
(३) जर्मन वैमानिक–गटानें तळ दिलेल्या शेजारच्या खेड्याला आग लावून देणें.
(४) पाठलाग करण्याच्या इराद्यानें नात्सी आले तर त्यांना दबा धरून ठार करणें.

पहाटे तीनच्या सुमारास गनीमी–योध्यांनी विमानतळावर पाहारा करणाऱ्या जर्मन सैन्यावर कुरघोडी केली. दहा मिनिटांच्या आंत आग–बाटल्यांनीं आणि कुलपी गोळ्यांनी तीन जुळ्या इंजिनांच्या बॉंबर विमानांचा धुव्वा उडवून दिला; पेट्रोलच्या टांक्या उडवून दिल्या, आणि खेड्याला आगही लावून दिली ! तेथें झडलेल्या हमरातुमरीच्या चकमकींत विमान–तळाचे १० नात्सी ठार झाले.

दुसऱ्या एका जिल्ह्यांतील गोष्ट; कित्येक दिवसपर्यंत गनीमी स्काउटांनीं एका जर्मन विमान–तळावर करडी नजर ठेवली होती. नात्सी पाहारा कितपत कडक आहे, त्याचप्रमाणें कोण लोक केव्हां येतात–जातात याबद्दलची बित्तंबातमी गनीमी–योध्यांना हवी होती.

ही माहिती हस्तगत होतांच एक दिवस, रात्रीच्या पांघरुणाखालीं दडून गनीमी–योद्धे लहान लहान गटानें त्या विमान–तळाजवळ गेले. स्काउटांनीं हलक्या पावलानें जाऊन जर्मन संत्र्यांना कायमचे झोपविलें; हें काम त्यांनीं कोठलाही आवाज न होऊं देतां पार पाडलें. तरीपण एका नात्सी शिपायानें कशीबशी धोक्याची सूचना दिलीच. तात्काळ विमान–तळाच्या लोकांनीं प्रतिकार करण्यास सुरवात केली. परंतु गनीमी–योध्यांनीं त्यांच्यावर कुरघोडी करून २२ नात्सींना यमसदनाला पाठविलें !

नंतर आमच्या लोकांनीं १२ मोठ्या विमानांवर पेट्रोल ओतून तीं पेटवून दिलीं. शिवाय, दोन लॉऱ्याभर मशीनगनीं, रायफलीं, दारूगोळा, आणि कित्येक पेट्रोलचीं पिपें अशी

सामुग्री हस्तगत केली. आपल्या "आग-बाटल्या" फिरून भरण्यासाठीं त्यांना पेट्रोल हवेंच होतें.

सोकोल गांवानजीक एक गनीमी-तुकडी आहे. तिचें नांव "लाल-सोकोल." या या गांवापासून सुमारे १० मैलांवर नात्सी लोकांनीं एका जंगलांतल्या मोकळ्या आवारांत विमान-तळ उभारला आहे, असें "लाल-सोकोल" च्या योध्यांना समजलें. त्यांनीं बरेच दिवस या तळावर टेहळणी ठेवली, व मग एकदिवशीं, पेट्रोल घेण्यासाठीं पुष्कळशीं विमानें तळावर उतरलेलीं पाहून हल्ला चढविण्याचें नक्की केलें.

"लाल-सोकोल"च्या योध्यांनीं प्रथम तळाभोंवतालच्या जंगलाला आग लावून दिली. ही आग झपाट्यानें फैलावली. विमान-तळाचे नात्सी शिपाई साहजिकच ही आग विझविण्याच्या भरीस पडले. ते ज्वाला रोखण्यांत गुंतले असतां आमच्या गनीमी-योध्यांनीं इकडे १५ विमानांचा विध्वंस करून टाकला !

दुसऱ्या एका विमान-तळावर हल्ला करतांना हेंच हुलकावणीचें धोरण कामास आणलें गेलें. नात्सी विमान-तळापासून कांहीं अतरावर असलेल्या एका नात्सींच्या बंगल्याला गनीमी योध्यांनीं आग लावून दिली. नात्सी लोक ती आग विझविण्यांत गुंतले असतां इकडे आमच्या लोकांनीं "आग-बाटल्यां"चा आणि कुलपी गोळ्यांचा मनमुराद उपयोग करून कितीतरी नात्सी विमानें जमीनदोस्त करून टाकलीं !

दुसऱ्या एका गनीमी तुकडीनें आणखी एक नवी युक्ति योजली. तुकडीचे दोन गट पाडण्यांत आले. एका गटानें, नात्सी वैमानिक स्टाफ ज्या इमारतींत राहात होता त्या इमारतीवर आपल्या मशीनगनी रोखल्या. रखवालदारांचा निकाल लावल्यानंतर त्या इमारतीवर अखंड मशीनगन-मारा जारी ठेवण्यांत आला. यामुळें वैमानिक व इतर तंत्रज्ञ वगैरे नात्सी लोकांचा विचका उडाला. याचा फायदा घेऊन तिकडे दुसऱ्या गटानें "आग-बाटल्या" झुगारून चार मोठीं विमानें जाळून खाक केलीं.

आणखी अशाच एका विमान-तळावर गनीमी-योध्यांनीं झडप घातली तेव्हां तर नात्सींच्या दुःखावर आमच्या लोकांनीं डागण्या दिल्या असेंच म्हटलें पाहिजे. या मोहिमेंत गनीमी-योध्यांनीं सहा "हिंकेल" धर्तीचीं नात्सी विमानें कबजांत घेतलीं. पैकी पांच त्यांनीं जागच्या जागींच बेचिराख केलीं. परंतु सहाव्या विमानाची जरा निराळ्या रीतीनें वासलात लावण्यांत आली. युद्धापूर्वीं ट्रॅक्टर-ड्रायव्हरचें काम करणारा एक गनीमी-योद्धा या तुकडींत होता. त्याचें नांव सोलिन. सोलिननें आपल्या सामाईक-शेताच्या विमान-क्लबांत तरुण किसानांना विमान उडविण्यास शिकविण्याचेंही काम केलें होतें. सहावें विमान सोलिननें खास आपल्या ताब्यांत घेतलें, व तें नात्सी विमान तळावरून उडवून नेऊन सरळ लाल-पलटणीच्या हवालीं केलें !

याच मोहिमेंत आमच्या लोकांनीं विमान-तळालगत भुयारांत ठेवण्यांत आलेल्या पेट्रोलच्या टाक्या सुरुंग लावून उडवून दिल्या; विमानें ज्यावर उतरतात तें मैदान निकामी करून टाकलें; आणि तळाच्या सर्व इमारतीना आग लावून दिली ! शिवाय, विमान-तंत्रज्ञ, रेडियो-पटु, आणि रखवालदार, मिळून २५ नात्सींना मृत्यूच्या हवाली करण्यांत आलें. एक छोटेखानी रेडियोस्टेशन, पांच मोटारी आणि लॉऱ्या, सात मोटर सायकली, आणि मुबलक शस्त्रास्त्रें अशी सामुग्री गनीमी योध्यांच्या पदरांत पडली.

——०×०——

# ६

# नात्सी ऑफिसरांनाही आराम नाहीं

नात्सी लष्करी ऑफिसरांच्या मुख्य-ठाण्यांचा कबजा घेणें हेंच कांहीं गनीमी-गटांनीं आपलें खास कार्यक्षेत्र बनविलें आहे. मुख्य-ठाण्यांवरील या गनीमी झडपामुळें नात्सी लष्करी नेतृत्वांत तर गोंधळ माजतोच. पण शिवाय, या अचानक हल्ल्यामुळें नात्सींचे महत्वाचे लष्करी कागदपत्र हमखासपणें हातीं येतात. या कागदपत्रांचा सोविएट लष्करी नेत्यांना कल्पनेपार उपयोग होतो.

लेनीनग्राड विभागांतील गोष्ट; एका गनीमी तुकडीला जंगलांतील टेलिफोनच्या तारा दृष्टीस पडल्या. या तारा मोठ्या काळजीने लावण्यांत आल्या होत्या. नात्सींनीं नजर भुलावणीचा प्रयत्न केला होता. गनीमी-योध्यांनीं त्या तारांचा माग काढावयास सुरवात केली. माग काढतां काढतां आमचे लोक रस्त्यापासून सुमारे तीन मैल दूर असलेल्या एका बंगल्यापर्यंत जाऊन थडकले. हा बंगला एका जंगलखात्याच्या अधिकाऱ्याचा. त्यांत नात्सी ऑफिसरांनी आपलें मुख्य ठाणें थाटलें होतें!

गनीमी योध्यांनीं बंगल्याच्या रखवालदारांची ताकत अजमावली; ऑफिसरांच्या मोटारींच्या रोजच्या हालचाली नीट पाहून ठेवल्या; आणि संदेश वाहणाऱ्या स्वारांची ये-जा केव्हां किती प्रमाणांत असते याचीही टांचण केली. यानंतर, एके रात्री त्यांनीं बंगल्यावर झडप घातली. सात ऑफिसरांना आणि अठरा सैनिकांना ठार केलें. दोन लॉऱ्या, दोन स्टाफच्या मोटारी, आणि एक रेडियो-स्टेशन, यांचा चक्काचूर केला. एक मशीनगन, सहा ऑटोमॅटिक रायफलीं, कांहीं पिस्तुलें, व मुबलक दारूगोळा गनीमी योध्यांच्या हातीं लागला.

आणखी एका गनीमी तुकडीची हकिगत; तीखां बुमाशकोव व फिओडोर पावलोस्की हे दोघे या तुकडीचे आवडते पुढारी. या दोघानांही आतां "सोविएट यूनिअनचे बहाद्दूर" ही पदवी देण्यांत आलेली आहे. या तुकडीनें तर वर दिलेल्या तुकडीवरही ताण केली. वरच्या गनीमी-योध्यांनी अवघ्या एका जर्मन तुकडीचें मुख्य ठाणें गारद केलें. पण या तुकडीनें एका मोठ्या नात्सी पलटणीचें मुख्य ठाणें गारद केलें. सारा स्टाफच्या स्टाफ या गनीमी योध्यांनीं कापून काढला. पस्तीस मोठ्या मोटारी, अनेक मोटरसायकली आणि सायकली गनीमी-योध्यांनीं हस्तगत केल्या.

ब्येलो-रॉशेयांतील एका गनीमी तुकडीनें अशाच एका नात्सी पलटणीच्या मुख्य ठाण्यावर झडप घातली तेव्हां नात्सींचा एक मोठा जनरल ठार झाला! आमच्या योध्यांनीं लष्करी स्टाफचे इतर ऑफिसरही ठार केले. या हल्ल्यांत, नात्सींचे अनेक महत्वाचे लष्करी कागदपत्र गनीमी-योध्यांच्या हातीं लागले. अर्थातच लाल-पलटणीच्या नेत्यांकडे त्यांची योग्य खबरदारीने रवानगी करण्यांत आली.

टेहळणी करीत असतां एका गनीमी तुकडीला नात्सींच्या एका ठाण्याचा सुगावा लागला. या ठाण्यावर नात्सींनी मोठा कडक पाहारा ठेवला होता. हें सावज केवळ आपल्याच्यानें निभावणार नाहीं ह्मणून गनीमी-योध्यांनीं शेजारच्या एका लाल सैन्याच्या तुकडीकडून मदत मागविली. मदत येतांच संयुक्त हल्ला चढविण्यांत आला. हा हल्ला अर्थातच पूर्णपणें यशस्वी झाला. नात्सी ठाण्याचा धुव्वा उडाला! दुसऱ्या एका नात्सी जनरलची ठाम समजूत होती कीं, रशियांतदेखील, पिछाडीवर ठाणें उभारल्यास आराम मिळेल. या वेडगळ समजुतीमुळें, याही जनरल साहेबांना आणि त्यांच्या स्टाफ ऑफिसरांना आपल्या प्राणांची किंमत द्यावी लागली!

जेव्हां जेव्हां एखादे नात्सी ठाणें आपल्या आवाक्याबाहेरचें आहे असें गनीमी-योध्यांना वाटतें तेव्हां तेव्हां ते त्या ठाण्याचा ठावठिकाणा लगतच्या लाल सैन्याच्या तुकडीला कळवितात. मग लाल-तुकडी येऊन ठाण्यांचा खरपूस समाचार घेते. अगर एखादें लाल सैन्याचें बॉंबर विमान येतें, व नात्सी अधिकाऱ्यांसकट ठाण्याच्या ठिकऱ्या उडवून देतें.

नात्सींनीं व्यापलेल्या टांपूतील खेड्यापाड्यांत मुद्दाम राहणाऱ्या लोकांची भूमिका फारच महत्वाची असते. नात्सी ऑफिसरांच्या मुख्य ठाण्यांविरुद्ध चाललेल्या या गनीमी मोहिमांत तर या भूमिकेचें महत्व फारच खुलून दिसतें. एखाद्या जर्मन तुकडीनें आपलें ठाणें एखाद्या खेड्यांत थाटलें रे थाटलें कीं, हे मागे राहणारें लोक तात्काळ ती बातमी आपल्या गनीमी-योध्यांना कळवितात. बातमी कळतांच, रात्रीच्या प्रहरीं समंधाप्रमाणें वावरणाऱ्या कांहीं व्यक्ती तेथवर जातात, आणि खिडक्यांतून कुलपी गोळे आंत भिरकावतात!

मग, जर्मन लष्करी ऑफिसर आमच्या गनीमी-योध्यांवर दात ओठ खातात यांत नवल तें कोणतें? गनीमी-योध्यांनीं रसद तोडावी; दळणवळणाच्या योजनांचा विचका करावा; आणि गाफील सैनिकांना वेळी अवेळीं ठार करावें; हाच केवढा तरी उपद्रव! पण याच्याही पुढें जाऊन हे गनीमी-योद्धे आमच्या स्टाफच्या वरिष्ठ ऑफिसरांनाही गारद करण्याचे धाडस करतात याला काय म्हणावें? हा अक्षम्य गुन्हा आहे!

——0——0——

# ७

# गनीमी-सैनिक लढायाही मारतात.

रसद तोडणें, दळणवळणाच्या योजनेचा, विमान-तळांचा, आणि नात्सी ठाण्यांचा धुव्वा उडविणें, हेंच काय तें गनीमी-योद्ध्यांचें कार्यक्षेत्र, अशी समजूत कोणीही करून घेतां कामा नये. कांहीं विभागांत गनीमी तुकड्या इतक्या बलवान, सुसंघटित व सुसज्ज झाल्या आहेत कीं, जर्मन फौजांशीं समोरासमोर लढाई देण्यासही त्या कमी करीत नाहींत.

कित्येक प्रसंगी, गनीमी-योद्धे नात्सी तुकड्यांना मुद्दाम जंगलांत अगर दलदलीच्या टापूंत अंगावर घेतात; कारण या जंगलांचा व दलदल-विभागांचा दरएक कानाकोपरा आमच्या गनीमी-बहाद्दरांच्या सरावांतला असतो. दरएक झुडूप आणि पायवाट त्यांच्या अंगवळणीं पडलेली असते. याप्रमाणें शत्रूला अनोळख्या आखाड्यांत खेचल्यानंतर आमचे योद्धे त्यावर सारी ताकत एकवटून तुटून पडतात. नुकत्याच घडलेल्या अशा एका लढाईंत गनीमीं-योद्धयांनीं तब्बल तीन तासपर्यंत नात्सी फौजेशीं लढाई जारी ठेवली होती. नात्सींची अर्थातच अतोनात हानी झाली.

नात्सींनीं एखाद्या गांवावर पुरा कबजा बसविला तरी त्यामुळें गनीमी-लढवय्यांच्या कामांत कोठल्याहीप्रकारें व्यत्यय येत नाहीं. ब्येलो-रशियांतील द्वीना नदीच्या तीरावरील मूराझ गांवांचीच हकिगत घ्या. या गांवाचा कबजा घेऊन नात्सींनीं तेथें ३०० सैनिकांची छावणी ठोकली होती.

रात्रीच्या पांघरुणाखालीं आमचे गनीमी-सैनिक आस्ते आस्ते चहूंबाजूनीं गांवांत घुसले. ज्या ज्या घरांत नात्सी सैनिक अगांतुक पाहुणे बनले होते त्या त्या सर्व घरांना त्यानीं गराडा दिला; व मग पाहुण्यांना मनःपूर्वक कुलपी गोळे चारले!

नात्सी सैनिक धावऱ्या धावऱ्या दरवाजे गांठून धांवणार, तोंच त्यांना ऑटोमॅटिक रायफलींच्या आणि मशीनगनींच्या गरगागरम खांडोळ्या चारण्यांत आल्या. (या रायफली व मशीनगनीं म्हणजे "जर्मनीमे बना हुवा माल"च होता!) नात्सी सैनिक व आमचे गनीमी-योद्धे यांमध्यें कित्येक तासांची पवित्र्याची लढाई झाली. गनीमी-योद्धयांनीं छावणीचें ठाणें जमीनदोस्त केलें; आणि १० लॉऱ्या, २० मोटरसायकली, १२ मशीनगनी, कांहीं ऑटोमॅटिक रायफली व मुबलक दारूगोळा वगलेस मारून अखेर जंगलाची वाट सुधारली!

स्मोलेन्स्क विभागांतील त्राइत्स्कोये नांवाच्या खेड्यालगत, जर्मन अगांतुक्यांवर असाच एक हल्ला चढविण्यांत आला होता. हे जर्मन लोक एका मोठ्या कोठारांत झोपतात याचा गनीमी स्काउटांनीं आधीच पत्ता काढून ठेवला होता.

एका शाळा मास्तराच्या नेतृत्वाखाली गनीमी-योद्धे बेधडक गांवात घुसले. नात्सी रखवालदारांना त्यांनीं गोळ्या घालून ठार केले, व मग त्या कोठारांत कुलपी गोळे झुगारले. म्होरक्या शाळा मास्तरानें खुद्द स्वतः कोठाराच्या छपरांवर कित्येक "आग-बाटल्या" भिर-कावल्या. जेव्हां आंतील नात्सी पळून जाण्याच्या यत्नास लागले तेव्हां त्यांच्यावर मशीनगन मारा करण्यांत आला. कोठारांतील एकजात सारा नात्सी ठार झाला.

दुसऱ्या एका गांवावर एका गनीमी तुकडीने हल्ला चढविला तो अशाच धर्तीचा. मॅक्झिम यूकोवूस्की हा त्या तुकडीचा कमांडर. गनीमी हल्ला होतांच नात्सी छावणीचे सैनिक गांव सोडून एका लगतच्या खेड्याकडे पळाले; व तेथें त्यांनीं घाईघाईने बचावाचा पवित्रा उभारला. गनीमी योद्धयांनीं त्यांचा पाठलाग केला; व त्यांना गांठून कुलपी गोळ्यांच्या जोरा-वर त्यांची त्या खेड्यांतूनही हकालपट्टी केली.

युद्धापूर्वीच्या एका दुकान-मॅनेजरच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या एका गनीमी तुकडीनें, लाल-फौजेशीं सहकार्य करून, एकदा सारेंच्या सारें नात्सी रेजिमेंट गारद केलें.

या प्रसंगीं हल्ल्याला सुरवात झाली ती एका नात्सी संदेश-स्वारावर कुरघोडी करून. गनीमी-योद्धयांनीं आपली आवडती युक्ति कामास लावली. संदेश-स्वाराच्या रस्त्यावर त्यांनीं एक तार आडवी टाकली; व तारेची दोन बाजूनीं टोकें धरून रस्त्याच्या दोन्हीं बाजूला

ते झुडपांत दबा धरून बसले. भरधांव सुटलेला तो मोटरसायकल स्वार, जवळ येतांच त्यांनीं तात्काळ ती तार सुमारे तीन फूट वर उचलली. ताठ धरलेली तार स्वाराला धाडकन् उचकटून खड्यांत भिरकावते. बहुधा स्वाराची इहलोकाची यात्रा तेथेंच संपुष्टांत येते!

या प्रमाणें मोटर सायकल स्वाराची विल्हेवाट लावल्या नंतर गनीमी-योद्धयांनीं अर्थातच त्याचे खिसे तपासले. खिशांत महत्वाचे कागद सांपडले. लाल फौजेच्या बगलेवर हल्ला चढविण्यासाठीं, १०३ नंबरचे नात्सी पायदळ रेजिमेंट एका टेकडीकडे कूच करीत आहे ही बातमी कागदावरून मिळाली !

नाल्यांच्या आणि जंगलांतील चोरवाटांच्या साह्यानें आमचे गनीमी-लढवय्ये नात्सी रेजिमेंटच्या आधींच त्या टेकडीवर दाखल झाले, व तेथें दबा धरून हल्ल्याच्या तयारींत राहिले. नात्सीं रेजिमेंट टेकडीवर आलें तें अगदी निर्धास्तपणें. पण तें टेकडीवर चढतांच आमच्या गनीमी-योद्धयांनीं त्यांच्यावर चहूबाजूंनीं खुनी गोळीं-बार चालविला. गनीमी-योद्धयांनीं कितीतरी वेळ त्या रेजिमेंटला गुंतवून ठेवलें. अखेर, ठरल्याप्रमाणें एक लाल फौज आली व तिनें नात्सी रेजिमेंटच्या चिंधड्या उडविल्या. गनीमी-सैनिकांना मोबदला म्हणून २१ मशीनगनीं आणि कितीतरी रायफलीं मिळाल्या.

सप्टेंबर ३ ची चकमक: युद्धांपूर्वीच्या एका पोस्ट-कामगाराच्या पुढाकाराखालीं कांहीं गनीमी-वीरांनीं नात्सी लुटारूंना सफाइदार रीतीनें चकविलें. नात्सींनीं "दुनाएवो" नांवाच्या एका खेड्याचा ताबा घेतला होता. शेजारच्या "पोदबेरेझा" नांवाच्या खेड्याकडून एक नात्सी पायदळ फौज दुनाएवोला येत आहे अशी गनीमी टेहळ्यांनीं खबर आणली होती.

गनीमी-बहाद्दर पोदबेरेझाहून दुनाएवोला जाणाऱ्या रस्त्यावर अवतरले. व तेथून त्यांनीं दुनाएवोला नात्सी छावणीवर भडिमार सुरू केला. गनीमी-हल्ल्याला तोंड देण्यासाठीं नात्सींनीं तीन रायफल दळें सामोरी पाठविलीं.

मध्यंतरीं, पोदबेरेझहून ती जर्मन फौज दुनाएवोकडे येऊं लागली. हें पाहतांच गनीमी-योद्धयांनीं भडिमार थांबविला व ते छपून बसले. दुनाएवोहून आलेल्या रायफल दळांना वाटलें कीं अद्याप गनीमी लढवय्ये समोर आहेतच. त्यांनीं आपला मारा पोदबेरेझाच्या रोखानें चालूच ठेवला. पोदबेरेझाहून येत असलेल्या जर्मन फौजेला वाटलें कीं, आपणावर गनीमी हल्ला होत आहे ! त्यांनीं बचावासाठीं गोळ्या झाडण्यास सुरवात केली. गफलत ध्यानांत येण्यापूर्वीं ३० नात्सी स्वतःच्याच गोळ्यांना बळी पडले !

—o—o—

## ८

# रणगाड्यांची विल्हेवाट कशी लावावयाची ?

सोविएट जर्मन युद्धाची नुकतीच कोठे सुरवात झाली होती. एकदा तीन नात्सी टँक 'पिन्स्क' शहरांत घुसले. आपणाला पेट्रोलची टंचाई पडेल ही गोष्ट ध्यानेस धरायला ते विसरले होते. तत्पूर्वीच्या चढाईत पेट्रोल संपले कीं, शेजारच्या कोणत्याही पेट्रोल-पंपावर जाऊन

जवरीनें पेट्रोल भरून घ्यावयाचें हा त्यांचा शिरस्ता होता. पण त्यावेळीं स्टालिननें 'दग्ध-भूमी' ची घोषणा केलेली नव्हती.

हे तीन नात्सी टँक गांवाच्या एका चौकांत येऊन थबकले. गनीमी-लढवय्यांनीं तात्काळ त्यांना गराडा दिला; व मग सावधगिरीनें लगत जाऊन टँक-तोफांच्या नाळ्यांचा हातोड्यांनीं निकाल लावला. टँकांच्या अगदी लगत सरपटत जाणाऱ्या इसमाला टँक-तोफा इजा करूं शकत नाहींत हें गनीमी-झुंजाराना केव्हांच उमगलें होते.

टँक-तोफांचा याप्रमाणें चुराडा झाला होता तरी टँकच्या चिलखती भिंतीमागे ते नात्सी अद्याप सुरक्षित होते. हे पाहतांच कांहीं लोहार पुढें सरसावले. व त्यांनीं घणांचे घाव घालून चिलखत खिळखिळें करण्याचा उपक्रम सुरू केला. अखेर लोहारांच्या घावामुळें कानठळ्या फुटण्याची पाळी आल्यामुळें टँकांतील नात्सी बाहेर येऊन शरण आले !

यंत्री-फौज विरुद्ध मामुली लोक अशी जेव्हां लढाई जुंपते तेव्हां नजर-भुलावणीचे डावपेंच अत्यंत उपयोगी ठरतात. मध्यरशियांतील एका छोट्या गांवालगतची हकिगत: एक जर्मन टँक-दल कोणत्या रस्त्यानें आपल्या केंद्रस्थानी जाणार याची गनीमी-योद्धयांना खबर मिळाली. हा रस्ता एका जंगलांतून जातो. नात्सींनी रात्रीच्या प्रहरीं हा रस्ता पार करण्याचें योजलें होतें, कारण त्यांना लालसैन्याच्या बाँबर विमानांची दहशत वाटत होती.

गनीमी-लढवय्यांनी त्या रस्त्यावर तातडीनें टँकविघातक खंदक खणले, व मग ते दबा धरून बसले. शत्रूचा म्होरक्या टँक सरळ खंदकांत पडला. त्याच्या पाठीचा टँक म्होरक्या टँकवर कोसळला. त्यानंतरचे टँक रस्ता सोडून बाजूला वळले; पण त्यांतूनही तीन टँकांनीं खंदकाचा तळ गांठलाच ! बाकीचे टँक हवालदिल होऊन परत फिरले, तेव्हां त्यांच्यावर कुलपी गोळ्यांचा वर्षाव करण्यांत आला. शत्रूचा बेत पुरा ढासळला.

एकदा, एका गनीमी तुकडीच्या टेहळ्यांना वीस मोठाले जर्मन टँक दृष्टीस पडले. ते एका सखल टापूंत थबकले होते. दोन टँकांतील पॅट्रोल काढून, तें थोडें थोडें इतर अठरा टँकांत भरण्यांमध्यें नात्सी गुंतले होते. पेट्रोलच्या तुटवड्यामुळें नात्सी अडकून पडले आहेत हें ताडून गनीमी-योद्धयांनीं शेजारच्या एका लाल सैन्याच्या तुकडीला ती खबर पोचविली.

रस्त्यावर करडी नजर ठेऊन आमचे लोक दबा धरून बसले. त्यांच्या अंदाजाप्रमाणें, सुमारें सहा तासांत दोन जर्मन पेट्रोलच्या लॉऱ्या आल्या. गनीमी योद्धयांनीं रस्त्यावर मोठालीं झाडें आडवीं पाडलीं व लॉऱ्या थबकतांच त्यांचा धुव्वा उडवून दिला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लाल सैन्याचीं सुरूंगी बॉबर विमानें त्या जागेवर अवतरलीं. या विमानांनीं शत्रूच्या टँक दलाचा संथपणें चक्काचूर उडवून दिला.

चिलखती गाड्यांचीही अशीच विल्हेवाट लावण्यांत येते. चिलखती गाड्यांचा एक नात्सी काफला एका पुलाकडे येत आहे, अशी खबर लागतांच आमच्या गनीमी वीरांनीं वाटेंत खंदक खणून त्यावर नजर भुलावणी पेरली. नंतर ते या खंदकापासून कांहींशा अंतरावर दबा धरून बसले. त्यांनीं आपल्याजवळ मशीनगनी, कुलपी गोळे आणि " आग बाटल्या " सज्ज ठेवल्या होत्याच.

जर्मन चिलखती गाड्या पुलानजीक आल्या. पहिली गाडी खंदकांत कोसळली. नात्सी गाड्यांतून उतरले व खंदकांत पडलेली गाडी वर काढण्यच्या खटाटोपाला लागले. तात्काळ दबा धरून बसलेल्या गनीमी वीरांनीं, भडिमार सुरू केला. दरम्यान, कांहीं गनीमी वीरांनीं, ज्या वाटेनें गाड्या आल्या होत्या त्या वाटेवर एक मोठा भुइ सुरूंग लावून ठेवला. सभोंवार

गनीमी लोक छुपले आहेत असें पाहून रस्त्यावर उतरलेले नात्सी लगबगीनें शाबूत राहिलेल्या दोन गाड्यांत चढले; व त्यांनीं आपल्या वाटेनें परत गाड्या हाकारल्या. एका गाडीनें तो सुरूंग डंवचला व क्षणार्धांत ती हवेंत उडाली. रहातां राहिली एक गाडी; कुलपी गोळ्यांच्या वर्षावानें तिलाही बेचिराख करण्यांत आलें.

जर्मन टँकवाले नेहमी बुचकळ्यांत पडतात. त्यांनां 'इकडे आड आणि तिकडे विहीर' असें होऊन जातें. उघड्या मैदानांची कांस धरावी तर सोविएट बाँबर विमानांचा उच्छाद. बरें जंगलांची कांस धरावी तर गनीमी हल्ल्यांचा उच्छाद ! एखाद्या जंगलांत तळ देऊन, 'आपण रशियन लोकांची खाशी नजर भूल केली आहे' अशा डौलांत रहाणाऱ्या कित्येक नात्सी टँक दलांची, एकाएकीं जंगल पेटल्यामुळें होळी झालेली आहे ! जंगलांत टँकदल दिसलेंरे दिसलें कीं आमचे गनीमी वीर भोंवतालचें रान पेटवून देतात.

गनीमी—लढवय्यांपुढें मोठमोठ्या टँकांनाही हात टेकावे लागतात. चार कुलपी गोळ्यांचा एक जुडगा वगलेवरून टँकच्या जमीन चावणाऱ्या फिरत्या पट्ट्यावर अचूक फिरकावला तर मोठा टँकदेखील निकामी होतो. गनीमी वीरांनीं ही गोष्ट अनुभवानें शाबित केली आहे ! टँकचें एंजिन बहुधा मोटारीप्रमाणें पुढच्या भागांत असतें. या पुढच्या भागावर, अगर टँकच्या नाकावर, एकाच सपाट्यांत जर अनेक "आग—बाटल्या" भिरकावल्या तर हां हां म्हणतां टँक ज्वालांच्या जबड्यांत सापडतो. "आग—बाटलीं"तील पेट घेणारें पातळ रसायन टँकच्या भिंतींना बिलगतें व कांहीं वेळपर्यंत जोरानें पेट घेत राहतें. अशा स्थितींत टँक—हाक्यांना, एकतर आंतल्याआंत वांग्याप्रमाणें भाजून निघावें लागतें, अगर बाहेर येऊन गनीमी गोळीला बळी पडावें लागतें. तिसरा मार्ग रहात नाहीं.

एखादा मार्ग बिनधोक्याचा आहे अशी टँकहाक्यांची समजूत झाली, कीं ते ताजी हवा खाण्याच्या इराद्यानें आपल्या टँकांचीं झाकणें उघडतात. वाटेवरील झाडांच्या फांद्यावर लपून आमचे गनीमी वीर या संधीचा भरपूर फायदा उठवितात. झाकण उघडलेंरे उघडलें कीं बरोबर टँकच्या आंतच कुलपी गोळे अगर " आग—बाटल्या " भिरकावण्यांत ते पटाइत आहेत !

यंत्री—फौज विरुद्ध मामुली लोक, अशा लढाईंत मुख्य सवाल असतो तो मानसिक कुव्वतीचा—मनस्सामर्थ्याचा. भरधांव वेगांत मोठा टँक अंगावर येतांना पाहून एखाद्या भरजवान माणसाचीही गाळण उडून जाईल. परंतु, दरएक गनीमी शिपायाला टँकचे नाजूक भाग कोणते असातात हे शिकविल्यामुळें आतां, या चिलखती बकासुरांचे कोणला भय वाटत नाहीं. लहान लहान मुलें देखील आतां कुलपी गोळ्यांचा आणि आगबाटल्यांचा उपयोग करून या रणगाड्यांचा धुव्वा उडवितात. या मुलांच्या कामगिरीबद्दल पुढे अधिक माहिती येईलच.

पोलादी चिलखताचा आसरा मानवी चातुर्यापुढें आणि बेडरपणापुढें टिकाव धरूं शकत नाहीं. युद्धाच्या आरंभीं, नात्सी लोक गनीमी तुकड्यांचे पारिपत्य करण्यासाठीं हलके टँक व चिलखती गाड्या रवाना करीत. त्यांची अशी ठाम श्रद्धा होती कीं पोलादी चिलखतापुढें मानवी रक्तामांसाची मातब्बरी चालणार नाहीं. स्वतःची घोडचूक आतां त्यांच्या ध्यानांत आली आहे. ही अक्कल शिकण्यासाठीं, नात्सींना, जाळून खाक झालेल्या आपल्या शेकडो चिलखती गाड्यांची किंमत द्यावी लागली आहे !

—:०:—

# १

# मुलांची व बायकांची कामगिरी

नात्सी हरामखोरांनीं सोविएट यूनियनवर चढाई केली तेव्हां त्यांची केवळ विरोधी सैन्याशींच गांठ पडली, असें म्हणतां येणार नाहीं. नात्सींची गांठ पडली ती खवळून उठलेल्या सबंध सोविएट जनतेशी. " खपावें नरानें अन् रडावें नारीनें " या जुन्या म्हणीला रशियन परंपरेंत कधींच स्थान नव्हतें. आजच्या रशियांत स्त्री ही दरएक क्षेत्रांत पुरुषाच्या बरोबरीची मानली जाते. अर्थातच आज, नात्सी चढाईखोरांविरुद्ध चाललेल्या लढ्यांत स्त्रियांनीं आपला लढण्याचा अधिकार गाजवावा हें रास्तच आहे.

राहतां राहिला मुलामुलींचा सवाल. याबाबतींत, सोविएट राजवटीच्या अगदीं कट्टर विरोधकांनींही नेहमीं हें मान्य केलेलें आहे कीं, बालसंगोपनाच्या बाबतींत सोविएट यूनियन जगांतील कोणत्याही देशापेक्षां अधिक पुरोगामी आहे. मग, ज्या जीवनक्रमानें त्यानां येवढ्या सुखसोयी दिल्या त्या जीवनक्रमाचें रक्षण करण्यासाठीं, सोविएट मुलामुलींनीं स्वयंप्रेरणेनें युद्धांत सामील व्हावें यांत आश्चर्य तें कोणतें ?

गनीमी मोहिमांत स्त्रिया तीन प्रकारें भाग घेतात:—

(१) त्या खुद्द गनीमी गटांत सामील होऊन लढतात.

(२) त्या टेहळ्यांचे, संदेशवाहकांचे आणि हेरांचें काम करतात.

(३) त्या गनीमी तुकड्यांच्या खाण्यापिण्याची व जखमी भाईंच्या शुश्रूषेची व्यवस्था करतात.

एक नमुनेदार उदाहरण म्हणून आपण मारिया एस. या मुलीची कामगिरी पाहूं. वयानें ती वीस वर्षांची आहे. तिचा जन्म 'पोल्टाव्हा' गांवाशेजारच्या एका खेड्यांत झाला. जर्मन लोकांनीं याच खेड्यांत आपल्या एका तुकडीचें मुख्य ठाणें थाटलें.

स्थानिक गनीमी कमांडरने त्या ठाण्याचा विध्वंस करण्यासाठीं एक गट निवडला. या गटाला वाट दाखवण्याचें काम मारियाकडे देण्यांत आलें. आपल्या गटाला त्या खेड्याला जाण्याच्या चोर वाटा दाखवूनच ती थांबली नाहीं. ती खुद्द ठाण्यापर्यंत जाऊन थडकली; व तिनें स्वतः नात्सी ठाण्यांत खिडकीवाटे एक कुलपी गोळा भिरकावला. तिच्या हातानें चार नात्सी अम्मलदारांची या लोकींची यात्रा आटोपली ! बाकीच्या अम्मलदारांचा गनीमी-शिपायांनीं समाचार घेतला.

लाल सैन्याची एक टेहळ्यांची तुकडी शत्रूच्या पिछाडीवर वावरत होती. या तुकडीची नुकतीच एका तुकडीशीं गांठ पडली. ही गनीमी तुकडी सारीच्या सारी स्त्रियांची होती. तुकडीचा कमांडरच कायतो पुरुष होता; व तो एका सामाईक शेताचा, साठ वर्षांचा म्हातारा जिनगर होता.

या स्त्रिया, लाल सैन्याला शक्य त्या मार्गानें मदत करण्याच्या इरेषानें, मुद्दाम शत्रूच्या पिछाडीवर राहिल्या होत्या. त्यांनीं प्रथम, जर्मन भुइ-सुरुंगांचा बंदोबस्त करण्याचें काम हातीं घेतलें. जर्मन भुइ-सुरुंगांचें वास्तव्य दर्शविणाऱ्या सर्व वरपांगी खाणाखुणा त्यानीं नाहींशा केल्या. यामुळें कित्येक नात्सी गाड्या व मोटरसायकलवाले खुद्द आपल्याच सुरुंगांना बळी पडले.

आपल्या विभागांतील लाल सैन्यांच्या टेहळ्यांना, शत्रूनें कोठें कोठें भुइ सुरुंग पेरले आहेत याची त्यानीं बित्तंबातमी दिली. पुढें, त्यांनी लाल-सैन्याला जंगलांतील गुप्त वाटांनीं नात्सी पलटणींच्या एका केंद्रस्थानीं नेलें. या स्त्रियांच्या अमोल मदतीमुळें लाल सैन्याला पुढें यशस्वी हल्ला चढवितां आला.

या युद्धांत कांहीं प्रसंगीं स्त्रिया पुरुषांच्या पुढारी बनतात.

मारिया डी. या स्त्रीचीच गोष्ट घ्या.

''लाल पहार'' नांवाच्या, एका सामाईक शेताच्या कार्यकारी बोर्डाची ती मेंबर आहे. आज ती आपल्या टापूंतील एका गनीमी तुकडीची म्होरकी आहे.

या तुकडीनें नात्सींना पाणी मिळू नये म्हणून कित्येक विहिरी बुजविल्या आहेत; कित्येक महत्वाचे पूल उडवून दिलें आहेत; आणि अनेक ठिकाणीं नात्सी टेलिफोनच्या तारा कापून टाकल्या आहेत. एके प्रसंगी या तुकडीनें चार नात्सी संदेशस्वारांचा कबजा घेतला. या संदेशस्वारांकडून त्यांना असें कळलें कीं, रणगाड्यांचे सुटे भाग एके ठिकाणीं पोचविण्यासाठीं, एक नात्सी मोटर-काफला रात्रीच्या प्रहरीं त्या टापूंतून जाणार आहे. गनीमी तुकडीनें छुप्या हल्ल्याची जय्यत तयारी ठेवली.

पहाटेच्या सुमारास नात्सींचा मोटर-काफला जंगलांतल्या रस्त्यानें आला. रस्त्याच्या एका अरुंद भागावर काफला येतांच गनीमी तुकडीनें हल्ला चढविला. आठ नात्सी गाड्यांचा चुराडा झाला. रणगाड्यांचे सुटे भाग मोडून तोडून शेजारच्या दलदलींत भिरकावून देण्यांत आले.

ब्येलो–रशियांतील एका मुलीची गोष्ट; ती स्थानिक 'तरुण कम्युनिस्ट संघा'ची मेंबर आहे. तिचें नांव आना शुबोनिफ. युद्धाच्या अगदी सुरवातीच्या दिवसापासून आना आपल्या टापूंतील गनीमी तुकडीत सामील होऊन लढत आली आहे. तिच्या एका छोट्याशा कामगिरीची नोंद ठेवण्यांत आलेली आहे. एका चकमकींत ती पोटावर सरपटत सरपटत नात्सींच्या एका पेट्रोलच्या सांठ्याजवळ गेली. शत्रूचा जोराचा भडिमार चालूंच होता; पण आना डगमगली नाहीं. अखेर तिनें कुलपी गोळा झुगारून तो पेट्रोलचा सांठा भडकवून दिला.

दुसरी एक स्त्रियांची गनीमी तुकडी लेनीनग्राड शहरालगतच्या जर्मन–व्याप्त खेड्यांत वावरत असते. थोड्याच दिवसापूर्वीं या तुकडीनें एक महत्वाचा पूल उडवून दिला; व नात्सींचें एक मोठें पुरवठ्याचें कोठार जमीनदोस्त केलें. हें काम संपवून परत जात असतां त्यांनीं दबा धरून नात्सींच्या दोन टँकांचा व चार चिलखती गाड्यांचा कुलपी गोळे झुगारून निकाल लावला.

गनीमी युद्धांत विशेष कामगिरी बजावल्याबद्दल ज्या लढवय्यांचा सोविएट सरकारकडून सन्मान झालेला आहे त्या लढवय्यांत एक स्त्री आहे; तिचें नांव अन्नामोव्हा. ती कम्युनिस्ट संघाची मेंबर असून तिला, गनीमी तुकडींत धाडसानें नर्सिंगचें काम केल्याबद्दल 'लाल ध्वजाचा दर्जा' बहाल करण्यांत आलेला आहे.

एका चकमकींत, शत्रूकडून मोठ्या तोफांचा, सुरूंग फेक्यांचा, आणि मशीनगनींचा निकराचा मारा चालू असतांही, अम्रामोव्हानें रणांगणांतून बत्तीस जखमी गनीमी शिपायांना-स्वतः उचलून सुरक्षित जागी नेलें. आणि त्याच चकमकींत, अगदीं आणीबाणीच्या प्रसंगी, तिनें आपल्या एका जखमी मशीनगनवाल्याची जागा घेऊन गोळीबार जारी ठेवला!

एका म्हातान्या शेतकरणीची गोष्ट रशियांत सर्वांच्या तोंडी झाली आहे. तिची नात गनीमी तुकडीत सामील झाली होती. त्या टापूंतील नात्सी टँक दळाबद्दल माहिती हवी होती. ही म्हातारी शेतकरीण नात्सी आले तरीदेखील आपल्या खेड्यांतच राहिली होती. तिनें टँक-दळाबद्दलची माहिती मिळविण्याचें काम पतकरलें. पण तिच्या मार्गांत एक अडचण होती. ती झारशाहीच्या अमदानीत वाढली असल्यामुळें निरक्षरच राहून गेली होती. साहजिकच तिला आकडे मोजतां येत नव्हते.

परंतु तिला, आपल्या कामासाठीं वाटाणे आणि घेवड्याच्या शेंगेचे दाणे वापरण्याची शक्कल सुचली. लहान टँकांसाठीं वाटाणे, आणि मोठ्या टँकांसाठीं घेवड्याचे दाणे! तिच्या खेड्यांतून जर्मन टँक—काफला पार होत असतां नात्सींना अवघी एक म्हातारी नजरेस पडली. ती वाटाण्यांशीं कांहींतरी चाळा करीत बसून होती.. परंतु त्याच दिवशीं सायंकाळीं, गनीमी तुकडीला नात्सींच्या टँकदळाची ताकत किती आहे याची नक्की बातमी लागली.

ही बातमी गनीमी तुकडीनें शेजारच्या लाल सैन्याला कळविली. या बातमीच्या आधारें, त्या टापूंतील नात्सींच्या टँकदळांचा पराभव करण्यासाठीं कितपत तयारीची जरूरी आहे, हें लाल सैन्याला नक्की ठरवितां आलें. पुढें यशस्वी लाल सैन्य त्या खेड्यांत अवतरले तेव्हां लाल कमांडरनें म्हातान्या शेतकरणीचें व तिच्या नातीचें अभिनंदन केलें. या म्हातान्या शेतकरणीचें नांव 'अनूस्या'; आणि तिच्या नातीचें नांव 'उल्का'.

पुढच्या एका प्रकरणांतील प्रत्यक्ष माहितींत "ग्लाशा मावशी"ची चित्तवेधक भूमिका आपल्या नजरेस येईल. "ग्लाशा मावशी" ही एका गनीमी तुकडीची दुय्यम-कमांडर आहे.

## चौदा वर्षांच्या मुलानें घेतलेला सूड

'झेलोविन' गांवाशेजारी घडलेली एक गोष्ट; तेथील सामाईक शेताच्या अध्यक्षाच्या कुटुंबाला नात्सींनीं हालहाल करून ठार केलें. अध्यक्ष, त्याची म्हातारी आई, बायको आणि दोन लहान मुली, अशा सर्वांना नात्सींनीं संगिनी भोसकून ठार केलें. त्यांचा चौदा वर्षांचा मुलगा 'साशा' हाच कायतो त्या खाटकांच्या तावडींतून सुटला; त्यावेळीं तो कोठेंतरी बाहेर गेलेला होता.

साशा परत आला तेव्हां ते भयंकर दृश्य त्याच्या नजरेस पडलें. त्याच्या जिवलगांचीं वेडीविद्रीं शवें घरांत अस्ताव्यस्त पडलीं होतीं. साशानें काय केलें असावें? तो तडक झेलोविन शहराचा बचाव करणान्या लढवय्यांस जाऊन मिळाला. तुंबळ युद्धानंतर नात्सींनीं तें शहर काबीज केलें.

नात्सी टँक, चिलखतीगाड्या आणि पायदळ सैन्यानें भरलेल्या लॉऱ्या, सर्व रस्त्यांनीं झेलोविन गांवात ओतूं लागल्या—साशानें या सर्व वाहनांवर बारीक नजर ठेवली होती. कित्येक नात्सी अम्मलदारांनीं भरलेली एक स्टाफची मोठी मोटार येईतों साशा स्वस्थ होता. पण ही मोटार आवाक्यांत येतांच त्यानें तीराप्रमाणें पुढें सरसावून आपल्या हातांतील कुलपी गोळा अम्मलदारांवर झुगारला. अम्मलदारांसकट मोटारींचा खातमा झाला—पण त्या

स्फोटांत आमचा साशा, आमचा सिंहही, गेला ! नात्सींची संतापानें लाही लाही झाली; त्यांनीं साशाच्या धडाचे तुकडे तुकडे करून टाकले.

लहान मुलांच्या आणखी एका गनीमी सेनेनें एक कामागिरी बजावली ती अशी. या सेनेचे म्होरके कोण असावेत ? दोन बारा वर्षांचीं मुलें ! नात्सींच्या वापरांतला एक पूल उडवून देण्याचें सेनेनें ठरविलें. अंधाराच्या पांघरुणाखालीं दडून त्यांनीं डायनामाइटचा एक सुरुंग त्या पुलाजवळ नेला. जर्मन संत्री पेंगत होते. सुरुंग मोक्याच्या जागीं ठेवून त्यांनीं वात पेटवून दिली व मग जंगलांत पळ काढला. चिंधड्या उडाल्या.

दुसऱ्या एका गनीमी तुकडींतील एका दहा वर्षांच्या मुलानें, एका जर्मन टँक-काफ-ल्याचा पुरा धुव्वा उडविण्याच्या मोहिमेंत महत्वाची कामगिरी बजावली. हा मुलगा सोविएट 'पायोनिअर्स" दलाचा मेंबर आहे. ('पायोनिअर' म्हणजे नव्या मनूचा पायंडा घालणारा. 'पायोनिअर्स' ही 'बालचमू' सारखी अगदीं लहान सोविएट मुलामुलींची एक संस्था आहे.) ही चकमक झडली त्यावेळीं गनीमी लढवय्ये एका जंगलांत दडले होते. चहूंबाजूनीं भडिमार करून त्यांचा बीमोड करण्यासाठीं नात्सी टँकदळाची अटापेट चालू होती.

गनिमी लढवय्ये भडिमाराला भडिमारानेंच जबाब देत होते. गनीमी हल्ल्यामुळें दोन टँक आगीच्या आहारी पडले. तें पाहून, इतर टँकवाल्यांनीं काढता पाय घेणेंच शहाणपणाचें होईल, असें ठरविलें. ही नामी संधी आहे असें स्वतःशीं ठरवून त्या मुलानें एका जवळच्या वाटेनें दुसऱ्या मुक्कामाकडे धांव घेतली. तो नात्सी टँकदळाच्या पीछेहाटीच्या मार्गावर जाऊन थडकला. पळपुटे टँक लगत येतांच त्यानें म्होरक्या टँकवरच आगबाटल्यांचा वर्षाव केला. त्या टँकची होळी झाली !

मुलामुलींचा टेहळणीच्या कामाला विशेष उपयोग होतो. व्हलादिमीर मिरानोव्ह नांवाच्या एका बाल-म्होरक्याच्या बालसेनेनें, कितीतरी वेळा खुद्द लाल सैन्याला महत्वाची खबर पुरवून शत्रूला नामोहरम करण्यास हातभार लावला आहे.

तेरा वर्षांचा यूजेन झेलिन्स्की आणि त्याचा मित्र पॉल त्रोपको या मुलांचीच गोष्ट घ्या. एक दिवस, त्यांच्या टापूंत, एके ठिकाणीं नात्सी सैन्याची मोठी जमवाजमव चालल्याचें या मुलांनीं छपून पाहिलें. त्यांनीं तात्काळ ही खबर एका सोवियत चिलखती आगगाडीच्या कमांडरला पोचविली. क्षणाचाही विलंब न लागतां कमांडरनें चिलखती आगगाडी नात्सीच्या आंगावर घालून जाणाऱ्या फौजांचा विचका उडवून दिला !

'दोनेत्स' नदीच्या खोऱ्यांतील स्तालिनो विभागांत, तीन 'पायोनिअर' बच्चांनीं जी करामत केली ती पाहिली कीं आमच्या गनीमी बालकांच्या निग्रही योजकबुद्धीचें कोणालाही कौतुकच वाटेल.

या 'पायोनिअर' त्रयमूर्तींना एक इटालियन सैनिकांचा गट रस्त्यावर भेटला. सैनि-कांच्या मनोरंजनाखातर त्रिकुट गाऊं-नाचूं लागलें. सैनिक घोळका करून गंमत पहावयास उभे राहिले. इटालियन सैनिकांचा घोळका वाढत चालला. गर्दी खूप वाढली आहे असें पाहून ती तीन मुलें एकाएकीं शेजारच्या गल्लींत गडप झालीं-तेथून त्यांनीं गर्दीवर कुलपी गोळ्यांचा वर्षाव केला. ! एक अम्मलदार व नऊ फॅसिस्ट सैनिक जागच्या जागीं ठार झाले. हें सारें मुलांनीं इतकें अचानकपणें पार पाडलें कीं, फॅसिस्ट गुंड भानावर येण्यापूर्वीच मुलें पसार होऊं शकलीं.

आंद्रे कोंद्रात्येव या तरुण मुलाची गोष्ट सांगणें तर खास अगत्याचें आहे. जर्मनांच्या ताब्यांत गेलेल्या एका शहरावर आंद्रेच्या गनीमी तुकडीनें हल्ला चढविला तेव्हां आंद्रेनें शूर-वीराची कामगिरी बजावली. गनीमी लढवय्यांनीं पाहारेकऱ्याला ठार करून दारूगोळ्याच्या कोठाऱ्याला आग लावून दिली. या आगींत नात्सींची खूपच युद्ध सामुग्री व रसद जाळून खाक झाली. प्रसंगीं जुंपलेल्या लढाईत गनीमी-योध्यांनीं अम्मलदार व सैनिक मिळून ८५ नात्सी ठार केले आणि मुबलक साधन सामुग्रीही हस्तगत केली.

आंद्रेनें काय केलें. ? आंद्रे स्वत: रांगत, सरपटत शत्रूच्या मुख्य ठाण्यापर्यंत जाऊन थडकला. कुलपी गोळ्यांचा वर्षाव करून त्यानें ठाणेंच्या ठाणें हवेंत उडवून दिलें. सोळा नात्सी अम्मलदार ठार अगर घायाळ झाले ! पण आमचा आंद्रेही त्या कुलपी धमक्यांत मरण पावला .. ...

**' मान्या 'ची गोष्ट**

नात्सी लुटारूंनीं जेव्हां ' नोव्होमेली 'हें खेडें ताब्यांत घेतलें तेव्हां ग्राम पंचायतीचा अध्यक्ष मिखाइल प्रेंको हा गावांतून निसटला. त्यानें स्थानिक गनीमी तुकडीत आपलें नांव दाखल केलें. आपली बायको ' ओल्गा ' आणि १३ वर्षांची मुलगी ' मान्या 'यांना [illegible]

नात्सींनी ओल्गाला अटक केली; आणि नवऱ्याबद्दल माहिती काढण्यासाठीं ते तिला घालूनपाडून प्रश्न विचारूं लागले. ओल्गाने माहिती सांगण्याचें साफ नाकारलें. त्याबरोबर नात्सी हारामखोरांनीं तिला सार्वजनिक चौकांत फांसावर लटकविलें. आणि खेड्यांतील सर्व लोकांना जबरदस्तीनें चौकांत हांकारून तें भेसूर दृश्य पहावयास लाविलें. सर्व नागरिकांना धडा देण्याचा नात्सींचा इरादा होता.

मान्याला नात्सी कमांडरच्या समोर हजर करण्यांत आलें. कमांडर अस्खलित रशियन भाषेंत मान्याशीं बोलूं लागला. त्यानें तिला ममतेनें वागविलें.

" मुली, त्या खुर्चीवर बैस. नीट बैस, भिऊं नको. "

" मला भीतीबिती नाहीं वाटत " —मान्या म्हणाली.

" ठीक आहे; हें बघ मान्या, तुझी आई फारच वाईट होती. आम्हाला मदत करण्याचेंच तिनें नाकारलें. पण तूं आम्हाला मदत करशीलच—खरं ना ? "

" हो, मी मदत करायला तयार आहे "—मान्या म्हणाली.

" तुझे बाबा कुठे गेले आहेत तें सांग पाहूं ? आम्हीं त्याना कांहींएक इजा करणार नाहीं. आम्ही त्याना परत आणूं. मग तूं बाबांजवळ मजेनें राहूं शकशील. समजलीस कां काय म्हणतोय तें ? "

" ठीक आहे !—चल, आतां झटपट सारं कांहीं सांगून टाक... मी तें लिहून घेतों"—कमांडरनें टेबलावरचा एक मोठा चाकू उचलून पेन्सिलीला टोक केलें व तो लिहिण्याच्या तयारीत मान्याला म्हणाला:—

" एक गोष्ट मात्र ध्यानांत ठेव. खोटंनाटं कांहीं सांगशील तर, आम्हीं तुला कडक शिक्षा करूं "

"नाहीं, मी खोटंनाटं कांहीं सांगणार नाहीं"—मान्या म्हणाली.

"किती शहाणी बाळ! हें घे पेपरमीट. तूं सारं कांहीं नीट सांगितलंस तर तुला आम्ही खूप खूप खाऊं देऊं."

मान्या टेबलाजवळ गेली व कमांडरच्या शेजारी एका खुर्चीवर बसली. तिनें एकवार आपल्या केसावरून हात फिरवून ते नीट सावरले. नंतर टेबलावरची एक पेन्सिल उचलून घेऊन ती बोटामध्यें फिरवीत मान्या कांहींकाळ स्तब्ध राहिली. मग अकस्मात तिने तो टेबलावरचा मोठा चाकू उचलला, आणि सारी ताकत एकवटून तो नात्सी कमांडरच्या छातींत भोसकला!

यानंतर लवकरच लाल पलटणीनें तें खेडें फिरून आपल्या ताब्यांत घेतलें. मान्याला नात्सींनीं अर्थातच सार्वजनिक चौकांत फासावर लटकविलें होतें. तिचें शव कोठे मिळालें नाहीं. पण ज्या झोपडींत त्या नात्सी कमांडरनें डोळे पांढरे केले होते, त्या झोपडीशेजारी लाल पलटणीच्या लोकांनीं एक लहानसें स्मारक उभारलें. आज तेथें एक लहानसा मातीचा उंचवटा असून त्यावर एक फलक उभा केलेला आहे. फलकावर लाल-पलटणीचा तारा असून ताऱ्याच्या खालच्या बाजूला एक अगदी त्रोटक अर्पणपत्रिका आहे—"लाल पलटणीकडून ... .. मान्यास".

——0——0——

# १०

# लाल सैन्याशीं सहकार

गनीमी-योद्धे आणि खुद्द लाल सैन्य यांमध्यें किती निकट सहकार असतो हें दर्शविणारीं कांहीं उदाहरणें वर दिलींच आहेत. या सहकारामुळें जर्मन कमांडवर किल्येकवेळा आणी-बाणीचे प्रसंग गुदरलेले आहेत. अनेक प्रसंगीं, नात्सी फोजा ऐन हमरातुमरीनें लाल फौजांशीं लढण्यांत चूर असतांनाच गनीमी—लढवय्यांनीं त्यांच्यावर पिछाडीवरून मारा केलेला आहे. अशावेळीं अगदी आणीबाणीच्या मोक्याला नात्सींना दोन तोंडावर लढणें भाग पडतें.

लाल सैन्याच्या चिलखती गाड्यांच्या एका काफल्याचे कमांडर कॅप्टन क्रुम्टिस्की, यांना शत्रूच्या पिछाडीवर कार्य करण्याचा एकदा प्रसंग आला. त्यांची व एका गनीमी तुकडीची भेट घडली. त्या भेटीनंतर, त्यांनीं त्या गनीमी तुकडींतील उत्कृष्ट संघटणेबद्दल व शिस्तीबद्दल अचंबा व्यक्त केला आहे.

युद्धामुळें उध्वस्त झालेल्या एका खेड्यालगत लाल सैन्याच्या लोकांना एका म्हातारीची गांठ पडली. तिनें त्यांना एका तरुणाचा पत्ता दिला. त्या तरुणानें त्यांना एका जंगलांत नेलें. जंगलाच्या शेजारी जातांच त्या तरुणानें शीळ घालून एक निशाणी केली. निशाणी होतांच

खांद्यावर जर्मन ऑटोमॅटिक रायफल लटकविलेला एक शेतकरी, कांहीं झाडांच्या मागून सामोरा आला.

त्या शेतकऱ्यानें क्रुस्टिस्कीला जंगलाच्या अगदी गाभ्यांत नेले. तेथें गनीमी तुकडीचे मुख्य ठाणें छपविण्यांत आलें होतें. क्रुस्टिस्कीला एक अस्सल लढवय्यांची तुकडी तेथें नजरेस पडली. त्यांच्याजवळ मुबलक शस्त्रास्त्रें होतीं इतकेंच नव्हे तर त्यांनीं कैद करून आणलेला एक नात्सी अम्मलदारही होता! गनीमी तुकडीकडून कॅप्टन क्रुस्टिस्कीला शत्रूच्या हालचालीं-बद्दल महत्वाची माहिती मिळाली.

उत्तरेच्या आघाडीवर, लेनीनग्राड विभागांत, एका गनीमी तुकडीला शत्रूच्या एका बड्या विमानी काफल्याचा सुगावा लागला. हा काफला एका विमानतळालगतच लष्करी पवित्र्यांत एकवटलेला होता. त्या ठिकाणी नात्सींनीं यंत्री तुकड्यांचा सक्त पाहारा ठेवलेला होता. गनीमी लढवय्यांनीं लाल सैन्याशीं संबंध जोडून जय्यत तयारीनें विमानी काफल्यावर एकजुटीने हल्ला चढविला. हा हल्ला शंभर टक्के यशस्वी होऊन नात्सींचा घाट मातीस मिळाला.

आजवर, गनीमी शिपायांनीं ऐन मोक्यावर कित्येक जखमी लाल सैनिकांचे प्राण वाच-विलेले आहेत. बेलोक्रिसा नांवाचा एक लाल सैन्यांतील राजकीय शिक्षक एक दिवस घायाळ होऊन एका तळ्याच्या काठीं पडलेला गनीमी-योद्धयांच्या नजरेस आला. त्यांनीं बेलोक्रिसाला तात्काळ जंगलांत नेले व दोन दिवस त्याची शुश्रूषा केली. त्याला थोडेसें बरें वाटूं लागतांच गनीमी लोकांनीं ताटीवर घालून त्याला पन्नास मैलावरच्या एका लाल सैन्याच्या ठाण्यावर पोचविले. मार्गांत कामचलाऊ ताफ्यांच्या साह्यानें त्यांनीं दोन सरोवरेंहीं ओलांडलीं! तेथून एका लाल वैमानिकानें भरधांव विमान सोडून बेलोक्रिसाला इस्पितळांत पोचविलें.

लेनीनग्राड विभागांत, लाल सैन्याच्या कांहीं अम्मलदारांना एकदा असें कळलें कीं, शत्रूच्या पिछाडीवरील एका गनीमी तुकडीला अन्नाची टंचाई पडलेली आहे. लाल अम्मल-दारांनीं तावडतोब विमानानें रसद पाठविण्याचें ठरविलें.

रास्परतोव्ह, खारितोनोव्ह आणि तमाएव्ह या तिघा वैमानिकांनीं आपलीं विमानें अन्नाच्या पार्सलांनीं गच्च भरलीं आणि एका अंधाऱ्या रात्रीं गनीमी तुकडीच्या दिशेला उड्डाण सुरू केलें. त्यांनीं आपलीं विमानें अगदीं खालच्या पातळीवर ठेवली होतीं. जंगलांतील उंच झाडांचे शेंडे विमानांच्या चाकांचें चुंबन घेत होते असें म्हटलें तरी चालेल. वैमानिकांना गनीमी ठाण्याची दलदलीच्या टापूतील जागा सांपडली. गनीमी ठाण्यांतून पूर्वसंकेतानुसार निशाणी मिळतांच तीं अन्नाची पार्सलें खालीं टाकण्यांत आलीं. दुसऱ्या दिवशीं आणखी एक पार्सलांचा हप्ता पोंचविण्यांत आला. कांहीं दिवसांनंतर लेनीनग्राडच्या लाल सैन्याच्या ठाण्यावर गनीमी तुकडीनें पाठविलेले संदेशसवार येऊन धडकले. संदेशसवारांनीं गनीमी तुकडीच्या वतीनें लालसैन्याचे कृतज्ञतापूर्व आभार मानले.

गनीमीतुकड्या आणि लालसैन्य यांमधील सहकाराचा अगदीं उठावदार दाखला म्हणजे रोस्टोव्हच्या लढाईचा. नात्सी जनरल फॉं क्लीस्ट यांच्या यंत्री फौजांचा गेल्या नोव्हेंबरमध्यें रोस्टोव्हच्या लढाईत पुरा खातमा उडाला, तो या सहकारामुळेंच.

एका बाजूला, लाल सैन्यानें फॉं क्लीस्ट यांच्या डाव्या बगलेवरील फौजांचा फन्ना उड-विला; आणि लाल सैन्याच्या इतर फौजांनीं रोस्टोव्हमधून नात्सींचे कळपचे कळप हाकारून काढले. तर दुसऱ्या बाजूला, गनीमी योध्यांनीं फॉं क्लीस्ट यांच्या पिछाडीवरून नात्सी

दळणवळणाच्या योजनेचा सबगोलंकार उडवून दिला !

जर्मनीच्या वरिष्ठ कमांडनें नोव्हेंबर २९ रोजीं जें बातमीपत्र प्रसिद्ध केलें त्यांत नात्सीनीं सरळ कबूली दिली आहे. गनीमी-लढवय्यांच्या कामगिरीचा पाठपुरावा करण्यांत या नात्सी अधिकृत कबुलीहून अधिक स्पष्ट अशी साक्ष मिळविणे कठीण. हें बातमीपत्र म्हणतें:–

"रोस्टोव्ह गांवाचा ताबा राखणाऱ्या आमच्या फौजा हुकमानुसार गांवाचा मध्यभाग सोडून मागें हटत आहेत. रोस्टोव्हच्या जनतेनें जर्मन सैन्याच्या पिछाडीवरून या लढाईत भाग घेतला. या **बेकायदेशीर** कृत्याबद्दल जनतेचे पारिपत्य करण्यासाठीं आम्ही रोस्टोव्हमधून मागें हटत आहोंत."

पुढें, नात्सींच्या एका अधिकृत बकवाजबहाद्दरानें दात ओठ खाऊन अशी तक्रार केली कीं, रोस्टोव्हच्या लढाईत, गनीमी शिपायांनीं आणि इतर नागरिकांनीं जें कर्म आचरलें त्यामुळें "आंतरराष्ट्रीय कायद्याचा खून झाला आहे !" सैतान धर्मग्रंथावर हात ठेऊन शपथ घेऊं लागला म्हणजे हंसण्याखेरीज गत्यंतर राहात नाहीं !

ह्याच बकवाजबहाद्दर पुढें बरळला:—

"अशा गनीमी लढाईशी जर्मन सैनिकांचा परिचय नाहीं. या **भामट्या** युद्धनीतीला तोंड देण्यासाठीं आपल्या नीतींत जरूर ते फेरफार करण्यास जर्मन वरिष्ठ कमांडला थोडासा कालावधी लागला."

या विधानांत खरें पाहतां तथ्य नाहीं, हें पुढच्या प्रकरणावरून दिसून येईल. एकजात खवळून उठलेल्या साऱ्या जनतेशीं लढणें म्हणजे काय याचा अर्थ नीट समजावून घेण्यास जर्मन लोकांना आजतागायत, थोडाथोडका नाहीं तर पुरा सहा महिन्यांचा कालावधी मिळाला आहे.

—0—0—

# ११

## गनीमी-लढवय्यांबद्दल नात्सींना काय वाटतें ?

व्यापलेल्या प्रदेशांतील रस्त्यांवर, जंगलालगत, आणि खेडोपाड्यांत, नात्सीनीं गनीमी लढवय्यांच्या धोक्याबद्दल नोटिस लटकवण्याचा उपक्रम सुरू केल्याला आतां कांहीं दिवस लोटले आहेत. या नोटिसांवर खालील शब्द असतात.

**"खबरदार ! येथें गनीमी धोका आहे !"**

अशा धर्तीच्या मथळ्याखालीं, या नोटिस बोर्डावर पुढें सक्त इषारे असतात:– "नेहमीं मोठ्या गटानें वावरा !", वगैरे.

२१२ नंबरच्या नात्सी पायदळ रेजिमेंटमधील दुसऱ्या बटालियनचे कमांडर मेजर वुल्फ यांनीं आपल्या सैनिकांना खालील हुकूम दिला होता:—

"या टापूंत रशियन गनीमी सैनिक वावरत आहेत. मी हुकूम देतों कीं, आमच्या संत्र्यांनीं येथें जोडलेल्या नियमपत्रिकेनुसार पाहाऱ्याच्या मुक्कामावर मशीनगनींचा जय्यत बंदोबस्त राखला पाहिजे."

कांहीं दिवस लोटल्यावर मेजर वुल्फ साहेबांनीं आणखी कांहीं खबरदाऱ्या घेण्याचा हुकूम सोडला:—

"रात्र झाल्यानंतर कोणालाही छावणी सोडून कोठें जावयाचें असेल तर ७ ते १० लोकांनीं एकत्र गटानें जावें. यापेक्षां कमी संख्येनें कोणीही जातां कामा नये. शिवाय जातांना प्रत्येकानें आपलीं शस्त्रें जवळ बाळगलीं पाहिजेत. दरएक कंपनी कमांडरनें आपल्या लोकांना हा इषारा फिरून एकवार द्यावा."

वोकीं गांवाशेजारच्या रस्त्यावर गनीमी-योद्धयांनीं एका जर्मन मोटरसायकलवाल्याला पकडलें. त्याच्या खिशांतील कागदपत्रांत, कॅप्टन कोटलर यांनीं आपल्या हाताखालच्या नात्सींना खालील इषारा दिला असल्याचें आढळून आलें:—

"क्रिचेव्ह, बात्सेविची, विझारी, चिगिरिंका या व लगतच्या विभागांत कमीत कमी ३२ गनीमी तुकड्या व गट वावरत आहेत. ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या अर्धांत व सप्टेंबरच्या आरंभी, मिळून एकंदर १८६ आफिसर, छोटे अम्मलदार व सैनिक यांचे खून झाल्याचा रिपोर्ट आहे. शिवाय गनीमी तुकड्यांशीं झालेल्या चकमकींत २१७ सैनिक ८ ऑफिसर ठार झाले आहेत.

"दारुगोळ्याच्या व अन्नपुरवठ्याच्या कोठारांना आगी लागल्याचे रिपोर्ट येतच आहेत. गेल्या कांहीं दिवसांत आपल्या जिल्ह्यांत तीन मोठ्या आगी लागल्या. गनीमी तुकड्यांचा ठावठिकाणा छपविण्याच्या बाबतींत गांवोगांवच्या जनतेचा ठाम निर्धार दिसून येतो. या 'विन-लढणाऱ्या' रहिवाशांतही पुष्कळसे लोक आंतून गनीमी तुकड्यांना सामील आहेत हें उघड आहे."

११ व्या जर्मन पलटणीच्या कमांडरनें काढलेल्या एका फतव्यावरून कॅप्टन कोटलर यांच्या इषाऱ्याचा इत्थंभूत पाठपुरावा होतो. या कमांडर मजकुरांचा खुलासा असा:—

"गनीमी गट तांबडे फुटण्याच्या आंत रातोरात आपलें कार्य उरकतात; कारण या वेळीं पाहाऱ्यांत ढिलाई असते. हे गनीमी गट मोक्याच्या जागीं दबा धरून राहतात व मग एकाएकीं चाल करून येतात; गाफील संत्र्यांना ते बेकदर ठार करतात; रसद वाहणाऱ्या गाड्यांवर वाटमारे हल्ले करतात; अनपेक्षित ठिकाणीं भडिमार करतात; विमान-तळावर उतरणाऱ्या अगर तळ सोडून जाऊं लागलेल्या भुईलगत विमानांवर ते गोळ्या झाडतात; तोफखाने खेचणाऱ्या घोड्यांना ठार करतात; व यामुळें अडकून पडलेल्या तोफखान्यांचा धुव्वा उडवितात."

## गनीमी उपद्रवाला तोंड कसें द्यावयाचें ?

लेनीनग्राडच्या आघाडीवर एका नात्सी रेजिमेंटचा खातमा उडाला त्यावेळीं कांहीं कागदपत्र लाल सैन्याच्या हातीं लागले. "गनीमी लढय्यांना कसें तोंड द्यावयाचें ?" या मथळ्याखालीं मेजर जनरल रॉचनें दिलेल्या १०३ सूचना या कागदपत्रांत सापडल्या.

'गनीमी-शिपाई' या शब्दाचा अर्थ काय हें रॉचसाहेबांनी प्रथम जर्मन यथासांगवृत्तीनें नमूद केलें आहे त्यांच्या मतानें, गनीमी शिपायांचे तीन मुख्य नमुने असतात:

( १ ) स्थानिक गनीमी सैनिक. हे मुख्यतः तरुण कम्युनिस्ट असतात. दिवसा हे लोक आपापल्या खेड्यांत काम करतात, व रात्री आपल्या गनीमी तुकडीच्या सूचना अमलांत आणतात.

( २ ) १०० ते २०० लोकांचे गनीमी बटालियन. हे लोक नेहमींच्याच पोशाखांत असतात. या लोकांचे खेड्यांतील जनतेशीं कायमचे लागेबांधे असतात. यामुळें रात्रीअपरात्री खेड्यांवर हल्ले करणें त्यांना सोपें जातें.

( ३ ) मुलकी कामगारांचे व आर. पी. कामागारांचे गनीमी गट.

गनीमी लोकांचें पारिपत्य करण्यासाठी खालील उपाय-योजना अमलांत आणावी;—

( अ ) ज्या कोणा सोविएट नागरिकांच्या अंगावर हत्यारें सापडतील अगर जो कोणी हत्यारें वापरतो असें आढळून येईल, त्याला गनीमी सैनिक लेखून, तपासणीनंतर ठार केले जावें.

( ब ) जो कोणी गनीमी सैनिकांना आसरा देतो त्याला गनीमी सैनिक लेखून ठार केलें जावें.

( क ) गनीमी छावण्यांचा व छुप्या केंद्रांचा विध्वंस करावा.

( ड ) एवढ्यानेंही भागलें नाहीं तर, ठार करण्यांत आलेल्या गनीमी शिपायांचीं शवें सार्वजनिक चौकांत फासाला लटकावून ठेवावीं; म्हणजे स्थानिक जनतेला गनीमी उपद्व्यापांबद्दल काय शिक्षा होते याची स्पष्ट कल्पना येईल.

अखेर, अगदीं हातघाईला येऊन जर्मन लोकांनीं बेलगाम दहशतबाजीची कास धरली आहे, हें खालील उदाहरणावरूनही सिद्ध होतें.

एके ठिकाणीं नात्सींनीं तीन गनीमी स्काउटांना काबीज केलें. या तरुण टेहळ्यांनीं आपलीं नांवें सांगण्याचें व आपल्या गटाचा ठावठिकाणा दाखविण्याचें साफ नाकारलें. नात्सी अम्मलदारानें त्यांना दंडुक्यानें चेचून काढले. तरीपण त्यांच्या तोंडावाटे एक अवाक्षरही निघालें नाहीं. त्या तीन टेहळ्यांपैकी एकाचें नांव शिकंदर सामोखिन् असें होतें. नात्सींनीं त्याला एका मोठ्या टँकच्या जमीनचाव्या पट्ट्याखालीं आडवें दाडले; व माहिती न दिल्यास टॅंक अंगावरून नेला जाईल अशी धमकी दिली. शिकंदर स्तब्ध राहिला.

नात्सींच्या तोंडाला संतापानें फेस आला. त्यांनीं त्या तिघा गनीमी टेहळ्यांचे पाय एका टॅंकला बांधले; व मग एका कांटेरी रानांतून टॅंक भरधांव सोडला. त्या रात्रीं गनीमी लढवय्यांनीं आपल्या तीन भाईंची छिन्नभिन्न झालेली प्रेतें उचलून नेलीं व आपल्या छावणीलगत पुरलीं.

जनतेवर दहशत बसविण्याची नात्सींची एक आवडती रीत कॅप्टन कील यांनीं लावलेल्या जाहीर सूचनेवरून दिसून येते. कॅप्टन कील हे नात्सींनीं व्यापलेल्या निमकोविशीं या गांवाचे कमांडर. त्यांची जाहीर सूचना खालील प्रमाणें:—

"मी सर्व जनतेला असें बजावून सांगतो कीं, मारल्या जाणाऱ्या दर जर्मनागणिक आम्हीं दिसतील त्या दहा रशियन लोकांना ठार करूं. या बाबतींत स्त्री–पुरुष भेदाची अगर वयोमर्यादेचीही आम्ही पर्वा करणार नाहीं."

ही जाहीर सूचना भिंती भिंतीवर लागली त्या रात्री तिमकोविशी गांवचे सर्व नागरिक जंगलांत निघून गेले. गनीमी लढवय्यांना ही बातमी कळतांच त्यांनीं सभोंवारच्या टापूतील

कित्येक गनीमी तुकड्यांना संयुक्त हल्ल्यासाठीं बोलावून घेतलें. जय्यत तयारी होतांच निमकोविशी गांवावर गनीमी तुकड्या तुटून पडल्या. तेथी नात्सी छावणीचे कित्येक सैनिक ठार करण्यांत आले. बाकी कैद करण्यांत आले. दारुगोळ्याची व पेट्रोलची कोठारें उडवून देण्यांत आलीं. तसेंच, दोन अन्नपुरवठ्याचीं भांडारें जमीनदोस्त करण्यांत आलीं. गनीमी योद्धयांना १२ मशीनगनीं, दीडशेंवर रायफलीं व इतर सामुग्री मिळाली !

आमच्या गनीमी युद्धनीतीमुळें नात्सी लोक आतां इतके हैराण होऊन गेले आहेत कीं, ज्यांच्या अंगावर एखादा चाकू अगर वस्तरा सापडतो अशा लहान लहान मुलांना देखील त्यांनी गनीमी सैनिक म्हणून ठार करण्यास सुरवात केली आहे. ऑक्टोबर महिन्यांत झेर-निटस्की विभागांत नात्सींनीं याप्रमाणें एकूण तीस मुलांना गोळ्या घालून ठार केलें.

## जर्मन सैनिकांच्या डोक्यांत काय चाललें आहे ?

नात्सी यंत्री फौजांतील सैनिकांना स्वतंत्र विचार करण्याची सक्त मनाई असते हें खरें; तरीपण आमच्या ताब्यांत असलेल्या नात्सी कैद्यांनीं वेळोवेळीं तोंडी अगर नातेवाइकांना लिहिलेल्या पत्रांत गनीमी–लढवय्यांबद्दलचे आपले विचार व्यक्त केले आहेत.

कॉर्पोरल एमिल काटझे आपल्या पत्रांत म्हणतो:—

" पूर्व आघाडीवर आम्हाला अत्यंत काळजीनें रहावें लागतें. भोंवतालच्या झाडांझुडपां-वर विश्वास ठेवण्याची सोय नाहीं. दरएक झाडामागें आणि दरएक झुडपांमागें गनीमी लढवय्ये दबा धरून बसलेले असतात. या युद्धामुळें आम्ही किती जेरीस आलों आहों याची तुम्हाला कल्पना होणें कठीण आहे. रात्री झोपणेंही अशक्य झालें आहे. मी अंथरुणावर पडून राहतों खरा, पण झोंप घेतां येत नाहीं. कोठेंही खुट झालें कीं माझे कान तिकडे लागून राहतात. माझी एकट्याचीच अशी केविलवाणी स्थिती झाली आहे असें नाहीं. गनीमी सैनिकांनीं माझ्या साथ्यांपैकीं इतक्या जणांना कायमचे निजविलें आहे कीं मला स्वस्थचित्तानें झोपणें अशक्य झालें आहे ! "

मास्कोच्या उपनगरांत गिरफदार झालेला नात्सी सैनिक पॉल वेबर आपल्या जबानींत म्हणतो:—

" दरएक रस्त्यावर आम्हाला ठार करण्यासाठीं गनीमी-सैनिक दबा धरून असतात. दरएक झाडामागून आणि दरएक कोनाकोपऱ्यांतून कोणत्याही क्षणाला गनीमी गोळी सुटेल असें आम्हाला धरूनच चालावें लागतें. कांहीं दिवसापूर्वीं आमची व एका गनीमी तुकडीची चकमक झडली. या चकमकीमुळें, आघाडीला पेट्रोल पोचविण्याच्या कामांत पुऱ्या वीस तासांचा खोळंबा झाला. परिणाम असा झाला कीं, पेट्रोल नाहीं म्हणून अडकून पडलेले आमचे ११ टॅंक लाल फौजेनें धुळीस मिळविले. "

२६० नंबरच्या नात्सी पायदळ रेजिमेंटमधील दुसऱ्या कंपनीचा सैनिक जोसेफ रेनर म्हणतो:—

" ज्या चकमकांत मला लाल फौजेनें कैद केलें ती आमच्या कंपनीची पहिलीच चकमक होती. पण या चकमकीपूर्वीं, गनीमी सैनिकांनीं आमच्यावर वाटेंत गोळीबार केले होते. आमच्यापैकीं २० सैनिकांचा गनीमीशिपायानीं आधीच बळी घेतला होता. "

२६८ नंबरच्या नात्सी पायदळ रेजिमेंटमधील पांचव्या कंपनीचा सैनिक हान्स रेज्जी म्हणतो:—

" आम्ही आघाडीकडे जात असतां वाटतें आमच्यावर वारंवार छुपे हल्ले झाले. यामुळें आमचें फारच मोठें नुकसान झालें—कित्येक लोक ठार झाले व कितीएक जखमी झाले. गनीमी तुकडीशीं झुंपलेल्या एका चकामकींत आमची तुकडी अजिबात भेदरून गेली. सर्वत्र एकच गोंधळ उडून गेला. या गोंधळांत आमचे लोक आपल्याच लोकांवर गोळ्या झाडूं लागले. यामुळें माझे कित्येक साथी निष्कारण प्राणास मुकले."

## दोन प्रकारचा वक्तशीरपणा

एकदा एका जर्मन तुकडीनें एक सोविएट खेडें ताब्यांत घेतलें. त्यासरशीं खालील जाहिर सूचना त्यांनी चहूंकडे भिंतीवर लावली:—

" लष्करी पेहरावांत अगर मुलकी पेहरावांत गटागटानें अगर अलग अलग आमच्या पिछाडीवर वावरणाऱ्या सर्व रशियन सैनिकांनीं तावडतोब जवळच्या जर्मन ठाण्यावर हजेरी द्यावी. ऑगस्ट ५ च्या दुपारपर्यंत जे लोक हजेरी देण्याला चुकतील त्यांना गनीमी सैनिक लेखून शासन केलें जाईल"

ही जाहीर सूचना चहूंकडे लावून झाल्यानंतर जर्मन लोक संथपणें वाट पहात राहिले. सूचनेंत मुक्रर केलेल्या तारखेच्या मुदतींत कोणीही हजेरी द्यावयास आलें नाहीं. नात्सीनीं ५ तारखेऐवजी ८ तारीख जाहीर केली. तरी देखील कोणीही आलें नाहीं. अखेर, 'बेमुर्वतखोर रशियन लोकांना' अगदी अखेरची संधी देण्याच्या थोर बुद्धीनें त्यांनीं जाहीर सूचनेंतील तारीख ऑगस्ट १३ पर्यंत पुढें ढकलली !

१३ तारखेला गनीमी लढवय्ये खरोखरच येऊन दाखल झाले. त्यांनीं नात्सींच्या कबजांतील त्या खेडयावर जय्यत तयारीनें हल्ला चढविला. निमंत्रणाबरहुकूम पाहुणे आले खरे, पण त्यांचें स्वागत करावयास नात्सी जागेवर राहिले नाहींत. त्यांनीं खेडयांतून पळ काढला !

## दोन जाहीर नोटिसा

एक खेडें नात्सींच्या ताब्यांतून परत घेतल्यानंतर लाल सैन्याचे लोक गावांत शिरले; तेव्हां एका कुंपणावर दोन जाहीर नोटिसा त्यांच्या नजरेस आल्या. पहिली नोटीस अशी:—

" जो कोणी लालसैनिकांना अगर गनीमीशिपायांना दडवील, अगर त्यांच्या खाण्यापिण्याची वगैरे सोय करील त्याला फांसावर लटकावलें जाईल. हा हुकूम स्त्रियांना व पुरुषांना असा दोघांनाही लागू आहे."

(सही) "**जर्मन कमांडर**"

या नोटीशीला अगदी खेटून चिकटविण्यांत आलेली दुसरी नोटीस अशी:—

" तुमच्या धमक्या फुकट आहेत. आम्ही तुम्हाला ठार करण्याचें, तुमचा धुव्वा उडविण्याचें, आणि तुम्हाला नामशेष करण्याचें काम चालूच ठेवणार. तुम्हाला आम्ही ढेंकणाप्रमाणें चिरडून टाकूं. फॅसिझमचा नायनाट करणें हेंच आमचें ध्येय राहणार !"

(सही) "**गनीमी लढवय्ये**"

त्याच्याच शेजारी त्याच गनीमी लढवय्यांनीं लावलेली आणखी एक त्रोटक नोटीस होती:—

" नात्सींच्या हस्तें प्राणास मुकणाऱ्या दर सोविएट नागरिकागणिक शंभर नात्सींना यमसदनाला पाठविण्याचें आम्हीं कंकण बांधलें आहे !"

—:०:—

# १२

# नात्सींनी व्यापलेल्या यूरपमधील गनिमी योद्धे

[ नात्सींनी व्यापलेल्या यूरोपमधून बातम्या मिळविणें मुष्किलीचें असतें. म्हणून हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, खालील रिपोर्टात दिलेली माहिती म्हणजे यूरोपच्या गनीमी-योद्धयांच्या चळवळीचा एक छोटासा भाग आहे. वास्तविक, त्या चळवळीचा विस्तार या रिपोर्टांतील माहितीपेक्षा मोठा आहे. ]

आज, हिटलर–मुसोलिनीच्या सैन्यांच्या पीछाडीवर जी दुसरी आघाडी निर्माण झाली आहे ती केवळ रशियन गनीमी लढवय्येच लढवीत आहेत असे म्हणतां येणार नाहीं. रशियन धर्तीवरच, फिनलंड, नॉर्वे, पोलंड, युगोस्लाविया आणि ग्रीस या देशांतही गनीमी लढवय्यांच्या तुकड्या लढून राहिल्या आहेत.

सोविएट यूनियनप्रमाणेंच, याही देशांतील गनीमी तुकड्या मुख्यत: तेथील कामगार शेतकऱ्यांच्याच बनलेल्या आहेत. पण तेथेंहीं, सोविएट गनीमी वीरांचीं उदाहरणें डोळ्यासमोर ठेऊन, स्वयंप्रेरणेनें या तुकड्यांत सामील होणारे, बुद्धिजीवी पेशांतील लोक आहेतच. गेल्या कांहीं महिन्यांत, अधिकाधिक लोक या गनीमी गटांत येऊन मिळत आहेत. हे गट खेडोपाड्यांत, डोंगरांत, जंगलांत किंबहुना खुद्द शहरांतही छपून राहतात. अनेक ठिकाणीं, या गुप्त गटांना एकमेकांशीं, व पूर्वेस असलेल्या सोविएट गनीमी लढवय्यांशीं, संबंध जोडण्यांत यश

पूर्व आघाडीवर फॅसिस्ट सैन्याला बसणारा प्रत्येक तडाखा पाहून यूरोपच्या गनीमी योद्धयांनां उत्साहाचें नवीन भरतें येत आहे. फॅसिस्ट सैन्याला बसणाऱ्या दरएक तडाख्यामुळें, नवमनू–प्रवर्तक अशा या अलग अलग गनीमी गटांतून, एक नवीन पलटण पैदा करणारा सुदिन जवळ येत चालला आहे. जनतेची ही नवीन पलटण ऐन मोक्याच्या घटकेला फॅसिस्ट पिछाडीच्या मर्मस्थानींच क्रांतीचा झेंडा फडकवणार हें उघड दिसत आहे.

या प्रकरणांत दिलेल्या मोहिमा म्हणजे केवळ सुरवात आहे. 'फॅसिझमच्या पिछाडीवर वावरणाऱ्या या शूर गनीमी गटांतील स्त्रीपुरुषांचीं नांवे आज बहुधा कोणाला ठाऊक नाहींत. पण हे धैर्यवान गनीमी गट म्हणजेच आगामी राष्ट्रीय सैन्यांची मूहूर्तमेढ होय. एक ना एक दिवस, ही राष्ट्रीय सैन्यें यूरोपच्या रक्तबंबाळ भूमीवर क्रांतीचा झेंडा फडकवणार, व मुख्य आंग्लसोविएट फौजांच्या कार्याला हातभार लावणार, यांत बिलकुल संदेह नाहीं.

**फिनलंड**

उत्तर फिनलंडमध्यें फॅसिस्टांच्या पिछाडीवर एक गनीमी गट लढत आहे. लार्सेन नांवाचा एक कामगार या गटाचा म्होरक्या आहे. त्यांच्या कार्याबद्दलचा पहिलाच रिपोर्ट आला तो असा कीं, त्यांनी नात्सींच्या एक वाहतुकीच्या काफल्यावर हल्ला चढविला; व काफल्या सोब-

तच्या संरक्षक तुकडीला ठार करून, दारूगोळ्यानें व इतर पुरवठ्याने भरलेल्या १५ नात्सीं लॉऱ्यांचा धुव्वा उडवून दिला.

पुढें याच गटानें नात्सींचीं दोन दारूगोळ्याचीं कोठारें उडवून दिलीं आणि पेटसामो गांवाजवळ नात्सींचा विमानांत पेट्रोल भरण्याचा एक तळ जमीनदोस्त केला. जंगलाच्या मोकळ्या आवारांत थाटण्यांत आलेला नात्सींचा एक विमान–तळ निकामी करण्यांत त्यानी सोविएट गनीमी लढवय्यांचाच मार्ग पत्करला. प्रथम, जंगलाच्या कडेवर असलेल्या एका पेट्रोलच्या सांठ्याला त्यांनीं आग लावून दिली. आग विझवून लगतच्या दारूगोळ्याच्या कोठाराचें संरक्षण करण्यासाठीं नात्सीं धावले. त्यासरशीं गुडघ्यावर रांगत रांगत लासेंनची टोळी तळावरील सहा विमानांलगत जाऊन ठेपलीं, आणि त्यांनीं विमानांवर कुलपी गोळ्यांचा आणि आगवाटल्यांचा वर्षाव केला. चार मोठी बॉंबर विमानें जमीनदोस्त झालीं.

फिनलंडच्या एका फॅसिस्ट बटालियननें गनीमी टापूला गराडा देण्याचा खटाटोप आरंभिला. हें कळतांच गनीमी तुकडीनें स्वतःचें लहान लहान अलग गटांत रूपांतर केलें. हे लहान गट, चोर वाटांची आणि नाल्यांची कांस धरून फॅसिस्ट गराड्यांतून पार निसटलें, व ठरल्या ठिकाणीं फिरून एकत्र जमले. दुसऱ्या दिवशीं गराडा देऊं पाहणाऱ्या फॅसिस्ट बटालियनवर पिछाडीवरून हल्ला चढविला; शंभरावर लोक ठार केलें आणि मुबलक शस्त्रास्त्रें व सामुग्री हस्तगत केलीं!

## नॉर्वे

या देशांतून येणाऱ्या सर्व रिपोर्टावरून हें उघड दिसून येते कीं, नात्सींच्या कामांत रुखावट पैदा करण्याची व अन्य मार्गांनी नात्सीना हैराण करण्याची वाढती चळवळ या देशांत रुजत चालली आहे.

नार्वेमधील त्रांदहाइम् शहरीं नात्सी लोक विमानी बॉंब जमा करीत होते. कित्येक महिनेपर्यंत जर्मनांचे हे बॉंब जमविण्याचे कार्य चालू होतें. एक दिवस गनीमी योद्ध्यांनीं बॉंबचें कोठार उडवून दिलें! उन्हाळ्याच्या दिवसांत गनीमी वीरांनीं नार्वेची कित्येक जंगले पेटवून दिलीं. विशेषतः, ज्या जंगलांत जर्मन लष्करगुंडाच्या गुप्त तजविजी होत्या त्या जंगलांचा आधी समाचार घेण्यांत आला.

या गनीमी कारवाईमुळें नात्सी गुंडांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांनी देशभर लोकांची धरपकड सुरू केली व आपले खुनशी बंदिखाने गच्च भरून टाकले. पण यामुळें जनतेचा नात्सीविरोधी रोष अधिकच खवळला–नात्सीविरोधी चळवळ अधिकच जोरावली.

## पोलंड

या देशांतील गनीमी चळवळ सोविएट जर्मन युद्ध पेटल्यापासून तर फारच झपाट्यानें वाढली आहे. पोलंडमधील गनीमी लढवय्यांच्या कामगिरीबद्दल बाहेरच्या देशांत माहिती मिळणें कठीण पडतें, हें खरें. तरीपण ज्या बातम्या नात्सींच्याही कचाट्यांतून सुटतात त्यांवरून हें दिसून येतें कीं, आज, पोलंडमध्यें वैयक्तिक जर्मन अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले वाढत आहेत; नात्सी सैन्यावर होणारे अचानक हल्ले बळावत चालले आहेत. रेल्वेवरील अपघातांची संख्या वाढत आहे; गिरण्याकारखान्यांतील नात्सीविरोधी रुखावट फैलावत आहे; आणि नात्सी दळणवळणाच्या योजनांत उत्तरोत्तर वाढती खीळ घातली जात आहे.

प्रश्कोव्ह गांवीं, गनीमी लढवय्यांनीं एका रेल्वेलाइनवर केबिनमध्यें घुसून सांधेपालट केल्यामुळें नात्सींची एक फौजी-आगगाडी भरधांव वेगांत एका दारूगोळ्यानें भरलेल्या मालगाडी वर आदळली. शेकडो जर्मन सैनिक ठार झाले—दारूगोळ्याचे ढिगारेच्या ढिगारे नष्ट झाले. हा अपघात घडवून आणणाऱ्या गनीमी लढवय्यांच्या ठावठिकाणाची माहिती पुरविणारांस नात्सी गेस्तापोनें (सी. आय. डी. ने) ५०,००० झ्लोटींचे बक्षीस देऊं केलें. ('झ्लोटी' हे पोलंडच्या एका नाण्याचें नांव आहे.)

पोलंडमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या जर्मन वर्तमानपत्रांत दररोज खालील वळणाची कांहींना कांहीं बातमी असतेच: "जर्मन तुफानी फौजेच्या पुढाऱ्याचा अचानक मृत्यू!"; "गनीमी हल्ल्यामुळें, काळ्या फौजेचे सैनिक प्राणास मुकले!" वगैरे. "क्राकोर झायटुंग" या पोलंड-मधील फॅसिस्ट पेपरमध्यें नुकतांच खालील मजकूर प्रसिद्ध झाला होता:—

"आपणाला वाटतें त्याहून पोलंडच्या गनीमी चळवळीचा विस्तार खूपच मोठा आहे."

स्लाव्हेक आणि क्लोव्हनिक या दोन पोलिश गनीमी लढवय्यांना फांशी दिल्याची बातमी नुकतीच "न्यूज वेनर तागेब्लात" या नात्सी-नियंत्रित पेपरमध्ये प्रसिद्ध झाली होती. या दोघा गनीमी योद्ध्यांनीं दोन नात्सी फौजी पोलिसांना व सहा पोलीस शिपायांना ठार केले होते. त्याचप्रमाणें, त्यांनीं रेलगाडीच्या कित्येक टकरा घडवून आणल्या होत्या, व कित्येक ठिकाणी स्फोट घडवून आणले होते.

ऑगस्ट महिन्याच्या अखेर अखेर, 'रादमोस्को' शहराच्या आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकऱ्यांनीं चढाईखोर नात्सी अधिकाऱ्यांविरुद्ध बंड पुकारलें. या बंडाचें पारिपत्य करण्यासाठीं नात्सींनीं २० फौजी पोलिसांची एक तुकडी रादमोस्कोहून रवाना केली. या तुकडीचें शेत-कऱ्यांनीं स्वागत केलें ते रायफलींच्या व पिस्तुलांच्या गोळीमारानें. विसांपैकीं नऊ फौजी पोलीस ठार झाले. राहिलेल्या पोलिसांनीं माघार घेतली!

बंडवाल्यांच्या या धाडशी कृत्याचा सूड घेण्यासाठी नात्सींनी झेन्स्टोकोहोव गांवाहून एक मोठी फौज रवाना केली. या फौजेचेंही शेतकऱ्यांनीं अतोनात नुकसान केलें; फौजेचे अनेक लोक ठार झाले. अखेर मोठ्या तोफखान्यांचा उपयोग करणें नात्सींना भाग पडलें. या बंडांत भाग घेणारे बहुतेक शेतकरी पुढें गनीमी तुकड्यांत सामील झाले.

उन्हाळ्याच्या अखेर अखेर, पोलंडमध्यें शेतकरी बंडाची लाटच उसळली. जबरीनें धान्य उकळण्याच्या नात्सी धोरणाला तो शेतकऱ्यांचा जबाब होता. अनेक ठिकाणीं पोलंडच्या शेतकऱ्यांनीं, आपल्या सोविएट भाईंचे अनुकरण करून "दग्ध भूमीचें" धोरण अमलांत आणलें. आपलें धनधान्य लुटारू शत्रूच्या हवालीं करण्यापेक्षा तें जाळून टाकलेंले बेहेत्तर, असें शेतकऱ्यांनीं ठरविलें. बंडाळीचें पारिपत्य करण्यासाठीं नात्सींनीं ज्या शासन फौजा रवाना केल्या त्यांचें, स्थानिक गनीमी तुकड्यांच्या मदतीनें, शेतकऱ्यांनीं अतोनात नुकसान केलें. शासन फौजानांच शेतकरी बंडवाल्यानी जबर शासन केलें.

### झेकोस्लोव्हाकिया

या देशांतून मिळणारी खबरही फार अपुरी आहे. परंतु, जर्मन लष्करी आगगाड्यांना घडणाऱ्या अपघातांची संख्या दिवसानुदिवस वाढत चालली आहे, हें निश्चित. नुकत्याच घडवून आणलेल्या एका अपघातांत २५० नात्सी सैनिक ठार झाले.

जर्मन आणि इटालियन सैनिकांनीं भरलेली एक आगगाडी पूर्व आघाडीकडे रवाना

होणार आहे अशी झेकोस्लोव्हाकियन गनीमी लढवय्यांना खबर मिळाली. त्यांनीं एका घाटांत त्या गाडीच्या मार्गावर डोंगरलोट घडवून आणली !

## ग्रीस

या देशांतील डोंगराळ जिल्ह्यांत गनीमी तुकड्यांची संघटणा करण्यांत आली आहे. विशेषतः ग्रीसच्या ईशान्य भागांत गनीमी लढवय्ये जारीनें कार्य करून राहिले आहेत. या भागांत इटालियन लष्कर गुंडाना त्यांची दहशत बसली आहे. ग्रीस पडल्यानंतर फॅसिस्टांनीं तेथील पोलिसांचीं हत्यारें काढून घेतलीं. साहजिकच गनीमी तुकड्याबद्दल पोलिसांना सहानुभूति वाटते. वेळोवेळीं जुने पोलिस खात्याचे लोक गनीमी सैनिकांना मदत करतात.

क्रीट बेटांतही गनीमी लढवय्ये आहेत असा रिपोर्ट आहे. हें बेट आतां जर्मनी व इटली यांच्या ताब्यांत गेलें आहे. ग्रीक जहाजांचे कप्तान या गनीमीं तुकड्यांना शस्त्रास्त्रें पुरवितात. क्रीटच्या दक्षिण किनाऱ्यावर अनेक उथळ बंदरें आहेत. या बंदरांत फॅसिस्टांचीं लढाऊ जहाजें जाऊं शकत नाहींत. याचा फायदा घेऊन ग्रीक कप्तान याच बंदरांत आपलीं जहाजें नांगरतात, व गनीमी योद्ध्यांशीं दुवा जोडतात.

ग्रीक गनीमी लढवय्यांचा एक गट नुकताच ' हानी ' नांवाच्या बंदरांत घुसला. तेथें नात्सींनी ग्रीक रहिवाशांकडून लुबाडलेलें जवसाचें तेल एका कोठारांत सांठवून ठेवलें होतें. या कोठाराला गनीमी गटानें आग लावून दिली. दुसऱ्या कांहीं गनीमी तुकड्यांनीं एका शहरांतील जर्मन–इटालियन छावणीवर हल्ला चढविला व छावणीतील फॅसिस्ट सैनिकांना गावांतून हाकून लावलें;—त्यांची अजिबात गाळण उडाली.

## युगोस्लाव्हिया

नात्सींनीं व्यापलेल्या यूरोपमधील इतर कोणत्याही देशापेक्षा युगोस्लाव्हियांतील गनीमी चळवळीची फारच झपाट्यानें वाढ झाली आहे. जंगलांत आणि डोंगरांत वावरणाऱ्या अलग अलग राष्ट्राभिमानी गटांतून आजच या देशांत एक सुसंघटित बंड–प्रवृत्त सैन्य निर्माण झालेलें आहे.

जुलै महिन्याच्या आरंभींच, युगोस्लाव्हियाच्या गनीमी लढवय्यांनीं, जर्मन छावण्यांवर, रसद वाहणाऱ्या गाड्यांवर, आणि दारूगोळ्याच्या कोठारावर हल्ले चढविण्यास सुरवात केली आहे, अशा बातम्या फुटूं लागल्या. या गनीमी योद्ध्यांनीं रेल्वेची सडक उखडून टाकली व तारेचे खांब उचकटून तारा तोडून टाकल्या !

अशा मर्यादित स्वरूपांत सुरू झालेली ही गनीमी चळवळ हां हां म्हणतां सर्वत्र फैलावली. युगोस्लाव्हियावर जर्मनीनें विजय मिळविला खरा, पण त्यामुळें युगोस्लाव्हियाचें सारेच्या सारे सैन्य चिरडलें गेलें असें बिलकुल नाहीं. हजारो सैनिक, किंबहुना राष्ट्रीय सैन्याच्या पुऱ्या तुकड्याच्या तुकड्या, नात्सींचा वेढा फोडून बाहेर पडल्या आणि दूरदूरच्या डोंगराळ टापूंत त्यांनीं आसरा घेतला. या टापूंत घुसण्याची नात्सी मोटरी सैन्याची मातब्बरी नाहीं.

या आरंभ–बीजाभोंवती युगोस्लाव्हियांतील सर्व राष्ट्रप्रेमी घटक एकवटले. जंगलांजंगलांत आणि पहाडापहाडांत नात्सीविरोधी बंडाचें, म्हणजेच आझादीचें, गीत घुमूं लागलें. आज या बंडप्रवृत्त गनीमी लढवय्यांची संख्या सुमारे ८०,००० पर्यंत वाढली आहे. स्थानिक जनतेचा या लढवय्यांना मनःपूर्वक पाठिंबा आहे. जनता त्यांना अन्नाचा पुरवठा करते, आणि

सूड्घेऊ फॅसिस्ट फौजांच्या हालचालींबद्दल वित्तंबातमी देते.

युगोस्लावियाच्या डोंगराळ मुलखांत विशेषतः मॉंटेनीग्रोच्या विभागांत, जर्मन व इटालियन अधिकाऱ्यांचा अम्मल अवघा मोठ्या छावण्यांच्या शहरापुरतांच जारी आहे. शेंकडो खेडोपाड्यांत आणि कित्येक शहरांत देखील, गनीमी तुकड्यांचें स्वतंत्र सरकार कायम झालें आहे. हें गनीमी सरकार, नात्सीं चढाईखोरांच्या राजवटीचे हुकूम केराच्या टोपलीत टाकतें.

बॉस्निया, मॉंटेनीग्रो आणि हर्जेगोविना या विभागांतील पहाडांत गनीमी चळवळीचीं मुख्य केंद्रें आहेत. दीडशेंवर गनीमी तुकड्या तेथें जारीनें कार्य करीत आहेत. या तुकड्या जर्मन छावण्यांना जमीनदोस्त करतात; दळणवळणाच्या साधनांचा विध्वंस करतात, आणि इतर अनेक गनीमी हिकमतीनी शत्रूला 'दे माय धरणी ठाय' करून सोडतात.

कित्येक वेळां हे गनीमी लढवय्ये मोठ्या शहरांत खुद्द उपनगरांत घुसून देखील शत्रूवर हमला चढवितात. बेलग्रेड आणि स्मेदेरेव्हो या शहरांतील दारूगोळ्याचे कारखाने आणि पेट्रोलचें एक अवाढव्य कोठार, गनीमी लढवय्यांनीं उडवून दिलें. तसेच, तेथील दारूगोळ्याचें एक कोठार त्यांनी जाळून खाक केलें; व एका विमान तळावरही अचानक धाड घातली. झाग्रेब गांवीं त्यांनीं एक तोफगोळ्यांचें कोठार हवेंत उडवून दिलें. झेमुन शहरांत त्यांनीं "झ्माज विमान वर्क्स"चा धुव्वा उडवून दिला आणि "इकारुस विमान-फॅक्टरी"ची मोठ्या प्रमाणावर नासधूस करून टाकली.

"नोव्हि लिस्त" नांवाच्या एका फॅसिस्ट-नियंत्रित वर्तमान पत्रांत रिपोर्ट आला होता कीं, बॉस्निया विभागांतील लेस्लियाना गांवच्या कोळशाच्या खाणीवर गनीमी तुकड्यांचे संघटित हल्ले होत आहेत; गनीमी लढवय्यांची संख्या किमानपक्षीं ४०० असून त्यांच्या हाती मैदानी तोफादेखील आहेत. स्थानिक जनता गनीमी तुकड्यांना जाऊन मिळाली.

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यांत, सर्बिया, क्रोशिया, स्लाव्होनिया, बॉस्निया, हर्जेगोवीना, मॅसेडोनिया, मॉंटेनीग्रो आणि व्होयेवोदीना या टापूंतील गनीमी प्रतिनिधींची, बॉस्नियाच्या एका दूरवरच्या डोंगराळ विभागांत परिषद भरविण्यांत आली होती.

या परिषदेनें सहा महिन्यांतील सर्व चकमकींचा एक संक्षिप्त आढावा तयार केला, तो असाः—

| | | |
|---|---|---|
| ठार व जखमी ऑफिसर आणि सैनिक | .. | १२००० |
| उडवून देण्यांत आलेले पूल | ... | २०० हून अधिक. |
| पेट्रोल, दारूगोळा आणि खुराक यांची जमीनदोस्त करण्यांत आलेलीं कोठारें | ... | ३०० ते ४०० |
| पाडण्यांत आलेल्या शत्रूच्या आगगाडया | ... | १७ |

गनीमी लढवय्यांचा बीमोड करण्याच्या इरायानें जर्मन व इटालियन अम्मलदारांनीं युगोस्लाव्हियाच्या जनतेवर अत्यंत पाशवी अत्याचार केले आहेत. ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या पंधरा दिवसांतच नात्सी अम्मलदारांनीं १० हजारावर नागरिकांना खुनशी बंदिखान्यांत डांबलें. इटालियन लष्कर गुंडानीं स्लाव्होनियांत ४७ गनीमी लढवय्यांना गोळया घालून ठार केले, आणि झाग्रेब शहरीं २०० 'क्रोट' जमातियांना ठार केले. बेलग्रेड गांवी १४०० "सर्ब" जमातियांना ठार मारण्यांत आलें, आणि "बनाई" टापूंत जर्मन गुंडांनीं ५० मुलकी नागरिकांचे खून केले.

पण दहशतबाजीमुळें, नेहमींच्या शिरस्त्यानुसार, गनीमी बंडाच्या आगींत तेलच टाकलें जात आहे. डिसेंबरच्या सुरवातीपर्यंत गनीमी लढवय्यांची ताकत इतकी वाढली कीं, त्यांनीं चढाईखोर शत्रूशीं समोरासमोर सामना करण्याचेंही धाडस केलें. मोराव्हा नदीच्या खोऱ्यांत अशातऱ्हेची एक तुंबळ लढाई झाली. फॅसिस्ट चढाईखोरांना साठ हजारांची पायदळ फौज व रणगाडे कामास लावणें भाग पडलें.

ऑगस्ट महिन्यांत मास्को येथें एक 'अखिल–स्लाव्ह जमात' परिषद झाली. या परिषदेनें अखिल स्लाव्ह जमातीच्या फॅसिझमविरोधी ऐक्याची घोषणा केली. या परिषदेमुळें युगोस्लाव्हियाच्या राष्ट्रीय गनीमी चळवळीला कल्पनेपाड चेतना मिळाली. परिषदेंत, मॉंटेनीग्रोचा कवि 'रादूल स्टिएन्स्की,' सर्बियाचा शास्त्रज्ञ प्रोफेसर बोशिदार मास्लारिच, इतर स्लाव्ह जनतेच्या प्रतिनिधींनीं आवेशयुक्त भाषणें केलीं. हीं भाषणें छापून काढून युगोस्लाव्हियाच्या गनीमी लढवय्यांनीं त्यांचा सर्वत्र विस्तृत प्रसार केला.

नात्सींच्या बगलेंतील सर्बियन सरकारचा प्रधान नेडिच याला व्हालजेव्हो जिल्ह्यांतील सर्बियन गनीमी लढवय्यांनीं लिहिलेलें जाहीर पत्र वाचलें म्हणजे, युगोस्लाव्हियाच्या राष्ट्रीय गनीमी आंदोलनाला चैतन्य देणाऱ्या भावनांची कल्पना येते. हें जाहीर पत्र असें:—

"आपला देश अत्यंत दारुणावस्थेंत असतां तुम्ही तो विकीत अहां ! तुम्ही अधोगतीच्या अगदी नीचतम कोटीला जाऊन भिडला आहां. त्याबाबतींत इतर कोणीही तुमचा हात धरूं शकेल अशी कल्पनाही करवत नाहीं. पण ध्यानांत ठेवा कीं, एकजात सर्व राष्ट्रघातकी लोकांना जनता जें शासन करते, तेंच शासन तुमच्याही वाट्याला येणार आहे. दरएक स्लाव्ह व्यक्ती तुमच्या नांवाचा निखालस तिटकाऱ्यानें उच्चार करील !

"तुमच्या बर्लिनच्या धन्याला सांगा कीं, मूठभर हलकट राष्ट्रघातक्यांना हाताशीं धरून सर्बियन जनतेला चिरडण्यांत त्याला कदापीही यश येणार नाहीं, मग तो उघड दडपशाही गाजवो वा लफंगेपणाची कांस धरो... जें सरकार, हिटलरनें आम्हावर लादलेली गुलामगिरी हाणून पाडण्यासाठीं–संपूर्ण स्वातंत्र्यासाठीं, साऱ्या स्लाव्ह जनतेला आणि तिच्यासह आम्हा सर्बिअन लोकांना, लढ्याचा इशारा देईल, त्याच एका सरकारला आम्ही मान्यता देऊं."

——oXo——

# भाग दुसरा

—0—0—

( गनीमी संग्रामाचा प्रत्यक्ष व अनुभवसत्य वृत्तांत: ह्या वृत्तांतांत गनीमी तुकड्यांच्या कमांडरांच्या डायऱ्या, युद्ध बातमीदार व लाल फौजेच्या सैनिकांचे अहवाल ह्यांचा समावेश केलेला आहे. )

## 1

## गनीमी कमांडर के. याची डायरी

लेनिनग्राड भागांमधील गनीमी तुकडीचा कमांडर के. यानें लिहून ठेवलेल्या डायरी-मधील उतारे :—

**ऑगस्ट १३ :** आज जर्मनांनीं आमच्या जिल्ह्याच्या ठाण्याचा कब्जा घेतला. आमची जळती घरें, क्लब व इस्पितळें यांचे दृश्य हृदयाला पीळ पाडीत होतें. मध्यरात्रीं आमच्या गनीमी तुकडीची बैठक झाली.

**ऑगस्ट १४ :** आमच्या पहिल्या अग्निदिव्याचा दिवस—जी. या खेड्यानजीक आम्ही जर्मनांच्या एका लहानशा गटाला गोळ्या घालून ठार केलें; रस्त्याच्या कडेला दोन मोटर सायकलवाल्यांचे मुडदे पाडले. आम्हाला त्यांच्या वाहनांचा नाश करावा लागला. त्या बरोबरच आम्ही जर्मनांच्या दळणवळणाच्या साधनांचाहि नाश केला.

**ऑगस्ट १५ :** 'डी'ची टोळी टेहळणीवरून परत आली. त्यांनीं दोन जर्मन ठार केल्याचें समजतें. टेहळेकऱ्यांनीं महत्त्वाची बातमी आणलेली आहे. 'यू' या खेड्यानजीक जर्मनांनीं लष्करी विमानतळ, आणि विमान-दुरुस्तीचें केन्द्र उभारलें आहे.

**ऑगस्ट १९ :** आम्ही विमानतळावर हल्ला चढविण्याचें ठरविलें. आम्हाला प्राप्त झालेल्या यशाचा तपशील: आम्ही सात ('युंकर ८८') बॉम्बफेक्यांना आग घातली; शत्रूला नदी ओलांडून दिली नाहीं; सुरुंगाचीं जाळीं नष्ट केलीं. त्यापैकीं चौदा सुरुंग आमच्या सैनिकांना शिक्षण देण्यासाठीं बरोबर घेऊन आलों. याशिवाय सुमारें वीस टनाच्या तेल-टाकीला आग लावून दिली.

**ऑगस्ट २० :** नदीच्या कांठाला जर्मन दारूगोळ्याचा साठा असल्याबद्दल पत्ता लागला. त्यावर अवघे चार रखवाली शिपायी होते; आम्ही त्याचा फडशा पाडून साठ्याला आग लावली. जर्मनांना जबरदस्त नुकसान पोहोचलें; रात्र उलटून जाईपर्यंत तोफगोळ्यांचे स्फोट चालूच होते.

**आगस्ट २४ :** दोन वेळां आम्ही नदी–उतारांचा नाश केला. जर्मन त्यांची दुरुस्ती करतात न करतात तोंच आमचे शिपायी गडी त्यावर तुटून पडतात. आठ वेळां आम्ही जर्मनांचें दळणवळण तोडून टाकलें.

**आगस्ट २५ :** आम्ही जर्मनांचीं एकटीं दुकटीं विमानें नष्ट केली

हरप्रकारच्या मालानें भरलेल्या अठरा सहा–टनी मालमोटरगाड्यांना आगी लावल्या. ६७ नाझी शिपायांना लोळवलें. शस्त्रास्त्रें हस्तगत केल्याशिवाय आमचे गनीमी सैनिक कधींच परतत नाहींत. आम्ही जर्मन रायफलींचा डोंगरच जमविला आहे.

**आगस्ट २६ :** ' एस. 'च्या तुकडीनें पुठ्ठयाच्या कारखान्या नजीक एका जर्मन मोटर–तुकडीवर छापा घातला. आम्ही पेट्रोल वाहणाऱ्या अकरा सहा–टनी माल मोटारींचा, व आठ टँकमोटारींचा संपूर्ण नाश केला; शिवाय तीस शिपायी व नऊ अमलदार लोळवले; त्यांपैकीं एक लेफटनंट–कर्नलच्या पोषाखांत होता.

**आगस्ट २७ :** आज ' व्ही 'नें नशीब काढलें म्हणावयाचें ! त्यानें व त्याच्या साथीदारांनीं पाळत ठेऊन एक अमलदारांची मोटार गांठली; त्यांत सहा अमलदार होते; त्यांपैकीं अवघा एकच अमलदार जिवंत सुटला.

—०—

# २

# एका युक्रेनियन गनीमी कमांडरची डायरी

( पश्चिम युक्रेनमध्यें व्हिनित्सा विभागांत मुकाबला करीत असलेल्या एका गनीमी कमांडरच्या डायरीमधील उतारे खाली दिले आहेत. हा कमांडर पूर्वी यांत्रिक–औतांच्या एका ठाण्याचा सर अधिकारी होता.)

**आक्टोबर :** 'झेड' या खेडयावर रात्रीं छापा घातला. या खेड्यांत सुमारें वीस जर्मन दरवडेखोर रात्रीं वस्तीला होते. सर्वांचा संगिनीनीं फडशा पाडला.

**आक्टोबर ५ ·** रेल्वे लाइनीला भुइसुरुंग पेरले;जर्मन शिपायी नेणारी एक गाडी उलथून दिली तीन डब्यांच्या तर ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. एकूण सत्तर नाझी ठार झाले.

**आक्टोबर ६ :** आमच्या तुकडीमधील दोघांनीं झुडपांतून जर्मन मोटारीवर गोळीबार केला; आणि तीन अमलदार व त्यांचा शोफर यांना ठार केलें. मोटारीची नासधुस झालेली नसल्यानें ती मोटार व ऑफिसराची हत्यारें आमच्या ठाण्यार आणण्यांत आलीं.

**आक्टोबर ९ :** एका खेड्यामधील लोकांनीं आम्हाला खबर दिली कीं पूर्वीचा एक जमीनदार इव्हॅन चेंको याला जर्मनांनीं खेड्याचा सरपंच नेमिले आहेत. त्यानें शेतकऱ्यांना लुटण्यास, चांगल्या सकस जमिनी बळकावण्यास व शेतकऱ्यांना सक्तीनें राबविण्यास सुरवात केली आहे. रात्रीं आम्ही त्या घरभेद्याला गोळी घालून ठार केलें !

**आक्टोबर ११ :** सामानाच्या कोठाराला आग घातली. तेरा जर्मन ठार झाले.

**आक्टोबर १४ :** जर्मनांच्या एका लूटघेऊ तुकडीवर हल्ला चढविला. दोहों बाजूनीं भडिमार एक तासावर चालू होता. आम्ही एक अम्मलदार व १५ शिपायीं ठार केले. दोन लॉऱ्या, एक मोटार, एक छोटी मशीनगन, तीन ऑटोमॉटिक रायफली, आठ रायफली व दोन रिव्हालव्हर हस्तगत केले.

---

## गनीमी खबरखातें

गनीमी तुकडी बरोबर कामगिरीवर असलेला अलेक्सी सिरकोव्ह यानें सादर केलेला अहवालः—

रात्रीं गनीमी तुकडीच्या ठाण्यामध्यें रेडिओवर मास्को स्टेशन लावण्यांत येतें. बातमी टिपून व पुन्हा लिहून तिच्या प्रती काढण्यांत येतात. अर्ध्या तासांत गनीमी जासूद या प्रती घेऊन भोंवतालच्या खेड्या खेड्याकडे रवाना होत असतात.

हे जासूद वाटेल तें धाडस करतात. झेड-एच या खेड्यांत जर्मनानी सोविएट युनियन व लाल फौज यांच्या संबंधी खोट्या अफवा पसरविल्या होत्या. हें कळून येतांच एक तरुण मोटारीनें तडक त्या खेडयांत घुसला व मोटारीमध्यें उभें राहून तो लोकांना उद्देशून म्हणालाः

“ सामाईक शेतीवरील भाईनों, जर्मनानीं पसरविलेल्या गटारगप्पा तुम्हीं ऐकल्या आहेत. आतां खरी वस्तुस्थिति काय आहे ती ऐका. ”

इतकें म्हणून त्यानें आपल्या फाटक्या खिशांतून सोव्हिएट बातमी खात्यानें काढलेलें ताजें माहितीपत्रक, तशाच सैबेरिया, उराल कॉकेशस वगैरे भागाकडील तारा त्यांना वाचून दाखविल्या. नंतर बरोबर आणलेलीं पत्रकें वांटून तो पसार झाला.

———0———0———

# ३

# गनीमी कमांडर व्हॅसिली जी. याची डायरी

( एका सोविएट वातमीदाराकडून )

नात्सींच्या पिछाडीकडून आज सेरिओझा नांवाचा एक तरुण गनीमी टेहेळ्या आमच्या लाल फौजेच्या तुकडीकडे आला; त्यानें बरोबर एक चिठ्ठी आणली होती, ती अशी :

"सेरिओझा सांगेल त्या ठिकाणीं आज तातडीनें या. अतिशय महत्त्वाचे काम आहे. गनीमी लढवय्यांचा सलाम"

दोन तासांच्या आंत सर्व प्रकारें सावधगिरी ठेऊन सुचविलेल्या ठिकाणीं आम्ही दाखल झालों. जंगलाच्या एका गर्द राईमध्यें गनीमी लढवय्यांची एक तुकडी एका मोठ्या शेकोटी-भोंवती जमलेली आम्हाला आढळून आली. या तुकडीचा कमांडर व्हॅसिली जी. यानें आम्हाला खालील प्रमाणें माहिती कळविली.

"एक दोन दिवस, तुम्हाला येऊन मिळावे व विश्रांति, अंघोळी, झोप वगैरे उरकावींत या हेतूनें आम्ही अघाडीची रांग उलटून जाण्यासाठीं निघालो. परंतु, वाटेंत आम्हाला पेट्रोल व दारूगोळा वाहून नेणाऱ्या १५० मोटार लॅरींच्या एका ताफ्याचा तलास लागला. सर्व दिवसभर सुयारी कोठार बांधीत असलेल्या जर्मनांच्यावर आम्ही टेहेळणी ठेवली होती. आम्ही लवकरच त्यांना सलामी देण्याचें ठरविलें."

मी त्या कमांडरला त्यांच्या हालचाली विषयीं माहिती विचारली. तेव्हां त्याने चुरगळलेली एक चोपडी माझ्या हवाली केली, व तो म्हणाला, "ही चोपडीच घ्या कशी. वेगळें कांही सांगण्याची जरूरच नाहीं. तिच्यांत तुम्हाला सर्व कांहीं लिहिलेलेंच सांपडेल."

त्याच्या डायरीतील कांहीं उतारें येथें देतो :—

**सप्टेंबर ९ :** आम्ही 'एम्' हें ठिकाण सोडतांच कांहीं जर्मन आमचा पाठलाग करूं लागले. आम्ही एका खेड्यांत शिरतांच त्यांनीं खेड्याला वेढा देऊन आम्हाला घेरलें. त्यांचा प्रयत्न आम्हाला रस्त्यावर खेचण्याचा होता. शत्रूची संख्या एका पलटणी येवढी होती व ते मशीनगन व रायफलीनिशी होते. आम्ही कसें तरी त्यांना मागें रेटलें; माझ्या कानांतून एक गोळी आरपार गेली. कॉम्रेड व्ही. याच्या हाताला जखम झाली आहे. परंतु तो ठीक आहे. जर्मनांच्या पैकीं ६ जण मारले गेले व कित्येक जखमी झाले.

**सप्टेंबर १२ :** 'के' आणि 'सी' या ठिकाणामधील रस्त्याला भुइसुरुंग पेरले; आणि रस्त्याच्या कडेनें झुडपामध्यें दबा धरून बसलों. प्रथम आम्हाला चार मोटार सायकलवाले इसम मशीनगनसह येतांना आढळले. त्यांच्या पाठोपाठ दारूगोळ्यांच्या तीन लॉऱ्या आल्या. पहिल्या लॅारीचा भडका उडाला; आणि दुसरी लॅारी पहिलीवर आदळून तिनेंही पेट घेतला;

आठ जर्मन शिपाई ठार झाले. तिसऱ्या लॉरीचा देखील भडका उडाला. आमच्या बाजूला प्राणहानी मुळीच झाली नाहीं.

**सप्टेंबर १५ :** बेलियाव्हका या खेड्यांतून सामाईक शेतीवरील एक म्हातारा शेतकरी आला. त्यानें रडत रडत आम्हाला तेथें झालेल्या अत्याचारांची हकीकत कळविली. जर्मनांनीं चौदा जखमी लाल सैनिक, दोन कमांडर व दोन शेतकरी यांना एका घरांत कोंबून, घराच्या भिंतीवर रॉकेल ओतून, घराला आग लावून दिली. मुलींच्यावर हात टाकण्यांत येऊन त्यांना वेगळ्या घरांत कोंडण्यांत आले होतें. तीन दिवस त्या मुलींच्या किंकाळ्या व बंदुकींचे आवाज ऐकूं येत होते. जर्मनांची एक कंपनी खेड्यांत असून एक तुकडी पाहाऱ्याच्या कामावर असते.

**सप्टेंबर १७ :** आम्ही त्या खेड्यांत येऊं असे आम्ही त्याला वचन दिलें. आम्ही तेथें रात्रीं पोहोचलों. पहिल्या प्रथम आम्ही जर्मन पाहारेकऱ्यांना ठार केलें. बाकीचे जर्मन दारू पिऊन धुंद होते. आम्ही त्यापैकीं पन्नासाहून अधीक लोक कुलपी गोळ्यांनीं ठार केले. बाकीच्यांनी पळ काढला. आम्ही कोंडलेल्या मुलींची सुटका केली. त्यांना नागव्या करून त्यांचे हात मागे बांधून टाकले होते व मारामुळें त्यांचे अंग काळे निळे झालेलें होते. त्या पैकीं कांहीं मुली अवघ्या बारा ते पंधरा वयाच्या होत्या.

**सप्टेंबर २० :** आज आम्ही रणगाड्याची पहिली शिकार साधली. सेरिओझानें कुलपी गोळ्यानें त्याचा निकाल लावला. भलेरेपठ्ठे ! त्या रणगाड्याचा पुरा धुव्वा उडाला होता.!

**सप्टेंबर २३ :** अखेर एक नात्सी विमानतळ आमच्या तडाख्यांत सांपडला. तळावर १७ बॉंबफेकीं व इतर मिळून ३० विमानें होतीं. पाहारेकऱ्यांची संख्या जवळ जवळ दोन कंपन्या इतकी होती; सेरिओझानें त्या तळाचा तलास काढला होता.

**सप्टेंबर २४ :** मोठ्या धामधुमीचा दिवस. मुकावल्याला आम्ही अवघे पांचजण होतों. आम्ही कुलपी गोळ्यानिशी दबत दबत तळाकडे कूच केलें. विमानांजवळ आल्यावर आम्ही उभे राहून तडक पुढें गेलों. अंधार गर्द पडलेला होता. विमानापैकीं कांहीं विमानांची उड्डाणाची तयारी चालली असावी; कारण त्यांची इंजिनें चालू होती. आम्ही २८ कुलपी गोळे फेकले; नात्सी लोकांत एकच गल्ला सुरू झाला. सोळा विमानें जळून खाक झालीं. आम्ही जंगलाकडे पळ काढला व काम्रेड 'ए'शिवाय सर्व जण सुखरूप परतलो. 'ए' बहुतेक मारला गेला असावा. आमच्या वीर मोहऱ्या, तूं धन्य आणि विजयी आहेस ! तुला खऱ्या वीरपुरुषाचें मरण लाभलें !

**सप्टेंबर २५ :** जरा थकवा आल्यानें आम्ही सारी रात्र जंगलांत झोपून काढली. रात्रीं आम्ही चोरट्या पावलांनीं पूर्वीच्या एका सामाईक शेतवाडीवरील क्लबाकडे गेलो. उघड्या खिडक्यांमधून जर्मन ऑफिसर आम्हाला दिसत होते. त्यापैकीं कांहीं, एका खोलींत टायपिंग करीत होते, कांहीं शेजारच्या खोलींत भिंतीवर टांगलेल्या नकाशाचें निरीक्षण करीत होते. आम्ही एकेका खिडकीतून दोन दोन कुलपी गोळे फेकले.

**सप्टेंबर २६ :** आजचा भाग्याचा दिवस खरा ! कॉम्रेड 'ए' सुखरुप परत आला. तो विमानतळाच्या दुसऱ्या बाजूनें जंगलाकडे सटकला होता; परंतु मध्यंतरी त्याचा रस्ता चुकला. तो भुकेला व अस्ताव्यस्त दिसत असला तरी आनंदी व तरतरीत होता.

**ऑक्टोबर १ :** नात्सींकडून आम्हाला गाठण्याचे शिकस्तीचे प्रयत्न चालू आहेत. त्यांच्या घोडघेउ पलटणींनीं साऱ्या जंगलाला वेढा दिला आहे. चार दिवस आम्ही त्याना

झुकांड्या देत आहों. एका चकमकींत आमचा वीरगडी कॉम्रेड ग्रेगरी कामास आला. आम्हीं सात नात्सींना लोळविले. सेरिओझाला हा जंगली मुलुख अगदीं हाताच्या तळव्यासारखा परिचित आहे; आणि आज तरी आम्ही शत्रूचा वेढा फोडून बाहेर पडलो याचें श्रेयहि त्यालाच आहे. माझ्या पायाला गोळी लागली आहे; पण मी चालूं शकतों. हाडाला धक्का लागलेला नाहीं. नात्सी ज्या रस्त्यानें माणसांची व दारुगोळ्याची कुमक आघाडीवर नेत आहेत त्या रस्त्याला सुरुंग पेरण्यासंबंधीं हुकुम घेऊन लालफौजेकडून एक जासूद येऊन पोहोंचला आहे.

**ऑक्टोबर ३ :** रस्त्याच्या चारशें यार्ड भागांत भुइसुरुंग पेरले. याशिवाय जर्मन मुख्य ठाण्यांना जोडणाऱ्या टेलिफोनच्या साडेतीन मैल लांबीच्या तारा तोडून गुंडाळून घेतल्या. आम्ही मिळविलेली तार चांगली जाड व आच्छादित आहे.

**ऑक्टोबर ६ :** जर्मनांच्या मोटारीवरच्या फिरत्या भिशीवर हल्ला चढविला व ती जाळून टाकली. आम्ही जंगलापर्यंत पोहोचतों न पोहोचतों तोंच नात्सींची मोटारी पायदळ पलटण येऊन थडकली. ती पलटण जळत असलेल्या फिरत्या भिशीजवळ थांबली व तिनें जंगलावर मशीनगन—भडिमार सुरू केला.

**ऑक्टोबर ८ :** आम्ही 'एम्' या ठिकाणीं आलो व तेथें एका नात्सी सूडघेऊ पलटणीवर हल्ला चढविला. चकमकीनंतर आम्ही दलदलीकडे माघार घेतली. जर्मनांनीं माझ्याविषयीं मोडक्या तोडक्या रशियन भाषेंत काढलेलें एक पत्रक खेड्यांतून आणलें आहे:—

## रहिवाशांना हुकुम

आम्हाला या विभागांत, ज्यू कमांडर 'जी' याच्या नेतृत्वाखालीं हालचाली करणाऱ्या गनीमी लढवय्यांची खबर मिळाली आहे. तीन दिवस—या तीन दिवसांत या व आपले गुन्हे कबूल करा; नाहीतर तुम्हाला कुत्र्यासारखे गोळ्या घालून ठार करण्यांत येईल. आम्ही गनीमी हालचाली सहन करणार नाहीं. रहिवाशांना हा अखेरचा इशारा देण्यांत येत आहे. गनीमी लढवय्यांना जो मदत करील त्याला जागच्या जागीं गोळी घालण्यांत येईल.

**लेफ्टनंट इव्हॉल्ड स्पान**

आम्ही हें पत्रक वाचून खूप हंसलों. मी स्वतः ज्यू नाहीं; परंतु आमच्या कंपनीमध्यें तीन ज्यू असून ते खंदे लढवय्ये आहेत. ठीक आहे ! स्पान हा जर्मन सूडघेऊ पलटणीचा कमांडर आहे काय ?! या यमदूताला हात दाखविलाच पाहिजे !

**ऑक्टोबर ९ :** वेलियाव्हकाच्या दलदली पलीकडील झाडीमधला दारुगोळ्याचा साठा उडवून दिला. सामाईक शेतीवाले किसान सांगतात, कीं, स्पान यानें जंगल धुंडण्यास सुरवात केली आहे. त्यानें आपल्या पलटणीच्या तीन तुकड्या केल्या आहेत. त्याच्या सर्व शिपायांजवळ ऑटोमॅटिक रायफली आहे. सेरीओझा नाहींसा झालेला आहे. साऱ्या दिवसांत त्याचा थांगपत्ता नाहीं !

**ऑक्टोबर १० :** स्पान आमचा व आम्हीं त्याचा पाठलाग करीत आहोंत. नात्सीलोक जंगलात व दलदलीत घुसण्याला भितात. आम्ही 'टी' या ठिकाणीं आलों. तेथें सर्व कांहीं उध्वस्त झालेलें आढळलें. नात्सी बदमाष स्पान याची धाड तेथें येऊन गेली होती, त्यानीं म्हाताऱ्या बायांना नागवे करून बर्फावर निजवून चाबकानें फोडून काढलें होतें. गनीमी लढवय्यांना मदत केल्याचा त्यांच्यावर वहीम होता. त्यांनीं दोन मुली मोटारींत घालून पळविल्या आहेत.

**ऑक्टोबर ११ :** स्पानचा निकाल लागला. तो प्रकार असा : आम्हांला एका म्हातान्या बाईनें खबर दिली कीं स्पान दारू पिऊन धुंद होऊन आलेला आहे. त्याच्या बरोबर १८ इसम आहेत. त्यांनीं सुद्धा बरीच झोकलेली आहे. पाहान्यावर कोणी नाहीं. नात्सी खेड्याभर बायकांचा पाठलाग करीत आहेत.

आम्ही त्या खेड्यांत दोन्ही बाजूनीं प्रवेश केला. स्पानला दोन शिपायांसह पकडण्यांत आले. इतरांनीं निकराचा सामना दिला. आम्ही त्यांच्या ऑटोमॅटिक रायफलीं हस्तगत केल्या. आमची नुकसानी : कॉ. मॉइसी कामास आला व इतर दोघेजण जखमी झाले.

आम्ही स्पानची चौकशी केली. हा नात्सी ऑफिसर गुडघे टेकून दया भाकूं लागला ! आम्ही निकाल देऊन त्याला फाशी दिलें.

गनीमी कमांडरची डायरी संपते. टेहेळ्या सेरीओझा पुन्हा परत आला; आणि त्यानें बरोबर जर्मन कागदपत्रांनीं व नकाशांनीं भरलेले एक दफ्तरहि आणलें. चार दिवसांपूर्वी आमच्या टेहळ्या टोळीनें खबर आणली कीं 'पी' खेडयाच्या आसपास भयंकर आगी व स्फोट सुरू होते. ह्या आगी व स्फोट दोन दिवस चालू होते. एकूण व्हॅसिली जी. यानें आपली कामगिरी बजावली असली पाहिजे.

---o---o---

# ४

# बेसारेबियन गनीमी कमांडरची डायरी

(बेसारेबियामधील जर्मन-रुमेनियन लष्करानें कब्जा केलेल्या विभागांत लढणान्या एका गनीमी कमांडरच्या डायरीमधील उतारे.)

**जुलै २५ :** आम्ही चढाईखोर लष्कराच्या पिछाडीला आहोत. आम्ही नदी काठच्या झाडाझुडपांत लपून असतो. आम्हाला जाणान्या येणान्या जर्मन व रुमेनियन तुकडया दिसूं शकतात. आमच्या गटांत आम्ही पांच जण असून आमच्यांत अवघ्या दोन रायफलीं आहेत.

**आगस्ट ३ :** काल रात्रीं मागें पडलेल्या कांहीं शिपायांची गांठ पडून थोडावेळ चकमक उडाली. दोन रुमेनियन ठार झाले. आम्ही दोन रायफली, बरीच काडतुसें व कांहीं कुलपी गोळे हस्तगत केले. आतां आमच्या जवळ पुरेशी शस्त्रसामुग्री आहे.

**आगस्ट ता. ५ :** गेल्या दहा दिवसांत आमची संख्या तिप्पटीनें वाढली आहे. आम्हांला मिळालेल्या साथीदारांत 'पी' या खेड्यातील एक सामाईक शेतवाडीचा प्रमुख व्यवस्थापक व त्याचे दोन मुलगे आहेत. काल रात्रीं आम्हीं दोन रुमेनियन मोटारी आडवल्या. आमची शस्त्रसामुग्री आता वाढत चालली आहे.

**आगस्ट ता. १० :** एवढ्यांतच आमच्या तुकडींतील संख्या ३९ वर गेली आहे. पांच

दिवसांत आम्ही चाळिसाहून अधिक जर्मन व रुमेनियन शिपायांना पाणी पाजलें. काल आम्ही दोन मशीनगनीं व तीन लॉऱ्या हस्तगत केल्या.

**सप्टेंबर ता. २ :** महिना लोटला. सुरवातीला मी व माझ्याबरोरच्या चार साथिदारांनीं गनीमी तुकडी बनविली. ते चारी साथिदार आतां लहान गटाचे दुय्यम कमांडर झाले आहेत. आमच्याजवळ इतकी शस्त्रसामुग्री आहे कीं आम्हाला आतां आणखी पांच तुकड्या सज्ज करतां येतील. हेरगिरीच्या कार्याकडे आमचें विशेष लक्ष असते. आमच्या बरोबर आतां २५ हेर आहेत; व त्या प्रत्येकाजवळ ऑटोमॅटिक रायफली व पिस्तुलें आहेत. महिन्याच्या अवधींत आम्ही २५९ रुमेनियन व जर्मन सैनिक व १७ ऑफिसर गारद केले. चार रणगाडे, सात चिलखती गाड्या, ९ तोफा, १९ लॉऱ्या, दोन रेडिओ स्टेशनें व ९१ घोड्याच्या गाड्या नष्ट केल्या; आणि एक विमान निकामी करून टाकलें.

**आक्टोबर ता. ७ :** आमच्या या विभागांत आतां पांच तुकड्या लढत आहेत. बरेच वेळां आम्ही एकवटून एकादी योजना हातीं घेतो. बदमाष शत्रूंनीं आमच्यापैकीं तिघांना फासावर लटकवले आहे व आमची खेडीं उध्वस्त केलीं आहेत.

**आक्टोबर ता. १५ :** आमच्या विरुद्ध जर्मनांनीं पाठविलेल्या एका मोठ्या सूडघेऊ तुकडीचा धुव्वा उडवला. जो जो हातीं लागला त्याला आम्ही कापून काढला. एकाचीहि गय केली नाहीं. आम्ही एकूण शहात्तर सैनिकांचा फडशा पाडला. बाकीच्यांनीं पळ काढला.

——0——0——

# ५

# हुतात्मा !

एका सोविएट गनीमी तुकडीनें शत्रूच्या पिछाडीला सात आठवड्यावर यशस्वीपणानें लढत दिली. त्यांची संख्या वाढल्यामुळें त्यांना एकत्र हालचाल करणें धोक्याचें वाटतांच त्यांनीं आपली लहान लहान तुकड्यांत विभागणी केली.

एके दिवशीं चार गनीमी लढवय्ये एका गटानें बाहेर पडले. ते एका जंगलाच्या शीवेवर आले तेव्हां पहाटेचा सुमार होता. त्यांना आपल्या पाठीमागून २० सायकल वाले जर्मन येत असल्याचा सुगावा लागला. लपण्याला अवकाशच राहिला नव्हता, कारण ऑटोमॅटिक सायकलवाल्या सायकलस्वारांची दुसरी तुकडी समोरून येत होती.

या दोन तुकड्यांच्या कचाट्यांत सापडून सुद्धां गनीमी लढवय्यानीं दहा मिनिटें त्यांना दाद दिली नाहीं. २ लढवय्यांचे बळी पडले. एक घायाळ झाला होता, पण तो सटकला. राहिलेल्या एकाला जर्मनांनीं पकडून त्यांच्या ताब्यातील एका खेड्याकडे खेचीत नेलें. मध्य-

रात्रीं घायाळ झालेल्या आमच्या शिपायाला त्या खेड्यावर प्रकाशाची झळक तळपत असलेली दिसून आली. पहाटे तो दबत दबत त्या खेड्यांत शिरला तेव्हां आदल्या रात्रीं घडलेला प्रकार त्यांच्या कानीं पडला :

त्याला जी ज्वाळा दिसली ती गनीमी लढवय्याला जिवंत जाळला त्याच्या चितेची होती. घायाळ व रक्तबंबाळ स्थितींत नात्सींनीं त्याला खेड्यांतील लोकांसमोर प्रश्न विचारले. त्याच्या स्तब्धपणामुळें चिडून जाऊन जर्मनांनीं त्याच्या जखमांत संगिनी भोसकल्या; त्याचे दांत पाडले; त्याच्या तोंडावर फटकारे लगावले व त्याच्या तोंडांत खंजीर खुपसून तें उकललें. तरी त्या बहाद्दराच्या तोंडून एक शब्द बाहेर पडला नाहीं !

त्यानंतर त्यांनीं त्याला धान्याच्या कोठाराकडे ओढीत नेऊन दाराशी जखडलें व भोंवती गवत रचून आग लावून दिली !

—०×०—

# ६

# आजोबा

## ( युक्रेनमधील एका ठिकाणाहून )

त्या व्यक्तीला लोक आजोबा म्हणतात तें कांहीं त्याच्या वयावरून किंवा पांढऱ्या दाढीवरून नव्हे. त्याचें नांव आजोबा पडण्याचें कारण त्याचा अनुभव व त्याचा धोरणी, चतुर व हिकमती स्वभाव हें होय. त्याचे सर्व हुकुम करड्या शिस्तीनें पाळले जातात आणि त्याचा दरारा एखाद्या लष्करी अम्मलदाराच्या तोडीचा आहे.

या आजोबांचा विशेष हा कीं त्यांनीं फक्त दोन वर्षें घोडदळामध्यें नोकरी केली होती. याहून वेगळा लष्करी अनुभव त्यांना नव्हता. असें असून त्यांनीं लष्करी डावपेचांत एखाद्या तज्ञाला शोभेल अशी करामत दाखविलेली आहे.

युद्धापूर्वी तो एका सहकारी संस्थेंत छोटासा कारागीर व स्थानिक सोविएटचा अध्यक्ष होता. सोविएटवर आक्रमणाची धाड आल्यानंतर त्यानें एका गनीमी तुकडीची उभारणी केली; भोंवतालच्या खेड्यांतील व सामाईक शेतांवरील लहानथोर लोक त्यांत उत्साहानें भराभर सामील झाले. हल्लीं या तुकडींत स्थानिक हिशेबखात्यांतील एक हिशेबनीस, दोन कृषितज्ञ, एक स्थानिक विद्युत्-गृहावरील एंजिनियर, व पांच यांत्रिक औत चालविणारे ड्रायव्हर सामील आहेत. त्यापैकीं रणगाड्यांच्या चकमकींत या ड्रायव्हरांचा अतिशय उपयोग होतो. या तुकडींत दोन स्त्रिया आहेत:एक 'आजोबांची' पत्नी व दुसरी ग्लाशा मावशी. ग्लाशा मावशी ही एका सामाईक शेताची प्रमुख होती. त्यांच्याकडे अन्नवस्त्राचा पुरवठा, टेहळणी व वेळ प्रसंगीं प्रचार

हीं खातीं सोपविलेलीं आहेत. ग्लाशा मावशींचा अधिकार अप्रत्यक्षपणें आजोबांच्या खालोखाल समजण्यांत येतो. ग्लाशा मावशी स्वभावानें शांत, धिम्मी व धीराची बाई असून आजोबांनाहि हार जात नाहीं !

या तुकडीमधील सर्वांत तरुण शिपायी त्योशा हा अवघा १४ वर्षांचा आहे. तो ग्लाशा मावशीचा सर्वांत धाकटा मुलगा असून तुकडीमधील आजोबासुद्धां सर्वांची त्याच्यावर मोठी मर्जी आहे; आजोबा त्याच्याकडे अतिशय अवघड अशीं टेहळणीचीं कामें देत असतात.

एक दिवशीं त्योशानें खबर आणली कीं एका मुख्य रस्त्याच्या कडेला एका खोल दरींत नात्सींनीं आठ टँक नजरभूल घेरून ठेविले आहेत. आजोबाचा त्या बातमीवर विश्वास बसेना.

"तूं म्हणतोस ते टँक शत्रूचेच आहेत अशी तुझी खात्री आहे ?"

अहो काम्रेड कमांडर, नक्की ते शत्रूचेच आहेत. त्यावर तें सैतानी चिन्ह—काय म्हणतात त्या चिन्हाला बरं ?—तें देखील आहे. आजोबा त्योशाला व आणखी दोन साथीदारांना बरोबर घेऊन टेहळणीला निघाला. त्या तरुण पोराचा होरा चुकीचा नव्हता. आठ जर्मन टँक एका रांगेनें लावले होते. त्यापैकीं कांहीं टँकांमधील पेट्रोल बहुधा संपलेलें असावें. कारण कांहीं नात्सी अधिकाऱ्यांना पुढें जाऊन शिपायाबरोबर कुजबुजतांना त्योशानें पाहिलें होतें.

आपल्या ठाण्याला परत येऊन आजोबानें आपल्या तुकडीचे तीन गट केले. पहिली तुकडी रायफलवाल्यांची, दुसरी आग—बाटलीवाल्यांची व तिसरी यांत्रिक औतांच्या ड्रायव्हरांची व त्यांच्या मदतनिसांची; अशी तुकड्यांची विभागणी केलेली होती.

अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेऊन गनीमी लढवय्यांनीं त्या दरीपर्यंत मजल मारली. आजोबा व त्योशा एका झाडावर चढले व आग—बाटल्या घेतलेले इसम पुढें घुसले. आजोबानें इषारा देतांच त्यापैकीं चार टँकांवर ३० आग—बाटल्या झुगारल्या गेल्या; त्याबरोबर त्यांच्यामधून बारा जर्मनांनीं बाहेर उड्या घेतल्या. रायफलवाल्यांनीं व स्वतः आजोबानें आपल्या जवळील छोट्या मशीनगननें त्यांचा फडशा पाडला. ही चकमक सुमारें एक तासभर टिकली असेल नसेल इतकेंच. ड्रायव्हरांपैकीं कांहींनी शत्रूचे तीन टँक जवळच्या लाल फौजेच्या तुकडीकडे पळविले. राहिलेल्या टँकांचा खेड्यांतील लोहारांनीं निकाल लावला.

लाल फौजेच्या तुकडीचा कमांडर आजोबाचा दोस्त होता. त्याच्याकडून आजोबाला खालील आभार प्रदर्शक पत्र मिळालें.

"तुमच्या पहिल्या नजराण्याबद्दल आभार. तुम्ही आम्हाला असेच आणखीहि नजराणे पाठविण्यास अर्थातच संकोच करणार नाहीं. तुम्हाला तुमच्या कार्यांत आम्ही मनापासून यश चिंतितों."

आजोबाच्या या तुकडीविषयीं या प्रदेशांतील नात्सींमध्यें अनेक सुरस व चमत्कारिक कथा पसरलेल्या आहेत. त्यांनीं आजोबाचा पत्ता काढण्यासाठीं जंग जंग पछाडलें. परंतु आजोबा म्हणतो त्याप्रमाणें, त्यांचे हे प्रयत्न म्हणजे उघड्या मैदानावर वाऱ्याला पकडण्याच्या प्रयत्नासारखे होत !

# ७

# स्मॉलेन्स्क टापूमधील गनीमी लढवय्ये

### ( ले. लष्करी बातमीदार–फेडोरोव )

स्मॉलेन्स्क टापूमधील जनतेनें चढाईखोरांविरुद्ध चोहोंकडे उठाव केला आहे. जिल्ह्याच्या नुसत्या पश्चिम विभागांतच कित्येक गनीमी तुकड्या लढत देत आहेत. मिन्स्क टापूमधील एका गनीमी तुकडीनें तळ टाकून थांबलेल्या एका २०० रणगाड्यांच्या काफल्यावर कुलपी गोळ्यांचा व आग–बाटल्यांचा वर्षाव केला. कित्येक रणगाडे जळून खाक झाले; व तेथील शेतांमध्ये जर्मन ऑफिसर व शिपाई यांची प्रेतें इतस्ततः पडून राहिलीं होतीं. गनीमी लढवय्यांनीं आपली कामगिरी बजावून ताबडतोब जंगलाचा आश्रय घेतला

नंतर ५९१८। जर्मन लोक हिवाळ्यासाठी लष्करी निवाऱ्याचा तळ बांधीत असल्याचें मिखाइलोव्ह याच्या गनीमी तुकडीच्या आढळांत आलें. या तुकडीनें झोपड्या पुऱ्या बांधून होईपर्यंत दम खाल्ला व नंतर तिच्यातील एका गटानें छापा घालून त्या भस्मसात् केल्या !

व्हिलिझ येथील एका पुळ्याच्या गिरणीनजीक जर्मनांनीं दळण्याची गिरणी उभारली होती. त्या गिरणीमध्यें ते आसपासच्या सामाईक शेतामधील धान्य दळून घेत असत. ह्या गिरणीचा पत्ता लागतांच तेथील स्थानिक लढवय्यांपैकीं सुमारें तिनशें बहाद्दरांनीं त्या गिरणीचा धुव्वा उडवून दिला.

एका शास्त्रीय तज्ज्ञाच्या नेतृत्वाखालील एका गनीमी तुकडीनें पांच नात्सी विमानें नष्ट केलीं. प्रेचिस्टेन जिल्ह्याच्या बोल्शेव्हिक पक्षाच्या चिटणीसाच्या नेतृत्वाखालीं आणखी एक गनीमी तुकडी होती. या तुकडीनें बोर्का या खेड्यांतील नात्सींच्या दारूगोळयाच्या कोठाराचा भडका उडवून दिला.

गनीमी तुकड्यांमुळें नात्सींच्या काळजांत धडकी भरली असून त्यांची त्यांना भयंकर दहशत बसलेली आहे. येलनिया, वेलिझ या विभागांत व प्रिचिस्टेनच्या जंगलांत एकटी दुकटी तुकडी पाठविण्याचा तर जर्मनांना धीरच होत नाहीं. स्मॉलेन्स्क टापूंत जर्मनांच्या पिछाडीला जंगलांनीं आच्छादित अशी कित्येक गांवें व खेडीं आहेत कीं जीं अजूनहि गनीमी तुकड्यांच्याच ताब्यांत आहेत. गनीमी लढवय्यांची संघटणा प्रति दिवशीं फोफावत असून तिचें दळ एक सारखें वाढत आहे.

—०—

# ८

# गनीमी पुढाऱ्याची मुलाखत

सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस लेनिनग्राड भोंवतालच्या शत्रूच्या ताब्यांतील टापूंत लढत देणाऱ्या एका गनीमी तुकडीनें शत्रूचे एक नभोवाणी केंद्र काबीज केलें. एक महिन्याच्या खटाटोपानंतर त्यांना मॉस्कोशी संबंध जोडण्यांत यश आलें. मॉस्कोमधील प्रावदा पत्राच्या बातमीदाराबरोबर त्या गनीमी तुकडीच्या पुढाऱ्याचा संवाद झाला तो असा :

**प्रावदा :** कॉ. व्ही, आम्हाला तुमच्या हालचालींची खबर सांगा बरं.

**गनीमी पुढारी :** गेल्या दहा दिवसांत आम्ही नात्सींच्यावर कित्येक छापे घातले. आम्हीं आठ यंत्रीनांगर, सहा मोटारगाड्या, नष्ट केल्या आणि ११ ऑफिसर व अनेक शिपायी लोळवले. या शिवाय आम्ही एका ६० मोटारींच्या तांड्यावर छापा घातला व शत्रूच्या तोफखान्याला दारूगोळा पुरविणाऱ्या एका कोठाराला आग घातली.

**प्रावदा :** तुमच्या प्रदेशांत जर्मनांची वागणूक कशी काय आहे ?

**ग. पुढारी :** अत्याचार व लूट यांचा धुमाकूळ सारखा चालू असतो. परंतु आमच्या या टापूंमधील जर्मन मात्र सध्या निवळलेले दिसतात. एक तर त्यांना गनीमी लढवय्यांची भीती वाटते; आणि दुसरें असें कीं, त्यांचें या टापूतील लष्कर बरेच कमी झालें आहे. बऱ्याच जर्मन तुकड्या आघाडीवर रवाना झाल्या आहेत आणि त्यांचें पिछाडीचें कार्य स्पॅनिश व झेक 'स्वयंसेवकां'कडे देण्यांत आलेलें आहे. या कारणानें कित्येक खेड्यांत जर्मन शिपायांचा मागमूसहि राहिलेला नाहीं.

**प्रावदा :** तुमच्या साथिदारांची हालहवाल कशी काय आहे ?

**ग. पुढारी :** सब खैरीयत. आमच्या तुकडीच्या संख्येंत रोज नवी भर पडत आहे. स्थानिक लोक व जर्मनांच्या पिछाडीच्या बाजूने निसटलेले, किंवा शत्रूच्या ताब्यांतून निसटलेले लाल फौजेतील शिपायी, आम्हाला येऊन मिळत आहेत. आमच्या बरोबर कित्येक स्त्रिया काम करीत आहेत; त्या आमच्या साठीं अन्न वगैरे शिजवून शिवाय जखमी शिपायांची शुश्रुषा करीत असतात. पुष्कळ वेळां जिल्ह्याच्या टापूंत हिंडून तर कधींकधीं थेट 'एन्'या शहरांत घुसून त्या टेहळणीचीं कामेंहि करीत असतात. त्या पुष्कळवेळां अतिशय महत्त्वाच्या बातम्या घेऊन येतात.

**प्रावदा :** आमच्या आघाडीवर व आमच्या पिछाडीला काय चाललें आहे ह्याची बातमी तुम्हाला मिळते काय ?

**ग. पुढारी :** जवळ जवळ नेहमीं मिळते. आमच्या तुकडींत असे सांडणीस्वार आहेत कीं जे

लाल फौजेशी नेहमी दळणवळण ठेवतात. या शिवाय आमच्या जवळ कांहीं नभोवाणी यंत्रेहि आहेत. आम्ही रोज मॉस्को स्टेशन व सोविएट माहिती खात्याची पत्रकें ऐकत असतों. आमच्या पैकीं कांहींजण भोंवतालच्या खेड्यांत जाऊन तेथील लोकांना ताजी खबर पुरवितात. सामुदायिक शेतकऱ्यांना या गोष्टीची इतकी संवय पडली आहे कीं ते आमच्या पैकीं कित्येकांना नांवाने ओळखतात व त्यांची आतुरतेनें वाट पहात असतात.

**प्रावदा :** तुम्ही दारूगोळा व शस्त्रास्त्रें यांची तरतूद कशी करता ?

**ग. पुढारी :** आमचा शस्त्रसामुग्रीचा साठा तूर्त कांहीं कमी नाहीं. शिवाय शत्रूंना लुटून त्यांत भर टाकण्याचा आमचा क्रम सारखा चालूंच असतो. आमच्या जवळ जर्मन लष्करांत वापरण्यांत येणाऱ्या रायफली, यांत्रिक तोफा, पिस्तुलें आणि हरतऱ्हेचे कुलपी गोळे वगैरें सामुग्री जमली आहे. आम्हाला शस्त्रें व दारूगोळा यांची वाण पडत नाहीं; कारण, आम्ही तीं जर्मनांच्या कडूनच बळकावतों !

—0—0—

# ९

# चढाईखोरांची वासलात

**(लाल फौजेच्या तुकडीशी दळणवळण जोडण्यासाठीं मॉस्कोच्या रणक्षेत्रावरील शत्रूच्या पिछाडीकडून परतलेल्या एका गनीमी तुकडीच्या कमांडरची मुलाखत.)**

ता. ६ नोव्हेंबर रोजीं आम्ही जंगलामधील एका झोपडींत कॉम्रेड स्टालिनचें भाषण ऐकत होतों. "एकूण एक नात्सी जर्मनांचा फडशा पाडा" ही स्टालिनची घोषणा आम्ही ऐकली.

आम्ही तेंच कार्य आमच्या डोळ्यापुढें ठेविलें होतें. प्रत्येक खेड्यांतून, प्रत्येक घरांतून, जर्मनांना पिटाळून लावण्याचा आम्ही निर्धार केलेला होता. आमच्या रशियन घरांची ऊब आम्ही त्यांना मिळूं देणार नाहीं. रशियन हिवाळ्याचा खरा तडाखा त्यांना चाखविलाच पाहिजे.

गनीमी लढवय्यांची दहशत बसल्यामुळें जर्मनांनीं आतां शेतकऱ्यांना खेड्याबाहेर हुसकावून लावण्यास सुरवात केली आहे. पण आम्ही त्यांच्या दिनचर्येचा लक्षपूर्वक अभ्यास केला आहे. साधारणपणें बरेच हत्यारी शिपाई पहाऱ्याला ठेवून सायंकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास ते झोपतात. आमच्यामध्यें असें कांहीं बहाद्दर गडी आहेत कीं ते दबा धरीत धरीत थेट जर्मन पहारेकऱ्यांना जाऊन भिडतात; आणि त्यांच्या तोंडातून ब्र निघण्याच्या आंत त्यांना गारद करून टाकतात.

येवढें झालें कीं आम्ही चोहोकडून खेड्यांत घुसून शत्रूवर ज्वालाग्राही बाटल्या फेकतों. ठिकठिकाणीं आगीचा भडका उठला कीं जर्मन रस्त्याकडे धांव घेतात. ते रस्त्यावर आले कीं आम्ही त्यांच्यावर टँक-विध्वंसक कुलपी गोळ्यांचा वर्षाव करतों आणि वर त्यांना ऑटोमॅटिक रायफली व यंत्री तोफा यांच्या गोळ्या चारतों.

इतकें होण्याचा अवकाश कीं, जर्मनांच्यामध्यें घाबरट पसरते आणि ते भुकेल्या कोल्ह्या-प्रमाणें आरडत ओरडत सैरावैरा धावूं लागतात. धड आगी विझविण्याचाहि ते प्रयत्न करीत नाहींत. मग त्या आगी साऱ्या खेड्याभर पसरतात. इतक्या उपरहि आम्ही त्यांच्यावर कुलपी गोळ्यांचा व बंदुकांच्या फैरींचा वर्षाव चालू ठेवतोंच. नंतर त्यांची डोकीं ठिकाणावर येऊन काय झालें, कसें झालें, याचा थांगपत्ता लागण्याच्या आंत आम्ही दूरवर पसारहि झालेले असतों.

आमच्याबरोबर सामना देण्यासाठीं जर्मनांकडून ऑटोमॅटिक रायफलवाल्या तुकड्या पाठविण्यांत येतात. काल त्यांनीं आम्हाला चांगलेंच घेरलें होतें. आम्ही शत्रूवर तुटून पडलों. भीषण रणधुमाळी माजून आम्ही त्यांच्या वेढ्यांतून निसटलों. आम्ही निसटून फरारी झालो तरी आमचा छुपा तळ जेथे आहे अशी शत्रूंची समजूत होती त्या ठिकाणावर त्यांचा मारा चालू होताच.

जर्मनांच्या पिछाडीस मुख्य रस्त्यांनीं एक सारखी कुमक येत असते. पण या बाबतींत तुम्ही आम्हा गनीमी लढवय्यांवर पूर्ण विश्वास ठेवा. त्यापैकीं कित्येक रणगाडे, मोटारी आणि शेकडो शिपायी आघाडी पर्यंत कधींच पोचणार नाहींत. आम्ही त्यांचा एक सारखा फन्ना उडवीत असतो व पुढेहि असाच उडवीत रहाणार. प्रतिहल्ले चढविण्याचा आनंदाचा दिवस ज्या वेळीं उगवेल त्यावेळीं या जर्मन पेंढारापैकीं माणूस अन् माणूस कापून काढण्याच्या कामांत तुम्हाला हातभार लावण्यास आम्ही येथें सज्ज राहूं.

—0—0—

# १०

# मी गनीमी लढवय्या बनलो

लेखकः—**टी. लिलिन**

[ अन्तर्गत युद्धाच्या काळांत नांव कमावलेला वीर रिझीकॉव्ह याच्या नेतृत्वाखालील गनीमी तुकडी मधील आपल्या मुक्कामाचे हें वर्णन लष्करी बातमीदार टी. लिलिन याच्या लेखणीमधून उतरलेलें आहे. यांत वर्णन केलेल्या हालचाली युक्रेनमधील द्नीपर नदीच्या आसपासच्या दलदलीच्या विस्तीर्ण प्रदेशांत घडलेल्या आहेत ]

द्नीपर नदीच्या कांठची दलदल हजारों एकरावर पसरलेली आहे. अपरिचित माणसांना हा प्रदेश म्हणजे यमभूमीच होय. तेथें तुमच्यापासून थोड्या पावलांचे अंतरावर दडलेल्या इसमाचाहि तुम्हास पत्ता लागणार नाहीं.

द्नीपर नदीच्या डाव्या किनाऱ्यावर मी व माझ्या बरोबरच्या इतर सुमारें वीस इसमांनीं एका पडावांत पाऊल ठेवलें. माझ्या बरोबरचे हे वीस इसम आसपासच्या खेड्यांतून गनीमी सैन्यांत दाखल होण्यासाठीं आले होते.

द्नीपर नदीचा डावा किनारा सोडून आमची बोट हळू हळू नदीच्या एका वळणामध्यें येऊन पोहोचली. तेथे दुसऱ्या एका सपाट होडीत बसून आम्ही द्नीपरच्या निःशब्द दऱ्यामधून मार्ग कापीत होतों. तेवढ्यांत दूरवरच्या तोफांच्या गडगडाटानें व नात्सींच्या टेहळ्या विमानाच्या घरघराटानें आम्हास भीषण वस्तुस्थितीची जाणीव करून दिली.

आमची बोट किनाऱ्याला लागली त्यावेळीं चांगलाच अंधार पडलेला होता. पाहारेकऱ्यांनीं आम्हास सावधगिरीनें हांक दिली. आम्ही त्यांना परवलीच्या शब्दानें जबाब देऊन पुढें गेलों व लवकरच गनीमी लष्कराच्या तळापर्यंत पोहोचलो.

ती संध्याकाळची अगदीं सामसुमीची अशी वेळ होती. टेहळणीवर असलेल्या शिपायांखेरीज बाकी सर्व सैनिक मुक्कामाच्या ठिकाणींच होते. ते मास्कोची नभोवाणी ऐकत होते. सभोवार गंभीर स्तब्धता पसरलेली होती. आम्ही सोबत आणलेल्या हस्तपत्रकांवर मात्र सैनिकांच्या तांबडतोब उड्या पडल्या.

द्नीपर नदीला नुकताच दुथडी पूर येऊन गेलेला होता; आणि दलदलीचा टापू इतका जलमय होऊन गेला होता कीं जुनाट झाडांच्या खोडांना फांद्यांपर्यंत पाणी भिडलें होतें. परंतु रिझिकोव्हनें आपलें ठिकाण सोडावयाचें नाहीं असें ठरविलें होतें.

त्यानें आपल्या साथीदारांस बजावलें कीं, ‘ जरूर पडलीच तर आपण झाडांचा आश्रय घेऊं आणि आपलीं शस्त्रास्त्रें झाडांच्या फांद्यांना टांगून ठेऊं; परंतु कांहीं झालें तरी येथून एकाही इसमानें हालतां कामा नये. ’

आमच्या संभाषणांत गनीमी सैनिकांनीं आपापले अनुभव कथन केले. एका खेड्यांत प्रत्येक बिनलष्करी इसम आतां गनीमी लष्करांत सामील झालेला असल्याचें जर्मनांना आढळून आलें. नात्सींच्या अंगाचा भडका उडाला. त्यांनीं खेड्यांतील स्त्रियांना जमवून बजावलें कीं गनीमी लष्कर जर चोवीस तासांचे आंत हा टापू सोडून गेलें नाहीं तर सर्व टापूच्या टापू आग घालून बेचिराख करण्यांत येईल.

जर्मनांनीं दिलेली मुदत केव्हांच उलटून गेली होती, तरी गनीमी लष्कराचा मुक्काम तेथेंच कायम होता. जर्मन व रुमानियन सैन्य या दलदलीच्या किनाऱ्याला टाचा घाशीत बसलें आहे. परंतु गनीमी लष्कऱ्यांचे छापे ज्या दिशेनें येतात तिकडे पाऊल टाकण्याची त्यांची हिम्मत होत नाहीं.

आतां सर्वजण झोपी गेलेले आहेत. फक्त कमांडरच्या झोपडींतून तेवढा कुजबुजण्याचा आवाज ऐकूं येत आहे. गनीमी टेहळ्ये मुक्कामाला परतले असून ते कमांडरबरोबर पुढील मुकाबल्याची योजना ठरवीत असावेत.

बहुतेक हा पहाटचा सुमार असावा. टेहेळेकरी आपापल्या रात्रफेऱ्या करून परत येऊं लागले आहेत.

एक नात्सी अम्मलदार चिलखती मोटारीतून शेजारच्या एका खेड्यांत शिरला असल्याची बातमी त्यापैकीं एका टेहळ्या शिपायानें, क्रिव्हेन्को यानें, आणलेली आहे. या खेड्यांतून पुढें जाण्यास दोन रस्ते फुटतात; त्यापैकीं तो कोणत्या रस्त्यानें जाईल हें नक्की नव्हतें.

गनीमी छावणीच्या कौन्सिलनें त्या गिधाडाची शिकार करण्याचें ठरवून त्या कामावर एका गटाची नेमणूक केली.

येथें छावणीच्या कौन्सिलविषयीं चार शब्द अस्थानीं होणार नाहींत. या दलदलीच्या टापूंत लढत देणाऱ्या कित्येक तुकड्या आहेत. पण या सर्व तुकड्यांचा रिझिकोव्हच्या छावणीशीं तालुक असतो. सर्व तुकड्यांमध्यें एकसूत्रीपणा असण्याची आवश्यकता त्यांना अनुभवानें कळून चुकलेली आहे.

या दलदली टापूंत या कौन्सिलला आमचें 'लष्करी कौन्सिल' म्हणून ओळखण्यांत येतें. कोणतेंहि काम हातीं घेण्यापूर्वी त्याची चर्चा या कौन्सिलमध्यें व्हावी लागते. आणि प्रत्येक लष्करी कामगिरीच्या तपशिलाची आणखी या कौन्सिलकडून चर्चा करण्यांत येते. शस्त्रास्त्रें व दारुगोळा याची वांटणीहि या कौन्सिल मार्फतच केली जाते. त्याचप्रमाणें निरनिराळ्या तुकड्यांचे कमांडर व कॉमिसार हेहि या कौन्सिलकडूनच नेमिले जातात. पण विषयान्तर आवरतें घेऊं या.

कौन्सिलनें त्या जर्मन अधिकाऱ्याच्या शिकारीसाठीं ६ जणांचे दोन गट मुक्रर केले. आमची योजना ठरली ती अशी : एका गटानें दोन रस्त्याच्या फाट्यानजीक छपून बसावयाचें व दुसऱ्याने 'के' या खेड्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला नजर-भूल पेरून झुडपांत दवा धरून बसावयाचें. पहिल्या गटाच्या तावडीतून जर का ती चिलखती मोटर सुटली तर निदान ती दुसऱ्या गटाच्या तावडीत तरी सांपडावीच.

हे सहा जण आपल्या कामगिरीवर जाण्याच्या तयारीत असतां आम्ही कांहीं गनीमी सैनिकांचा परिचय करून घेतला. हे कोण होते? एक शेजारच्या दारू गाळण्याच्या केंद्रामधील हिशेब लिहिणारा कारकून होता, दुसरा ट्रॅक्टर ड्रायव्हर, तिसरा यांत्रिक व चौथा शास्त्रीय संशोधक होता. पूर्वी हिशेबनिसाचें काम करणारी एक तरुणी शुश्रुषेचें काम पहात होती. द्वीपरच्या डाव्या किनाऱ्यावरील एका खेड्यांतील डॉक्टरच्या मदतनिसानें या दलदली टापूंत सुसज्ज वैद्यकीय केन्द्र चालविलें होतें.

आमच्या मायभूमीवर आक्रमण करणाऱ्या शत्रूवर सूड उगविण्यासाठीं हे युक्रेनभूमीचे सुपुत्र संघटित झाले होते. इव्हॅन क्रॅपिव्हेटचेंच उदाहरण घ्या. हा पूर्वीं एका डॉक्टरच्या हाताखालीं काम करीत असे. हा मोठा निश्चयी व बेडर वृत्तीचा असून सध्यां आसपासच्या खेडुतांच्या एका गनीमी तुकडीचा तो नायक आहे. क्रॅपिव्हेट या दलदलीच्या टापूंत प्रथम आला तेव्हां सुद्धां त्याला चुकल्या चुकल्यासारखे वाटलें नाहीं; तो येथें एखाद्या परिचित घरांत वावरावें तसा वावरूं लागला आहे. जणूं काय त्यानें या टापूंत कित्येक वर्षें काढलेलीं होतीं. त्याच्या हाताखालील लोक चांगले संघटित व शिस्तीचे असून ते सतत कार्यामध्यें मग्न असतात.

दुसऱ्या दिवशीं वरील सहा सैनिकांनीं एका छोट्या होडीनें नदी ओलांडली व खेड्याची टेहळणी केली. नंतर पूर्वसंकेताप्रमाणें ते ठरल्या जागीं दवा धरून बसले. किती वेळ उलटला तरी या सैनिकांनीं आपले डोळे रस्त्यावरून हलविले नाहींत. शेवटीं तिसरा प्रहर

होण्याच्या सुमारास रस्त्यावर धुळीचा लोट दिसून आला. लवकरच एक वेगानें धावणारी चिलखती गाडी त्यांच्या दृष्टीस पडली.

ही चिलखती गाडी त्यांनीं आपल्या ठिकाणापासून १५० फुटावर येऊं दिली आणि नंतर तिच्यावर गोळ्यांचा मारा सुरू केला. ड्रायव्हरनें गाडीचे ब्रेक खेचले. सेंचेन्कोनें मोठ्या कुशलतेनें एकामागून दोन कुलपी गोळे भिरकावले. गाडीतून चार रक्तबंबाळ झालेले जर्मन बाहेर पडले. त्यापैकीं तीन जणांचे रायफलीच्या मान्यानें मुडदे पाडण्यांत आले. चवथ्यानें झुडपाकडे धांव घेतली व तो कापऱ्या हातानें कसल्या तरी नकाशाचे तुकडे करूं लागला. टेहळ्यांनीं हेरलेला जर्मन अधिकारी बहुधा हाच असवा. लागलीच व्हसिली सॅमो रब्हल यानें त्यांच्यावर नेम धरून कुलपी गोळा फेकण्यां साठीं हात उगारला; टोळीच्या नायकानें त्याचा हात पकडून त्याला थांबवले व समजाविले कीं कुलपी गोळ्यामुळे त्या इसमावरोबर कदाचित् नकाशाचाहि निकाल लागेल. सेंचेन्कोनें पाठोपाठ नेम करून गोळी झाडली; लागलीच तो जर्मन इसम कोलमडून जमिनीवर आदळला.

गनीमी सैनिक लागलीच पुढें धावले; तो नकाशाहि त्यांच्या हाती पडला. मारलेला जर्मन अधिकारी संयोजन खात्यामधील एक अधिकारी होता. त्याचें नांव मेजर वेज.

आपलें काम पार पाडून गनीमी तुकडी आपल्या छावणीला परतली. त्यांनीं मिळविलेला नकाशा अतिशय महत्वाचा असल्याचें आढळून आलें. जर्मन लष्कराच्या निरनिराळ्या तुकड्यांच्या तळाचीं ठिकाणें त्यांत दाखविलेलीं होतीं. रिझिकॉव्हनें त्या नकाशाचें निरीक्षण केलें व जीभेनें 'दे' असा आनंद–दर्शक आवाज काढला.

'सेमिऑन, शाबास बेट्या !' असें म्हणून त्यानें दुसऱ्या एका सैनिकास खुणेनें बोलावलें व नदीपार असलेल्या मेजर सोकोलोव्हच्या ठाण्याकडे धाव घेण्यास सांगितलें.

"या महत्त्वाच्या कागदाबद्दल मेजर तुझे खास आभार मानील," रिझिकोव्ह उद्गारला.

नंतर वरील गनीमी तुकडीनें नात्सीं बरोबर केलेल्या या पहिल्या मुकाबल्याची हकीगत कौन्सिलनें ऐकून घेतली. त्यांच्या कारवाईची बारकाईनें छाननी करण्यांत आलीं. त्यांनीं दारूगोळा किती खर्चिला, कारवाईत भाग घेणाऱ्यांचे परास्परावरोबर वागणें कसें काय होतें, या सर्व गोष्टींची बारकाव्यानें छाननी करण्यांत आली.

रिझिकोव्हनें युक्रेनियनांच्या गांवढ्या भाषेंत या छाननीचा समारोप केला तो असा:—

"तुम्ही नकाशा मिळवलात–फार उत्तम–पण तुम्ही त्या दुसऱ्या नात्सींचे खिसे अन् पिशव्या तपासल्यात का ? नाहीं–तुमच्या डोक्यांत ते शिरलें नाहीं–घाई, घाई लागली होती तुम्हाला–छेः घाण झाली–अशा बाबतींत घाई करावी, पण जरा सावधपणानें. अच्छा, पुढच्या वेळीं लक्ष ठेवा"

आज उकाडा कोण होत आहे ! जंगलाच्या या पुसट ओळीतून सप्टेंबर मधील निरभ्र आकाश ठिकठिकाणीं डोकावत आहे. द्वीपरच्या दलदलीवर एक प्रकारची कोंडमारा करणारी खोल स्तब्धता पसरलेली आहे.

कोणाचे तरी चोरटे पाय वाजत आहेत. जर्मनांचे एक पथक आपल्या शस्त्रांचा खळखळाट होणार नाहीं अशी खबरदारी घेऊन, भरलेल्या रायफलीनिशी दलदलीमधून पुढे येत आहे.

नदीवर अंघोळी करणाऱ्या एका जर्मन पथकावर आमच्या तुकडीनें घातलेल्या छाप्यामुळें

चिडून जाऊन जर्मनानीं दलदलीच्या टापूचा ठाव घेणें कितपत शक्य आहे ह्याची चांचणी करण्यासाठीं एक तुकडी पाठविली होती.

ते चिकट जमीनीवरून सावधपणानें पावले टाकीत हळू हळू पुढें येत होते. या टापूंत दोन संगिनी इतकी खोल जमीन आहे; त्याच्या खाली द्नीपर नदीच्या पात्राकडे धावणारे असंख्य गुप्त ओहोळ व ओढे पसरलेले आहेत. गनीमी लढवय्यांच्या हालचालींच्या खुणा जेथ-पर्यंत दिसत होत्या तेथवरचा पल्ला जर्मनांनीं गाठला. कांहींशें यार्ड गेल्यावर ते थांबले. स्तब्धता पूर्वीप्रमाणें कायम होती असा कानोसा घेऊन खात्री पटल्यानें त्यांना एक मजल पुढें जाण्यास हुरूप आला,

एकाएकीं गोळ्यांच्या फैरीनें स्तब्धतेचा भंग झाला. दडलेल्या गनीमी लढवय्यांनीं या कुपणांत शिरलेल्या चोरट्या जनावरांची चांगलीच हबेलंडी उडवून दिली. ज्या टेहळ्यानें त्या जर्मन पथकावर पाळत ठेविली होती त्यानें स्वतःच त्यापैकीं दोघांना लोळविलें. जेमतेम पांच जर्मन या दलदलीतून सहीसलामत सुटले. बाकिच्यांचा जागच्या जागीं फडशा पाडण्यांत आला.

एक काळा दाढीवाला टेहळ्या डॅनिलो पोलिशचुक मोठ्या गंभीरपणानें म्हणाला, " बेट्यांना म्हणावें आमच्या वाटेस जाऊ नका, अन् आम्हाला डिवचू नका. " इतकें बोलून खांद्यावर रायफल टाकून रिझिकोव्हला रिपोर्ट देण्यासाठीं तो निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं जर्मनांनीं दलदलीत शिरण्याचा पुन्हां एकवार प्रयत्न केला. या खेपेस गनीमी सैनिकांनीं त्यांना पहिल्या वेळेइतकेहि पुढें येऊं द्यावयाचें नाहीं असा निश्चय केला होता. नदीकाठच्या झुडपांत लपत लपत त्यांनीं शत्रूची पिच्छाडी गाठून त्यांच्यावर बंदुकांचा मारा सुरू केला. आणि त्या बरोबरच समोरून रोमन सेनचेंकोच्या गटानें त्यांच्यावर हल्ला चढविला. फारच थोडे नात्सी यशस्वीपणें माघार घेऊं शकले.

या दुसऱ्या पराजयानें चिडून जाऊन जर्मनांनीं या गनीमी उपद्रवांचा कायमचा निकाल लावण्याचा चंग बांधला. एक दोन दिवसानंतर त्यांनीं दलदलीच्या टापूवर दोन मोठ्या तुकड्यानिशीं दोन निरनिराळ्या बाजूंनी चढाई केली. या शिवाय त्यांनीं दलदलीच्या उंच-वट्याच्या भागांत शेजारच्या दोन खेड्यांतून सैन्य उतरवण्याचें ठरविलें.

बरोबर दोन मोठ्या मशीन गन, भुई सुरुंग वगैरे सामुग्री एका बोटीत भरून त्यांनीं द्नीपर नदीच्या एका वळणातून गनीमी लष्कराच्या तळाकडे घुसण्याची तयारी केली. त्यांची कल्पना झाली कीं आपण गनीम्यांना बेसावध स्थितींत गाठूं शकूं. परंतु जर्मन सैन्य द्नीपरच्या काठावर येऊन पोहोचले तोंच त्यांची दोन गनीमी शिपायाबरोबर गांठ पडली. दोन्ही बाजूंनी तावडतोब गोळीबार सुरू केला. त्यांत एक स्वार मारला गेला; परंतु दुसऱ्यानें तावडतोब दौड करून जर्मनांच्या चढाईसंबधी व त्यांची संख्या किती आहे, ते कोणत्या दिशेनें येत आहेत याची बातमी रिझिकोव्हला पोहोचविली.

" ठीक आहे ! गड्यांनों, आपलीं शस्त्रें सज्ज करा " रिझिकोव्हनें हुकूम सोडला.

क्रॅपिव्हेटच्या तुकडींकडे नदीच्या किनाऱ्याच्या दिशेनें शत्रूच्या पिछाडीस घुसून शत्रूच्या बोटींचा नाश करून त्यांचा परत जाण्याचा मार्ग तोडून टाकण्याचें काम देण्यांत आलें. दुसरी तुकडी नात्सींना सामना देण्यासाठीं पुढें सरसावली.

" आम्ही त्यांचा चोर-दरवाजा प्रथम बंद करतो, मग त्या बेट्यांना म्हणावे या असे समोरा समोर, " रिझिकोव्ह चेवानें गर्जला.

छोट्या मोठ्या यांत्रिक बंदूका, रायफली, कुलपी गोळे इतका संच बरोबर घेऊन गनीमी

सैनिक झुडपांत पांगले. जर्मन जवळ आहेत असें पाहून दबा धरून पसरलेल्या या गनीमी शिपायांनीं त्यावर गोळीबार सुरू केला. जणू काय जर्मनाविरुद्ध सारें रान उठलें कीं काय, प्रत्येक झुडपानें त्यांच्यावर मारा सुरू केला कीं काय असा भास होत होता.

प्रत्येक कानाकोपऱ्याची, खाचाखळग्यांची खडानखडा माहिती असल्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं उड्या घेत व कौशल्यानें झाडाझुडपांचा आश्रय घेत त्या बहाद्दरांनीं जर्मनांच्यावर गोळीबाराचा एक सारखा मारा सुरू ठेविला होता. जर्मनांनीं घाईघाईनें नदीकडे माघार घेण्यास सुरवात केली परंतु त्यांच्या बोटी बेपत्ता झालेल्या पाहतांच त्यांच्या तडफडीला व संतापाला पार उरला नाहीं. सेंचेन्कोच्या तुकडीनें त्यापैकीं कांहीं बुडवून बाकीच्या छपवून ठेविल्या होत्या. जर्मन नदीच्या किनाऱ्यावर पोहोचतांच त्यांच्यावर पुन्हा गोळ्यांचा वर्षाव सुरू झाला.

दोन्हीं बाजूंनीं गोळीबाराच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें कोंडलेल्या उंदरांसारखी त्यांची धावपळ सुरुं झाली. कांहींनीं नदी पोहून जाण्याचा प्रयत्न केला; परंतु छुप्या गोलंदाजांनीं त्यांना टिपून गोळ्या घालून ठार केलें. कांही जणांना जमिनीलगत झुडपांत पडून राहिलों तर आपणास मागून निसटता येईल अशी आशा वाटत होती. परंतु गनीमी सैनिकांनीं झुडुप अन् झुडुप हुडकून त्यांना गाठले व त्यांच्या 'आर्य' बापजाद्याकडे त्यांची रवानगी केली. कांहीं जर्मनांनीं झाडाच्या फांद्यावर लपण्याचा प्रयत्न केला. बिचारे विसरले कीं गनीमी सैनिक कांहीं हलके शिकारी नव्हते. त्यांना तात्काळ त्यांच्या ढोल्यांतून जमिनीवर पाडण्यांत आलें.

हा पाठलाग एकूण एक नात्सींचा निकाल लागेपर्यंत एक सारखा दोन दिवस चालू होता. सप्टेंबरच्या २२ व २३ ह्या दोन दिवसांत १५० जर्मनांचा फडशा पाडला गेला व लष्करी लूट मिळाली ती वेगळीच. जर्मनांच्या ऑटोमॅटिक रायफली व मशीनगन वगैरे घेऊन गनीमीं सैनिकांनी दलदलीच्या आंतील आपल्या तळाकडे प्रयाण केलें. मागें नदीच्या कांठीं ठेवलेल्या पाहारेकऱ्यांनीं तोंवर डोळ्यांत तेल घालून किनाऱ्यावर पाळत ठेविली होती.

लवकरच दलदलीवर प्रशान्त संध्येनें पांघरूण टाकलें. द्वीपरच्या विस्तीर्ण पात्रांमध्यें झाडांची अस्पष्ट प्रतिबिंबें हालत राहिलेली तेवढी दिसत होतीं.

रात्रीचा फायदा घेऊन रिझिकॉव्हनें आपला तळ जर्मन तळापासून नजीकच्या ठिकाणीं हलविण्याची तयारी चालविली होती. तळाची आवराआवर झटपट करण्यांत आली व सर्व सामान सपाटतळी होड्यांत व शेतकऱ्यांच्या खटारगाड्यांत भरण्यांत आलें.

एका मोटार बोटीला अनेक होड्या बांधण्यांत आल्या होत्या. मोटार बोट संथपणें नदीच्या ओढ्याच्या दिशेनें बाकीच्या होड्यांना मागून घेऊन चालली होती. रात्रीच्या संथ हवेंत मोटार बोटीच्या इंजिनचा आवाज खेळत होता. राहिलेल्या सैनिकांनीं खुष्कीच्या मार्गानें प्रयाण केलें.

आम्ही मध्यरात्रीच्या सुमारास आमच्या ठरलेल्या मुक्कामाला येऊन पोहोचलों आणि दोन तासांत तंबू वगैरे ठोकून आम्ही आमचा तळ सज्ज केला. मी आपल्या तंबूतून खांजणामधील दाट झुडपांतून भटकण्यासाठीं बाहेर पडलों.

'थांबा, कोण आहे तिकडे ?'

'मित्र' मी जबाब दिला.

'मित्र,' माझ्या पाठीवर थाप मारीत दुसरा कोणी तरी पाठीमागून म्हणाला. मी मागें

वरून पाहिलें तो रुंद छातीचा मध्यम उंचीचा एक म्हातारा राईतून बाहेर पडतांना दिसला. 'अरे स्टीपान' असें म्हणत पहारेकऱ्यानें त्याला मिठी मारली. त्याचें संपूर्ण नांव स्टीपान सेमेनोव्हिच असें होतें. तो सामाईक शेतावरील एक किसान होता. त्यानें गनीमी लष्करासाठीं टेहेळणीचें काम पत्करलें होतें आणि टेहेळणीचें काम करीत दूरवर आला होता. तो शत्रूच्या पिछाडीकडून नुकताच परत आला होता. तेथें त्यानें शत्रूच्या ताब्यांत गेलेल्या खेड्यांत पत्रकें वाटण्याची कामगिरी बजावली होती.

मी ह्या हस्तलिखित पत्रकांपैकीं कांहीं पत्रकें पाहिलीं त्यापैकीं एक पत्रक पुढील प्रमाणें होतें:—

**" भाईनों आणि नागरिकांनों**

" तुम्ही सध्यां त्या सैतानानें—हिटलरनें—ताब्यांत घेतलेल्या मुलखांत रहात आहा. तुम्हाला धान्य पिकवावयास लावावयाचें, नंतर तें तुमच्याकडून हिसकावून घ्यावयाचें, हा त्यांचा नीच कावा आहे. १९१८ सालची आठवण ठेवा. तेव्हां सुद्धां जर्मनीनें युक्रेनमधील सर्व धान्य जर्मनीला वाहून नेलें होतें. आम्ही मॉस्को, ओडेसा आणि लेनिनग्राड शहरें जिंकलीं अशा थापा त्यांनीं तुम्हाला आजवर मारलेल्या आहेत. असल्या थापांवर विश्वास ठेऊं नका. 'शत्रू धूर्त आणि बदमाष आहे' हे स्टालिनचे शब्द ध्यानांत असू द्यात. आपला पक्ष न्यायाचा आहे, तेव्हां शत्रूचा पराभव झाल्यावाचून रहाणार नाहीं हें ध्यानांत ठेवा.

" नात्सी तुम्हाला घरातून हाकून लावतील; तुमच्यापैकीं अत्यंत प्रामाणिक व उत्कृष्ट लोकांचीं सरसहा कत्तल करतील. तोपर्यंत वाट पाहूं नका. शस्त्रें हातीं घ्या; गनीमी लष्करामध्यें सामील होऊन शत्रूच्या पिछाडीवर निकराचे हल्ले चढवा."

ही हाक फुकट गेली नाहीं. गनीमी सैन्यांत सामील होण्यासाठीं दलदलीला तुडवीत येणारे कित्येक शेतकरी गनीमी टेहळ्यांना भेटत.

मी स्टीपान बरोबर रिझिकोव्हला भेटण्यासाठीं गेलो. त्यानें रिझिकोव्हला शत्रूच्या पीछाडीला बजावलेल्या कामगिरीचा वृतान्त निवेदन केला व बरीच महत्त्वाची बातमी त्याला पुरविली. परंतु त्यानंतर स्टीपान एकाएकीं खिन्न झाला.

" कां ? तुझ्या मनाला कसली काळजी लागली आहे ? "

" काळजी कसली ? संताप आलेला आहे ! "

इतकें म्हणून त्यानें आपल्याला एका खेड्यांत गनीमी लष्करांच्या मित्रांचे गळे कापणारा देशद्रोही कसा भेटला व त्याच्या कारवाईमुळें अनेक स्त्री-पुरुषांना कसें प्राणास मुकावें लागलें ह्याची हकीगत कथन केली. रिझिकोव्ह सुद्धां संतापानें लाल झाला.

त्या गळेकापूचा समाचार घेण्याची कामगिरी इव्हॅन कॅपिव्हेटवर सोपविण्यांत आली. आपल्या गांवढळ कुडत्याच्या आंत एक रिव्हाल्वर घालून कॅपिव्हेट त्या खेड्यांत शिरला व त्यानें त्या गळेकापूच्या घराचा नेमका पत्ता काढला.

त्यानें हलकेच दारावर थाप मारली; लागलीच तो नराधम पुढें आला.

" मला जर्मनांच्या छावणीत पोहोचव, मी तुला माझे घड्याळ व पैसे देतो " कॅपिव्हेट हळूच त्याच्या कानाशी लागून म्हणाला.

त्या बदमाषानें लागलीच आपली तयारी दर्शविली. तो म्हणाला " मी तुला रस्ता दाखवीन. पण आपण गनीमी सैनिकांच्या तावडीत न सापडण्याची काळजी घेतली पाहिजे."

स्वतःची खात्री करून घेण्यासाठीं इव्हॅन त्याच्या मागोमाग जाऊं लागला. त्यानें त्याला

खेड्याच्या शिवे पलीकडील एका जंगलात जर्मनांची तुकडी तळ देऊन राहिली होती तिकडे नेले.

'पुरे! तुझी जात आतां चांगली समजली' असे म्हणून इव्हॅननें रिव्हाल्व्हर उपसून त्याला एका क्षणांत गोळी घालून ठार केले व स्वतः दलदलीच्या टापूकडे पसार झाला.

—:०:—:०:—

# ११

## मी गनीमी लढवय्या कसा बनलों

(लेखक : लाल फौजेंतील सैनिक-ओमेलचेंको)

मी ऑगस्ट महिन्यांत एक दिवशीं टेहळणीच्या कामावर असतां पकडला गेलों. नुकत्याच त्यांनीं जिंकलेल्या एका खेड्यांत जर्मनांनीं मला नेलें.

तेथील एका अम्मलदारानें मला कपडे उतरण्यास फर्मावलें. मी तसें करण्याचें नाकारतांच मला मारपीट करण्यांत आली. माझे कपडे फाडून हिसकावण्यांत आले. माझ्या अंगावर एक चड्डी तेवढी राहिली.

रणकंदन जवळच चालू होतें. जर्मन शिपायी थोडके असल्यानें त्यांना थोडी भीति वाटत होती. ऑफिसरनें मला शेजारच्या एका खेड्याकडे पायीं जाण्याचा हुकुम केला. तेथें एका जर्मन पलटणीचें मुख्य ठाणें होतें.

"मला तुझ्याबरोबर पाठविण्याला आतां कोणी नाहीं. तूं या नागव्या उघड्या स्थितींत पळणार नाहींसच, पण जर पळण्याचा प्रयत्न केलास तर तुला गोळी घालून ठार करण्यांत येईल. तेथील अम्मलदार तुला आपल्या ताब्यांत घेतील. तुला आम्ही ठार केलें नाहीं हें आपलें दैव समज."

मी रस्ता चालू लागलों. माझ्या सभोवार दूरवर पर्यंत सपाट शेतें पसरलेलीं होतीं. इतक्यांत एक रणगाड्यांचा ताफा धुळीचे लोट उधळत माझ्या समोरून येत असतांना दिसला. धुळीच्या लोटामुळें मी शत्रूला दिसूं शकलों नाहीं. मी एका खंदकांत घुसलों आणि रणगाड्यांच्या पलीकडे निसटलों आणि एक शेत उलटून पसार झालों. धूळ बसूं लागली तेव्हां मी शेतांत पालथा पडून सरपटत पुढें गेलों.

कांहीं वेळानें मी एका दाट झुडपांतच पडून रात्र काढली. माझे कान मात्र कुठें काय आवाज होतो याकडे लागलेले होते. मी न कुडकुडण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु थोड्याच वेळांत थंडीनें माझी दांतखिळी वाजूं लागली. मी सावधपणानें उठलों आणि झुडपांच्या आणि प्रेतांच्या आड लपत छपत आणि उघाडीच्या भागांत जमिनीवर सरपटत आघाडीच्या दिशेनें जाऊं लागलों.

आकाशांत आणि शेतावर प्रकाशाचा झोत पडलेला दिसला. तो ज्वेड एका आग लावलेल्या खेड्यांतून निघणाऱ्या ज्वाळांचा होता. मला हा झोत चुकविणें भाग होतें. मी साऱ्या

रात्रभर चालत होतों. पहाटेच्या तांबडे फुटण्याच्या सुमारास मी थकवा येऊन पडलों.

मला भुकेच्या वेदनामुळें जाग आली. मी जमविलेल्या स्ट्रॉबेरींनीं माझी भूक थांबणें शक्य नव्हतें. मी जंगलांतून दिवसभर मार्ग कापीत होतों. संध्याकाळच्या सुमारास मला कळून आले कीं मी रस्ता चुकलो होतो. मी पुष्कळ धडपड केली; परंतु मला जंगलांतून रस्ता सुधारेना. शेवटी निराश होऊन मी एका झुडपांच्या जाळीत घुसलो. झाडाच्या फांद्या माझ्या तोंडाला व उघड्या अंगाला ओरबाडीत होत्याच.

थोड्या वेळानें पाऊस पडूं लागला. माझे रक्तावलेले पाय मला पुढें चालू देईनात. मी माझ्या अंगाला शेवाळें व पानें लपेटून झोपीं गेलो. अशा रीतीनें माझ्या प्रवासाचा दुसरा दिवस पार पडला.

तिसऱ्या दिवशी सकाळीं उठतों तों माझे सुन्न झालेले हात-पाय मला मोकळे करतां येण्याची मुष्कील झाली होती. अशा सुन्न स्थितींतही मी रखडत होतोच. मी शुद्धीवर चालत होतो म्हणण्यापेक्षां पाय नेतील तिकडे जात होतो म्हटले तर चालेल. माझा असा हा क्रम पाच दिवस चालू होता.

सहाव्या दिवशीं मी झोपेतून डोळे उघडतो तों माझ्या समोर एक म्हातारा शेतकरी उभा असलेला दिसला.

'तूं कुठला रे बावा, अन् असा उघडा कां ?' त्यानें मला विचारलें.

मी त्याला सांगितले कीं मला जर्मनानीं पकडलें होतें पण मी त्यांच्या हातून निसटलों.

त्यानें खिन्नपणानें मान हालवून म्हटलें, 'तुझ्या रक्ताच्या खुणावरून मी तुझा तलास काढला.'

'मला आपल्या फौजेकडे परत पोहोचव,' मी त्याला विनवलें. 'तुझ्यानें फार दूरवर चालवेल असें दिसत नाहीं. छेः ! तूं तेथपर्यंत सरपटत जाऊं म्हटलेस तरी ते तुझ्यानें होणार नाहीं. आमच्या खेड्याची जर्मनांनीं जाळून राख केली.'

मला दिसलेला प्रकाश बहुधा त्याचाच असावा.

'आम्हाला त्याचा सूड घ्यावयाचा आहे,' म्हातारा त्वेषानें म्हणाला. 'आम्ही एकूण सहा जण आहोत. दोन म्हातारी माणसें, एक बाई व दोन जवान पोरें. आम्हाला शिक्षण देणारा व आमचे पुढारीपण करणारा असा कोणी तरी इसम आम्हाला हवा आहे. एकादी यंत्री तोफ हस्तगत करावी असें आमच्या मनांत फार आहे. पण ती कशी वापरावी हें आम्हाला ठाऊक नाहीं. तूं आमच्या बरोबर रहा आणि आम्हाला शिकव म्हणजे ठीक होईल'.

माझा पहिला विचार माझ्या अंगांत पुन्हा पुरेशी ताकद येईपर्यंत त्यांच्याबरोबर रहावें, त्यांना शिकवावें, त्यानंतर मला माझ्या पलटणीकडे परत जाता येईल, असा होता.

ज्या जंगलाच्या राईंत गनीमी सैनिक छपलेले होते तेथें जेव्हां मी व तो म्हातारा जाऊन पोहोचलो तेव्हां तेथें सहा ऐवजीं आठ सैनिक मला आढळून आले. दुसऱ्या दिवशी ही संख्या अकरावर गेली.

त्या तुकडीमधील एका बाईनें माझ्या जखमांना पट्ट्या बांधल्या. रात्रीं शेजारच्या खेड्यातून आमच्यासाठीं अंडी दूध येऊन पोहोचलें. दिवसाचा माझा वेळ या तुकडींतील इसमांना शिक्षण देण्यांत जातो.

एका आड ठिकाणच्या शेतांत रात्रीं तळ देऊन राहिलेल्या तीन शिपायांवर छापा घालून आम्ही आमच्या मोहिमेचा नारळ फोडला. तोंपर्यंत आमच्या जवळ शेतकऱ्यांना सहज सापडलेल्या फक्त दोन रायफली होत्या. आतां त्यांत तीन रायफलींची व कांहीं थोड्या कुलपी गोळ्यांची भर पडली.

एक आठवड्यानंतर आम्ही एक यंत्री तोफ हस्तगत केली. पुन्हा थोडया दिवसांनीं आम्ही शत्रूची एक मोटार अडविली; ती स्फोटक गोळ्यांनीं खचून भरलेली होती. या सामुग्रीच्या साहाय्यानें आम्ही दोन पूल उडवून दिले.

आतां ह्या तुकडीला सोडून आपल्या आघाडीवरील लष्कराला मिळावें असा विचार मी दररोज करी. परंतु दर वेळीं कांहीं तरी नवें काम उभें राही, कोणती तरी नवी कामगिरी पार पाडावी लागे. नवे गनीमी सैनिक आम्हाला सारखे येऊन मिळत आणि त्यांना शिक्षण देणें भाग पडे. पुष्कळ वेळां अशी एकादी खास महत्वाची वातमी येई कीं तिच्याकडे तावडतोब लक्ष पुरविण्यावाचून गत्यंतर नसे.

सप्टेंबर महिन्याच्या शेवटीं मला कळून चुकलें कीं मला ती तुकडी सोडून जाणें आतां शक्य नाहीं. या सुमारास माझ्या हातीं एक इतकी महत्वाची माहिती लागली कीं ती लाल फौजेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तडकाफडकीनें पोहोचविणें भाग होतें. मी त्या कामावर माझ्या तुकडी पैकीं एकाला रवाना केलें आणि मग मला सुचलें कीं, मला त्या संधीचा फायदा घेता आला असता !

तीन महिन्यांत माझ्या तुकडीची संख्या १२० पर्यंत गेली. 'कॉम्रेड 'ओ.'च्या नेतृत्वाखालील तुकडीनें' पूल उडवून दिल्याच्या, विमानें पेटवून दिल्याच्या व मोटार लॉऱ्या हस्तगत केल्याच्या बातम्या सरकारी युद्ध पत्रकांत छापून येऊं लागल्या !

मी लाल फौजेच्या मुख्य ठाण्याशीं पक्का तालुक जोडला होता. आमच्या या चकमकींत जर्मन फौजेच्या वरिष्ठ ठाण्याचे कित्येक महत्वाचे कागदपत्र आमच्या हातीं लागत आणि त्याचा आमच्या अधिकाऱ्यांना फारच उपयोग होई.

शेवटीं जर्मनांनीं मला ठार करण्यासाठीं बक्षीस जाहीर केलें, परंतु त्याची आम्हापैकीं कोणी कधींच पर्वा केली नाहीं.

एक दिवशीं मी अकस्मात लाल फौजेच्या छावणीत हजर झालों, कारण वरिष्ठ अधिकाऱ्याकडून स्वत: हजर होण्याबद्दल मला हुकुम मिळाला होता.

मी तिथें पोंहोचलों तेव्हां मला जनरलच्या मुयाराकडे नेण्यांत आलें. त्यानें उठून माझ्या बरोबर हस्तान्दोलन केलें. आमचे सरकारी काम रीतसर संपविल्यानंतर त्यानें मला खेळीमेळीच्या स्वरांत विचारलें.

" युद्ध सुरूं होण्यापूर्वीं तूं काय करीत असेस ? "

" मी ड्राफ्टमन होतो आणि शिल्पकला विद्यालयांत जाण्याचा माझा विचार होता."

त्यानें माझ्या उत्तरावर विचार केला. थोडा वेळ कोणी कांहीं बोललोंच नाहीं.

" मला माझ्या तुकडीकडे परत जाण्यास परवानगी आहे ना ? " मी विचारलें.

" का ? तुला आमच्यामध्यें रहावेंसे वाटत नाहीं ? तूं कांहीं झालें तरी लाल फौजेतील सैनिक आहेस. मी तूर्त तुला लांबची रजा देतो; नंतर मी माझ्या ठाण्यांतील अधिकाऱ्यामध्यें तुझी नेमणूक करून घेईन. "

मला मोठा पेंच पडला. त्यानें म्हटल्याप्रमाणें कांहीं म्हटले तरी मी लालफौजेतील इसम होतो हें खरें–पण–

" कॉम्रेड जनरल, तुम्हीं कृपा करून लक्षांत घ्या कीं माझी खरी जागा आतां गनीमी सैनिकांतच आहे असें समजलें पाहिजे. "

त्यानें माझ्याशी हस्तांदोलन केलें व मी त्याचा निरोप घेतला.

—:0:—:0:—